CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | सोमवार, २ मार्च २०२६ | वर्ष ३ रे अंक ३६१ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**आज होलिकादहन**



सोलापूर
**तरुण भारत**
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक

### उद्या अंक नाही

सोमवार, दि. २ मार्च रोजी होळी सणानिमित्त दै. सोलापूर तरुण भारत कार्यालयास एक दिवस सुट्टी आहे. त्यामुळे **उद्या मंगळवार, दि. ३ मार्च २०२६** रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, विक्रेते आणि जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

**- व्यवस्थापक**

## विचारपुष्प



स्वातंत्र्याची चळवळ हा केवळ राजकीय संघर्ष नव्हता. तिचे ध्येय केवळ प्रस्थापित राजकीय सत्ता परकीयांच्या हातून काढून स्वकियांच्या हाती देणे एवढ्यापूरतेच मर्यादित नव्हते तर तो दोन संस्कृतींचा संघर्ष होता. भारतात ब्रिटिशांच्या साम्राज्यवादाची स्थापना झाल्यानंतर पश्चिमेकडील औद्यौगिकीकरणाची संस्कृती विसाव्या शतकातील भारताने काळाचे आव्हान म्हणून स्वीकारली होती.

**- भारतरत्न नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

## महत्त्वाचे

### जीएसटी संकलनात ८.१ टक्क्यांची वाढ

**नवी दिल्ली :** फेब्रुवारीमध्ये एकूण जीएसटी संकलन ८.१ टक्क्यांनी वाढून १.८३ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाले. यामुळे आयातीतून मिळणाऱ्या महसुलात वाढ झाली. एकूण देशांतर्गत महसूल ५.३ टक्क्यांनी वाढून सुमारे १.३६ लाख कोटी रुपयांवर पोहोचली, तर एकूण आयात महसूल १७.२ टक्क्यांनी वाढून ४७,८३७ कोटी रुपयांवर पोहोचली. एकूण परतफेड १०.२ टक्क्यांनी वाढून २२,५९५ कोटी रुपयांवर पोहोचली. एकूण निव्वळ वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) संकलन १.६१ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाले. ते मागील वर्षीच्या फेब्रुवारीमध्ये ७.९ टक्क्यांनी वाढले होते. ■

### काटोलमध्ये 'एसबीएल एक्स्प्लोसिव्ह'मध्ये स्फोटके तयार करताना दुर्घटना

# भीषण स्फोटात १८ ठार

### • २४ जण जखमी • मृतांच्या वारसांना प्रत्येकी ५ लाखांची मदत : मुख्यमंत्री



प्रतिभा वालके | दुर्गा गायकवाड | शोभा तापसे | अनसूया पाटील | मंगेश्री येसेकर | सुनंदा चिचखेडे | सविता कालमेघे | गायत्री शेंडे



शक्तिशाली स्फोटात कारखान्याची इमारत उद्ध्वस्त झाली

**संदीप नंदनवार**

◆ **नागपूर, १ मार्च**

काटोल तालुक्यातील राऊळगाव-येनविहिरा येथील एसबीएल एनर्जी लिमिटेड (पूर्वीची स्पेशल ब्लास्ट लिमिटेड) या स्फोटके निर्मिती करणाऱ्या कंपनीत रविवार, १ मार्चला सकाळी सहा ते सात वाजेच्या दरम्यान भीषण स्फोट झाला. त्यात १८ कामगार ठार झाले असून यात १५ महिला व तीन पुरुषांचा समावेश आहे. तर २४ जण जखमी झाले असून अनेकांची प्रकृती गंभीर आहे. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

**मृतांना पाच लाख रुपये**

**एसबीएल कंपनीतील स्फोटात मृत्यू झालेल्यांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक मदत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केली. याशिवाय संबंधित कंपनी सुद्धा त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देणार आहे. तसेच जखमींनासुद्धा आर्थिक मदत देण्यात येणार आहे.** ■

यासंबंधी प्राप्त माहितीनुसार, राऊळगाव लगतच्या येनविहिरा गावात एसबीएल एनर्जीचा प्रकल्प आहे. या ठिकाणी डेटोनेटर्स, स्लरी एक्सप्लोजिव्ह, कास्ट बूस्टर्स, सिजमिक एक्सप्लोसिव्हचे उत्पादन होते. त्यातीलच एका युनिटमध्ये रविवारी सकाळच्या सुमारास अचानक स्फोट झाला. त्यात १८ जण ठार झाले. नागपूर ग्रामीणचे पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

दुसरीकडे, या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी स्फोटानंतर लागलेली आग नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. पोलिस, स्थानिक प्रशासन व कंपनीचे बचाव पथकाने घटनास्थळी ढिगारा उपसण्याचे काम युद्धपातळीवर केले. (तभा वृत्तसेवा)

**मृतकांची नावे**

**पायल गजभिये, मीना उईके, प्रतिभा वालके, दुर्गा गायकवाड, शोभा तापसे, अनसूया पाटील, सुनीता सलामे, ज्योत्स्ना शेंद्रे, मंगेश्री येसेकर, संगीता पाचभाई, गोपी कोये, सुनंदा चिचखेडे, सविता कालमेघे, गणेश कोंगे, राजू कुळमेथे, प्रेमदास बागडे, वर्षा अमोल टेकाम. एका मृतकाचे नाव कळू शकले नाही.** ■

**१८ जणांवर उपचार सुरू**

ही घटना घडली तेव्हा एसबीएलच्या विविध युनिटमध्ये ३५ हून अधिक कर्मचारी काम करीत होते. स्फोटातील १९ जखमींना उपचारासाठी नागपूरला हलविण्यात आले. त्यापैकी एकाचा मृत्यू झाला, तर १८ जणांवर उपचार सुरू आहेत. तसेच या जखमींमध्ये बहुतांश महिलांचा समावेश असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. ■

**जखमींची नावे : १) आकस्मिक उपचार सेवा** : (ए स्क्वेअर हॉस्पिटल, जाफरनगर, मानकापूर नागपूर)

सीमा धनराज वाघाडे, गायत्री इरपाची (शेंडे), कविता शंकर उईके, अर्चना अजय पेठे, भारती चंद्रकांत शेंडे, सुचिता कुशाल बागडे.

**२) आकस्मिक सेवा : (ऑरेंज सिटी हॉस्पिटल, नागपूर)**

काजल वासुदेव कौरती, आम्रपाली अनिल काळसर्पे, दुर्गा मनोज गाडगे, ज्योती श्यामू धुर्वे, सुजाता विनायक रक्षित, उषा बालाजी रेवतकर, रोशनी सूर्यकांत उमाटे, रितू आनंदराव सलाम, सुनीता श्रीकृष्ण उइके, दुर्गा केशव सेवतकर, रंजना उत्तम घागरे, मनीषा गणेश धुर्वे, वैशाली हरिभाऊ धुर्वे, सीमा विजय धुर्वे, वैशाली गणेश सतई, रोशनी दीपक मसराम, कविता ज्ञानेश्वर उईके, मयुरी हिराचंद धुर्वे.

**आऊटऑफ शिफ्ट** : (यांना उपचारार्थ दुसरीकडे हलविण्यात आले आहे.)

कविता उईके, रोशनी मसराम, वैशाली सतई, सुचिता बागडे. ■

# इराणचे सर्वोच्च नेते खामेनेई हल्ल्यात ठार

### • अराफी हंगामी नेते • हत्येचा सूड घेण्याची मागणी

◆ **तेहरान, १ मार्च**

अमेरिका आणि इस्रायलने इराणची राजधानी तेहरान शहरात सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांचे कार्यालय आणि निवासस्थानावर शनिवारी १२ क्षेपणास्त्रांचा मारा केला. यात ८६ वर्षीय खामेनेई यांच्यासह प्रमुख १२ नेते आणि ४० अधिकाऱ्यांचा मृत्यू झाला. इराणचे राष्ट्रपती मसूद पेझिश्कियान यांनी रविवारी त्यांच्या मृत्यूची अधिकृत घोषणा केली. यानंतर इराणमध्ये संतापाची लाट उसळली. लाखोंच्या संख्येने लोक रस्त्यावर उतरले आणि त्यांनी खामेनेई यांच्या हत्येचा सूड घेण्याची मागणी केली. अशातच इराणी सरकारने ज्येष्ठ धर्मगुरू अयातुल्लाह अली रेझा अराफी यांची अंतरिम सर्वोच्च नेतेपदी निवड झाल्याची घोषणा केली.

हल्ल्यात इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स अर्थात् 'आयआरजीसी'चे प्रमुख जनरल मोहम्मद पाकपोर हेदेखील ठार झाले. त्यानंतर त्यांच्याजागी अहमद वहिदी यांची नियुक्ती करण्यात आली.

**धुराचे लोट; सर्व काही उद्ध्वस्त**

खामेनेई यांच्या कार्यालयावर केलेल्या भीषण हल्ल्याची चित्रफीत इस्रायलने जारी केली. यात त्यांचे मुख्यालय पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्याचे दिसत आहे. कारवाईत खामेनेई यांचा मुलगा, मुलगी, नात, सून आणि जावई यांचाही मृत्यू झाला. खामेनेई यांच्या मृत्यूनंतर इराणने इस्रायल, सौदी अरब, ओमान, कतार, दुबईत जोरदार हल्ले केले. प्रत्युत्तरात इस्रायल-अमेरिकेने तेहरानसह प्रमुख शहरात क्षेपणास्त्रे, ड्रोनचा मारा केला. यात इराणचे मोठे नुकसान झाले. कारवाईत ४०० पेक्षा अधिक इराणी सैनिकांचा मृत्यू झाल्याचे इस्रायलने म्हटले आहे.

**४० दिवसांचा राष्ट्रीय शोक, ७ दिवसांची सुट्टी**

खामेनेईंच्या मृत्यूनंतर इराणमध्ये ४० दिवसांचा सार्वजनिक शोक आणि ७ दिवसांचा राष्ट्रीय सुटी जाहीर करण्यात आली. चीन, रशिया, पाकिस्तान, तुर्कीने खामेनेई यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध केला. (वृत्तसंस्था)



**कसा झाला हल्ला?**

**अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणांना खामेनेई यांच्या वरिष्ठ नेत्यांसोबत बैठका सुरू असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे इस्रायलने खामेनेईंच्या मुख्यालयावर सुमारे ३० बॉम्ब टाकले; ज्यात खामेनेई यांच्यासह तिथे उपस्थित सर्व नेतेही ठार झाले.** ■

**इतिहासातील सर्वात क्रूर लोकांपैकी एक खामेनेई आता जिवंत नाही. हे केवळ इराणच्या जनतेसाठीच नव्हे, तर त्या सर्व देशांसाठी न्याय आहे.**

**- डोनाल्ड ट्रम्प**
राष्ट्राध्यक्ष, अमेरिका

**येणाऱ्या काळात आम्ही दहशतवादी शासनाच्या हजारो लक्ष्यांवर हल्ले करू. आम्ही इराणला अत्याचाराच्या विळख्यातून मुक्त केल्याशिवाय राहणार नाही. इराणच्या नागरिकांनो, ही संधी गमावू नये.**

**- बेंजामिन नेतान्याहू**
पंतप्रधान, इस्रायल

**खामेनेईंचे कुटुंब हल्ल्यात ठार**

अमेरिका-इस्रायलच्या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांच्यासह त्यांची मुलगी, जावई, नात आणि सून यांचाही मृत्यू झाला. रविवारी सकाळी खामेनेईंच्या मृत्यूची अधिकृत घोषणा इराणी सरकारने केली आणि देशात ४० दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा आणि सात दिवसांच्या सार्वजनिक सुट्ट्यांची घोषणा करण्यात आली. खामेनेईंच्या मृत्यूचा सूड घेणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. ■

**बारामतीमध्ये दोन कोटींचा गांजा जप्त**

**पुणे** : बारामती शहरातील जळोची रस्ता भागातील एका पाण्याच्या टाकीत लपविलेला दोन कोटी ३५ लाख रुपये किमतीचा ४७० किलो गांजा पोलिसांनी जप्त केला आहे. याबाबत पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तातडीने शोधमोहीम सुरू केली. ■

## नात्याने चुलता, कृत्याने राक्षस!

**13 महिन्यांच्या बालिकेच्या खूनाचा २४ तासांत उलगडा**

**तभा वृत्तसेवा,**
**तुळजापूर, दि.१ मार्च-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी पोलिस ठाणे हद्दीत २८ फेब्रुवारी २०२६ रोजी नोंदवलेल्या १३ महिन्यांच्या बालिकेच्या अपहरण व खून प्रकरणाचा पोलिसांनी केवळ २४ तासांत उलगडा केला आहे. याप्रकरणी बालिकेचा चुलता शंकरेश्वर माने याला अटक करण्यात आली. नात्याने चुलता असलेल्या माने हा कृत्याने राक्षस ठरला.

महादेव माने (रा. गवळेवाडी) यांनी आपल्या १३ महिन्यांच्या मुलीला अज्ञात व्यक्तीने घरातून पळवून नेल्याची तक्रार तामलवाडी पोलिस ठाण्यात नोंदवली होती. त्यानुसार सपोनि गोकुळ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करुन पोलिसांनी संशयिताला ताब्यात घेतले. चौकशीअंती त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

आरोपीने २७ फेब्रुवारी रोजी पहाटे बालिकेला घरातून उचलून नेऊन शेतात तिचा गळा दाबून खून केला आणि मृतदेहाचे तुकडे करून पोत्यात भरून जवळील चारींमध्ये दफन केले. दरम्यान, कौटुंबिक वाद आणि संशयामुळे संतापाच्या भरात त्याने हे कृत्य केल्याची बाब प्राथमिक तपासात समोर आले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला आहे. पोलिस अधीक्षक रितू खोखर, अप्पर पोलिस अधीक्षक शफाकत आमना, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.निलेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि गोकुळ ठाकूर व त्यांच्या पथकाने ही कामगिरी पार पाडली.

# कराचीत अमेरिकन दुतावासावर हल्ला

### • गोळीबारात १५ नागरिकांचा मृत्यू • खामेनेईंच्या हत्येनंतर पाकिस्तानात उद्रेक

◆ **कराची, १ मार्च**

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनेई यांच्या मृत्यूनंतर पाकिस्तानातील कराची शहरातील माई कोलाची मार्गावर असलेल्या अमेरिकन वाणिज्य दूतावासावर रविवारी संतप्त नागरिकांनी हल्ला केला. सुरक्षा दलासोबत झालेल्या संघर्षात १५ नागरिकांचा मृत्यू झाला, तर २२ जण जखमी आहे.

खामेनेई यांच्या मृत्यूची पुष्टी झाल्यानंतर पाकिस्तानात संतापाची लाट उसळली. राजधानी इस्लामाबादसह विविध शहरात अमेरिका-इस्रायलच्या विरोधात आंदोलने करण्यात आली. कराचीतील अमेरिकेच्या वाणिज्य दूतावासाच्या इमारतीत निदर्शकांनी प्रवेश करीत तोडफोड आणि जाळपोळ केली. दरम्यान, आंदोलकांना हुसकावून लावून परिस्थिती नियंत्रणात आण्यासाठी तिथे तैनात असलेल्या सुरक्षा रक्षक आणि अमेरिकन सैनिकांनी गोळीबार केला. यात १५ निदर्शकांचा मृत्यू झाला, तर २२ पेक्षा अधिक जखमी असल्याची माहिती पोलिस आयुक्त सुमैया सैय्यद यांनी दिली.



**जमावाची दगडफेक, रस्ते बंद**

सुलतानाबाद येथून निघालेला आंदोलकांनी कडेकोट सुरक्षा व्यवस्था असलेल्या अमेरिकन दूतावासात घुसण्याचा प्रयत्न केला. जमावाने दगडफेक सुरू केल्यानंतर पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. सुरक्षा घेरा तोडत आंदोलकांनी दूतावासात प्रवेश केला. यानंतर झालेल्या संघर्षात १५ आंदोलकांचा मृत्यू झाला. इतर परदेशी दूतावासांनाही धोका निर्माण होऊ नये म्हणून सुरक्षा व्यवस्था तैनात आहे. (वृत्तसंस्था)

## चारचाकीची दुचाकीला धडक; एक ठार, दोघे जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.१ मार्च-**

पंढरपूर-टेंभुर्णी मार्गावर परिते गावच्या शिवारातील सरकारी दवाखान्याजवळ भरधाव असलेल्या चारचाकी वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने एकाचा मृत्यू तर दोघे जखमी झाल्याची घटना घडली.



याप्रकरणी दयानंद सुरेश पानसरे (वय-३३, रा.लव्हे, ता.माढा, सध्या मार्स हॉस्पिटल टेंभुर्णी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन लक्ष्मण बंकट कळसाईत (रा.झरे, ता.करमाळा) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

यातील फिर्यादी दयानंद पानसरे हे अमोल भाऊराव देशमुख (वय-३५), आण्णासाहेब संभू लुंगसे (वय-४२, रा.मुंगसे वस्ती, लव्हे, ता.माढा) यांच्यासह एम.एच.४५ एल.८७२० या क्रमांकाच्या दुचाकीवरुन पंढरपूरहून टेंभुर्णीकडे येत होते. परिते गावच्या शिवारात सरकारी दवाखान्याजवळ आले असता समोरुन भरधाव येणारी एम.एच.४५ ए.क्यू ०२७० या क्रमांकाच्या चारचाकी वाहनचालकाने दुचाकीला जोरदार धडक दिली. यात अण्णासाहेब लुंगसे हे गंभीर जखमी झाले. उपचारापुर्वीच त्यांचा मृत्यू झाला. दयानंद पानसरे व भाऊराव देशमुख हे किरकोळ जखमी झाले आहेत.

# टीम इंडिया उपांत्य फेरीत

### टी-२० विश्वचषक : संजू सॅमसनची शानदार खेळी

### वेस्ट इंडिजचा ५ गडी राखून पराभव



**५० चेंडू**
**४ षटकार**
**१२ चौकार**
**नाबाद ९७**

**कोलकाता, दि. १ मार्च-**

टी-२० विश्वचषकाचा शेवटच्या सुपर ८ सामन्यात सलामीच्या संजू सॅमसनच्या शानदार खेळीच्या जोरावर टीम इंडियाने वेस्ट इंडिजचा ५ गडी राखून पराभव करीत उपांत्य फेरी गाठली. उपांत्य फेरीत त्यांची गाठ इंग्लडबरोबर ५ मार्चला होईल. संजू सामन्याचा मानकरी ठरला.

वेस्ट इंडिजविरुद्ध विजयासाठी १९६ धावांचा पाठलाग करणाऱ्या टीम इंडियाची सुरूवात डळमळीत झाली. अभिषेक शर्माला (१० धावा) अकिल हुसेनने झेलबाद केले. तिलक वर्मा १५ चेंडूत २७ धावा काढून बाद झाला. त्याला जेसन होल्डरच्या चेंडूवर शिमरॉन हेटमायरने झेलबाद केले. त्याने इशान किशनलाही (१० धावा) बाद केले. कर्णधार सूर्यकुमार यादवला (१६ चेंडूत १८ धावा) शमार जोसेफने बाद केले. संजू सॅमसनने मात्र, एका बाजुने लढा कायम ठेवला. त्याने ५० चेंडूत ४ षटकार आणि १२ चौकारांसह नाबाद ९७ धावांची शानदार खेळी केली. टीम इंडियाला विजयासाठी ६ चेंडूत ७ धावांची गरज होती. संजूने रोमारियो शेफर्डच्या गोलंदाजीवर पहिल्यात चेंडूवर षटकार व दुसऱ्या चेंडूवर विजयी चौकार मारून उपांत्य फेरी गाठली. संजूचे पहिलेच अर्धशतक होते. मात्र, त्याचे शतक केवळ तीन धावाने हुकले.

तत्पूर्वी, नाणेफेक गमावल्यानंतर, प्रथम फलंदाजी करणाऱ्या वेस्ट इंडिजने २० षटकांत ४ गडी गमावून १९५ धावा केल्या. रोस्टन चेसने ४० आणि जेसन होल्डरने नाबाद ३७ धावा केल्या. टीम इंडियाकडून जसप्रीत बुमराहने दोन बळी टिपले. हार्दिक पांड्या व वरुण चक्रवर्तीने प्रत्येकी एक गडी बाद केला

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# विधी सेवा व शासकीय यंत्रणांत हवा समन्वय

## न्यायमूर्ती जमादार; वडाळा येथील महाशिबीरात सहा हजार लोकांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**उत्तर सोलापूर, दि. १ मार्च-**

समाजामध्ये सामाजिक आणि आर्थिक विषमता दूर व्हावी, यासाठी लोककल्याणकारी राज्याची संकल्पना मांडली असून ती यशस्वी करण्यासाठी लोकांना त्यांचे अधिकार, हक्क माहित असणे गरजेचे आहे. शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजनांचा लाभ पोहोचला पाहिजे, त्याकरिता कायद्याचे ज्ञान देण्याबरोबरच सर्व् शासकीय यंत्रणांना सोबत घेऊन लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून शासकीय कल्याणकारी योजनांचा महामेळावा म्हणजेच महाशिबीर या उपक्रमांचे आयोजन केले असून विधी सेवा देणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयातील सोलापूर जिल्ह्याचे न्यायिक पालक न्यायमूर्ती निजामोद्दिन जमादार यांनी केले.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, दिल्ली, महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या सूचनेनुसार सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा प्रशासनाच्या वतीने शनिवारी वडाळा येथील माऊली महाविद्यालयात महाशिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या महाशिबीराचे उद्घाटन न्यायमूर्ती जमदार व न्यायमूर्ती फिरदोश पुनीवाला यांच्या हस्ते रोपट्याला पाणी घालून करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांना मार्गदर्शन करताना न्यायमूर्ती जमादार बोलत होते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा सोलापूर जिल्हा सत् न्यायालयातील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा, पोलीस आयुक्त एम.राजकुमार, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अतिरिक्त जिल्हाधिकारी गणेश निराळी, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष अ‍ॅड.बाबासाहेब जाधव यावेळी विचारपीठावर उपस्थित होते.

न्यायमूर्ती पुनीवाला म्हणाले, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत म्हणजेच गरीबातल्या गरिबांना




सहज न्याय मिळावा, हे महात्मा गांधींना अभिप्रेत होते.महात्मा गांधींचे न्याय व्यवस्थेबद्दलचे विचार सत्य व सामाजिक समतेवर आधारित होते. याच विचाराने विधी सेवा प्राधिकरणाचे कामकाज सुरु असून जर आपल्याकडे चांगली न्याय वितरण प्रणाली असेल तर लोकशाही मजबूत होईल जी आपल्या देशाची प्रगती करण्यास मदत करेल. विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून सर्व प्रशासकीय यंत्रणांना सोबत घेऊन सर्वसामान्य घटकापर्यंत न्याय, त्यांचे हक्क व अधिकार याची जाणीव करुन दिली जात आहे. लोककल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात आहे. आम्हाला अशा कायदेशीर सेवेबद्दल खूप आनंद आहे. समाजातील प्रत्येक घटक या उपक्रमाला साथ देतील,अशी आम्हाला आशा वाटते. जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा यांनी प्रास्तविक सांगितले. सोलापुरातील एन.ए.बी. अंधकार्यशाळेतील विद्यार्थ्यांनी स्वागत गीत म्हटले, शहर व जिल्हा पोलीस यंत्रणेतील बँन्ड पथकाने न्यायमूर्ती व मान्यवरांचे स्वागत केले. सोलापूर येथील करुणाशील समितीचे अशुतोष नाटकर आणि कलाकारांनी बालविवाह विरोधी जनजागरण व घर दोघांचे हे दोन पथनाट्य सादर केले. न्यायाधीश अश्विनी बिराजदार व न्यायाधीश वैष्णवी कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायाधीश प्रशांत पेठकर यांनी आभार मानले.

**दृष्टिक्षेपात महाशिबीर**

कृषी यांत्रिकीकरण, गोपीनाथराव मुंढे शेतकरी अपघात योजना, समाज कल्याण विभाग, ओ.बी. सी.महामंडळा्च्या लाभार्थींना प्रातिनीधीक स्वरुपात न्यायमूर्तींच्या हस्ते योजनेच्या लाभाचे वितरण

दोन ठिकाणी चोरीमध्ये गेलेला मुद्देमाल मूळ मालकांना न्यायमूर्ती पुनीवाला व न्यायमूर्ती जमादार यांच्या हस्ते सुफूर्द करण्यात आला.

दोन्ही न्यायमूर्तींनी सर्व ४० स्टॉलला भेटी देऊन त्या त्या विभागाच्या कामकाजाची माहिती व सामान्य जनतेशी हितगूज केले. काही स्टॉलवर त्या विभागाच्या लाभार्थिंना लाभाचे वितरणही केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्यायाधीश प्रशांत पेठकर व त्यांच्या सहका-यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट व शिस्तबद्ध नियोजन केले होते.

## शहरात मराठी दिन उत्साहात



### कोठारी प्रशाला

श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी हायस्कूलमध्ये कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिवस म्हणून साजरा करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक रमेश यादवाड तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सुधीर दुर्गे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रशालेतील गायत्री कुंभार, पवित्रा सरवदे या विद्यार्थिनीने मराठी भाषा दिनाचे महत्त्व आपल्या मनोगतात सांगितले. इयत्ता सातवीतील विद्यार्थ्यांनी मराठी भाषेची ताकत या विषयावर नाटक सादरीकरण केले. सृष्टी कोळी, गौतमी जानराव यांनी कविता तर सुमित शिंदे यांनी पोवाडे सादरीकरण केला. प्रशालेतील सहशिक्षक बी. एस. पाटील यांनी मराठी भाषा दिनाचे महत्त्व आपल्या मनोगतात सांगितले. सूत्रसंचालन एस.एम.बगले तर आभार एम.बी. जमादार यांनी मानले.



### श्रीदत्त मराठी विद्यालय

श्रीदत्त मराठी विद्यालय या प्राथमिक शाळेत मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात आले. प्रमुख पाहुणे हरी ओम विणकर बाग बहुद्देशीय संस्थेचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत दंडी, पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली महिला संघम अध्यक्षामाधवी अंधे हे होते. संस्थेचे अध्यक्ष नागनाथ सुरवसे, मुख्याध्यापिका सुनीता कोळी, सह शिक्षिका सीमा उमाप, डी.एल. बंडगर, यू.एस. लांडे, डी.वाय. झाडबुके, बी.एस. माशाले उपस्थित होते. सूत्रसंचालन लक्ष्मी यंगल व आभार डी.एल. बंडगर यांनी मानले.




### संभाजीराव शिंदे प्रशाला

संभाजीराव शिंदे प्रशाला विडी घरकुल येथे मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती व संस्थेचे आधारस्तंभ शिक्षण महर्षी स्वर्गीय विष्णूपंत कोठे यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. ज्युनिअर कॉलेजच्या प्राध्यापिका एक्कलदेवी यांनी काव्यवाचन केले. त्याचबरोबर मूळमाने, प्राध्यापक व्हटकर यांनी मनोगत व्यक्त केले. हा कार्यक्रम प्रशालेचे जेष्ठ शिक्षक नागेश बंडे, ज्येष्ठ शिक्षिका मनीषा शिंदे प्रा नवनाथ व्हटकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. सूत्रसंचालन राखी कोंगारी यांनी केले तर आभार दत्तात्रय नरुटे यांनी मानले.




### चाँद तारा उर्दू शाळा

चाँद तारा उर्दू प्राथमिक शाळेत मराठीचे ज्येष्ठ साहित्यिक पद्मभूषण कवी विष्णू वामन शिरवाळकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्म दिनाचे औचित्य साधून शाळेत मराठी दिवस साजरा करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे सल्लागार हाजी बशीर बागबान हे अध्यक्षस्थानी होत तर प्रमुख पाहुणे मराठीचे सेवानिवृत्त शिक्षक बी. एच. करजगीकर, अय्यूब अहमद नल्लामंदू, संस्थेचे अध्यक्षा डॉ. जन्नत बागबान, इक्बाल बागबान हे उपस्थित होते. यावेळी शाळेतील इयत्ता तिसरी व चौथी शिकणाऱ्या सादिया शेख, सनाउल्ला, अब्दुल करीम, आदीबा बागबान उजमा गबोरे, आलिया नदाफ, शेख सिमरन, बागवान सानिया यांनी मराठीत कविता, अंताक्षरी व मराठी दिनाचे महत्व विषद केले. प्रस्ताविक मुख्याध्यापिका गजाला सौदागर यांनी केले. सूत्रसंचालन नेहा परवीन बागवान यांनी तर आभार आफरीन मुजावर यांनी मानले.




### महावीर हायस्कूल

महावीर हायस्कूल होटगी रोड येथे मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेच्या मुख्याध्यापिका उज्वला पाटील व पाहुणे म्हणून प्रशालेतील ज्येष्ठ शिक्षक विजय पाटील उपस्थित होते. प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. इयत्ता ८ वी च्या विद्यार्थीनिनी मराठी गौरव गीतावर नृत्य सादर केले. सूत्रसंचालन व आभार सहशिक्षक बसवराज बिराजदार यांनी मानले.

### सिद्रामप्पा हत्तुरे प्रशाला

सिद्रामप्पा हत्तुरे प्राथमिक शाळेत मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक सचिन जाधव, सुधाकर कामशेट्टी व संगता हुमनाबादकर यांच्या हस्ते वि.वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. यावेळी चौथीच्या विद्यार्थीनींनी ही मायभूमी गीतावर नृत्य सादर केले. मराठी दिनानिमित्त गायन स्पर्धा व श्रुतलेखन स्पर्धा घेण्यात आले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक स्वरा सोनकंटले यांनी केले.

# योगेश जाधवची विद्यापीठ संघात निवड

**बार्शी, दि. १ मार्च-**



आंध्र विद्यापीठ, विशाखापटनम (आंध्र प्रदेश) येथे दि. ३ व ४ मार्च रोजी होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ शरीरसौष्ठव स्पर्धेसाठी श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शीच्या योगेश जाधवची पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर संघात निवड झाली. या यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी.वाय.यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी. टी.पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, कार्यकारणी सदस्य तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.बी. शेख, प्रमोद जाधव, संतोष कवडे यांनी अभिनंदन केले. या खेळाडूस शारीरिक शिक्षण संचालक डॉ.हरिदास बारसकर, डॉ. विजयानंद निंबाळकर, डॉ.रामहरी नागटिळक प्रा. संजय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

# भुवनेश्वरी बिराजदार हिचे हस्ताक्षर स्पर्धेत यश

**सोलापूर, दि. १ मार्च-**



ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात बी.ए. भाग २ मध्ये शिकत असलेली भुवनेश्वरी बिराजदार हिने हस्ताक्षर स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवला आहे. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त डी. व्ही. ए. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये ही स्पर्धा आयोजित केली होती.स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख रु.१०००/- चे बक्षीस सदर विद्यार्थ्यांना मिळाले आहे. तिच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. श्रीनिवास क्यातम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम खजिनदार गोवर्धन कमटम, प्राचार्य डॉ. अशोक एकलदेवी यांनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले आहे.




# मनपा मुले शाळा क्रमांक ६ मध्ये संगणक कक्षाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ मार्च-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या अंतर्गत असलेल्या जोड बसवण्णा चौक येथील महानगरपालिका मराठी मुलांची शाळा क्रमांक सहा या शाळेला आयडीबीआय बँक अक्कलकोट रोड शाखेने सीआरएस फंडातून पाच संगणक भेट दिले आहेत. या संगणक कक्षाचे उद्घाटन आयडी बीआय बँकेचे मॅनेजर जितेंद्र वेद यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून आकाश पात्रीकर, सोलापूर श्रद्धा इन्स्टिट्यूटचे संस्थापक स्वाती शहा, पराग शहा, मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे पर्यवेक्षक संतोष बुलबुले, शाळेच्या मुख्याध्यापिका अश्विनी लामतुरे हे उपस्थित होते. मुख्याध्यापक अश्विनी लांबतुरे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन शाळेतील शिक्षक आनंद सामल यांनी केले. आभार प्रीती लवंड याने मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षिका स्वाती शिंदे, प्रेमा कोरे, संगणक शिक्षिका अरुणा कदम, साक्षी, प्रसन्नकुमार देऊनूर यांचे सहकार्य लाभले.

# मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ मार्च-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे प्र.मुख्याध्यापक मा.श्री रमेश दिंडोरे होते. तर प्रमुख अतिथी बसवराज कोरे, अण्णाराया तुप्पद होते. प्रमुख अतिथी यांच्या हस्ते डॉ.सी.व्ही.रमण यांच्या प्रतिमेचे पूजन केले.

श्री बसवराज कोरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष रमेश दिंडोरे यांनी आपल्या मार्गदर्शनात ज्ञान, विज्ञान आणि निरीक्षण यांचा अभ्यास करून जीवनामध्ये यशस्वी व्हा असे आवाहन केले.

यावेळी बाबूराव कल्लशेट्टी, भारत राऊत, अनिलकुमार गावडे, दत्तात्रय अगरखेड,गंगाराम घोडके, महेश चिवरे,अमरनाथ कदारे, संतोष स्वामी, गणेश कोरे, अनिता हौदे, प्रतिक्षा बिडवे प्रयोगशाळा परिचर राजू राऊतराव उपस्थित होते.

प्रास्ताविक संतोष हिरेमठ यांनी केले. सूत्रसंचालन सुकेशनी गंगोडा यांनी केले तर आभार प्रिया पसारे यांनी मानले.

## शहरात मराठी दिन उत्साहात



### नेताजी शिक्षण संकुल

नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्राथमिक शाळा व माध्यमिक प्रशालेत मराठी भाषा गौरव साजरा करण्यात आला. प्रथम मुख्याध्यापक रविशंकर कुंभार यांच्या हस्ते ज्येष्ठ साहित्यिक कुसुमाग्रज उर्फ विष्णू वामन शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, ज्येष्ठ मराठी शिक्षक राजकुमार मरगुरे, प्रशांत स्वामी, मीनाक्षी वांगीकर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी मराठी मायबोली, मराठी माझी शान आणि या बालांनो या रे या' हे समूहगीते सादर केले.अर्णव इंगळे, संस्कार हिरेमठ, हर्षद क्यातन, साईदीप मासपत्री, गौतम रच्चा, दिया चपळगे, श्राव्या नडगिरी, तन्वी जोजन, श्रावणी नागठाण, श्रीनिधी कुसमगी, अक्षरा वड्डेपल्ली आदी विद्यार्थ्यांनी मराठी भाषा गौरव गीत सादर केले. मुजरिम मुल्ला व वैष्णवी वाले या विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचे महत्त्व सांगितले. सूत्रसंचालन भारती पाटील यांनी केले तर शिवानंद पुजारी यांनी आभार मानले.



### श्री नूतन प्रशाला

विजापूर रोडवरील नूतन प्रशालेत मराठी दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अनंत कुमार रणदिवे उपस्थित होते. मुख्याध्यापक शहापुरे सर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. याच कार्यक्रमाचे औचित्य साधून प्रशालीमध्ये, काव्यवाचन स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, प्रश्नमंजुषा, अभिनय स्पर्धा, साहित्यिकांची माहिती, मराठी भाषेतील पारिभाषिक शब्द, वादविवाद स्पर्धा, घेण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बिडकर, बिराजदार, एलके यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन स्नेहल भोपे, प्रास्ताविक तेजश्री बोराडे, आभार रोशनी चव्हाण यांनी मानले.



### सोशल उर्दू हायस्कूल

सोशल असोसिएशन उर्दू हायस्कूलमध्ये ज्ञानपीठ पुरस्कार विजेते श्रेष्ठ कवी कुसुमाग्रज उर्फ विष्णू वामन शिरवाडकर यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात कुराण पठणाने केली. मुख्याध्यापक रसूल चौधरी यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषविले पर्यवेक्षिका यास्मिन शेख यांनी मराठी भाषेचे महत्त्व विशद केले. प्रास्ताविक राहिल मुल्ला यांनी केले. कार्यक्रमास उपमुख्याध्यापक इम्तियाज शाब्दी, पर्यवेक्षक अल्ताफ कुमठेउपस्थित होते. सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. सूत्रसंचालन वसीम सागर यांनी केले तर सुमैय्या शेख यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महंमद हुसेन तांबोळी, मझहरखान पठाण, तस्लीम तडकल, आफ्रीन मुजावर, आस्मा जमादार यांनी परिश्रम घेतले.

# सोलापूर विद्यापीठात ड्रोन मॅपिंग कार्यशाळेचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ मार्च-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ भूशास्त्र संकुल आणि द.भै.फ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय दोन दिवसीय ड्रोन-आधारित प्रत्यक्ष प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन संपन्न झाले.




यावेळी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी पर्यंत काही ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर आधुनिक युगात अत्यंत महत्त्वाचा झालेला आहे आपण विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाकडे वळणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन केले. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यशाळेचे संयोजक डॉ. वीरभद्र दंडे, विभागप्रमुख, भूगोल विभाग, डी.बी.एफ. दयानंद महाविद्यालय आणि डॉ. विनायक पी. धुळप, संचालक, भूशास्त्र संकुल, कार्यशाळेचे समन्वयक अतिश धेंडे, डॉ. महादेव लवटे उपस्थित होते. आभार डॉ. व्ही.सी. दंडे यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी डॉ. चेतन हुलसुरे, डॉ. धानेश लिगाडे, प्रा. ज्योती लातुरे, प्रा. पूजा होळीकट्टी, डॉ. अनिल येडगे, डॉ. मंगेश वेदपाठक, प्रा. अक्षय चव्हाण, प्रा. प्रशांत उन्हाळे, प्रा. सिद्धाराम चौगुले, प्रा. मृण्मयी गवळी, प्रा. अतिश धेंडे, प्रा. महेश कंदी उपस्थित होते.

# लोकमंगल प्रशालेत विज्ञान दिनी रंगल्या विविध स्पर्धा

## अथर्व हावळे, मानवी विटकर ठरले प्रथम क्रमांकांचे मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ मार्च-**

राष्ट्रीय विज्ञान दिनी अवंतीनगर येथील लोकमंगल माध्यमिक प्रशालेत विविध स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या. विज्ञान प्रयोग स्पर्धेत अथर्व हावळे तर विज्ञान रांगोळी स्पर्धेत मानवी विटकर प्रथम क्रमांकांचे मानकरी ठरले.

राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून दरवर्षी लोकमंगल माध्यमिक प्रशालेत विविध स्पर्धा घेतल्या जातात. याही वर्षी या स्पर्धा घेण्यात आल्या. विज्ञान प्रयोग सादरीकरण आणि विज्ञान रांगोळी



अशा दोन्ही स्पर्धामध्ये या वर्षी बेचाळीस मुला-मुलिंनी सहभाग घेतला. मुलांनी विविध प्रयोज सादर करून, आणि रांगोळीच्या माध्यमातून विज्ञान समजावून सांगितले. विज्ञान प्रयोग स्पर्धेत समीर साबळे याने द्वितीय क्रमांक पटकाविला. तर विज्ञान रांगोळी स्पर्धेत ओम काळे याने द्वितीय तर देवयानी लोकरे हिने तृतीय आणि अर्पिता बुजुरके हिने उत्तेजनार्थ क्रमांक पटकाविला.

यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका शुभांगी साठे-काशिद यांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविन्यात आले. यावेळी मंचावर प्रियांका साठे, रतिकांत म्हमाणे, संतोष दळवी, सचिन खराडे, मंजूषा पाटील यांची उपस्थिति होती. यावेळी मुख्याध्यापिका शुभांगी साठे-काशिद यांनी मुलांना विज्ञानाचे महत्व समजाऊन सांगितले. त्या म्हणाल्या की, उद्याचे जग हे विज्ञानाचे आहे. मुलानी याची कास धरायला हवी. वैज्ञानिक दृष्टिकोणच भारताला विश्वगुरु बनवू शकतो. त्यामुळे लहानपना पासून मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन पेरने गरजेचे आहे. प्रारंभी विज्ञान शिक्षिका प्रिती कांबळे-थोरे यांनी प्रास्ताविक केले. समीर काकडे यांनी सूत्रसंचालन केले तर आभार सुलताना मुलाणी यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

CMYK



अजित पवारांचे विमान एका झाडाला धडकले आणि खाली कोसळले, अशी जर तकलादू थेअरी देत असतील तर यातून अजितदादांचा अपघात नाही तो घातपातच असल्याचे स्पष्ट होते आहे.
**-विजय वडेट्टीवार**, नेते


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

**सोलापूर**, सोमवार, २ मार्च २०२६






युद्धाच्या काळात भारताने काय भूमिका घ्यावी, यासाठी केंद्रीय पातळीवर नेते आणि अधिकारी बसलेले आहेत. संजय राऊतांनी यामध्ये नाक खुपसण्याची गरज नाही. भारत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात सक्षम आणि समर्थपणे पुढे जात आहे.
**-नवनाथ बन**, भाजपा प्रवक्ते

# आधी इंटरनेट बंद पाडले; नंतर क्षेपणास्त्रे डागली

- खामेनेईंचा खात्मा करण्यासाठी १२०० बॉम्ब टाकले
- सायबर हल्ल्याने इराणी लष्कर गोंधळले





◆ **तेल अवीव, १ मार्च**

जिनेव्हा येथे गुरुवारी झालेल्या चर्चेच्या वाटाघाटीत इराणने अण्वस्त्र विकास कार्यक्रम पूर्णपणे बंद करण्याची मागणी फेटाळली. त्यानंतर अमेरिका-इस्रायलने इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई आणि वरिष्ठ नेत्यांचा खात्मा करण्याची योजना तयार केली. इराणला चर्चेत गुंतवून अचानक शनिवारी सकाळपासूनच हल्ले करण्यास सुरुवात केली. त्याचवेळी इराणच्या महत्त्वाच्या कार्यालयांवर सायबर हल्ले करण्यात आले आणि इंटरनेटमध्ये बाधा आणली गेली. यामुळे इराणी लष्कराची तारांबळ उडाली. खामेनेईला ठार करण्यासाठी २४ तासांत १२०० बॉम्बचा मार करण्यात आला.

खामेनेईंना ठार करण्यासाठी अमेरिका-इस्रायलने आखलेल्या रणनीतीसंदर्भातील माहिती वॉशिंग्टन पोस्टच्या अहवालात देण्यात आली. इराणवर शनिवारी हल्ला करण्यापूर्वी इंटरनेट बंद पडले होते आणि प्रमुख कार्यालयांच्या संकेतस्थळांवर अनेक सायबर हल्ले करण्यात आले. यानंतर इराणच्या सागरी सीमेवर तैनात अमेरिकेच्या युद्धनौका आणि इस्रायली लढाऊ विमानांनी तेहरानसह विविध १२ शहरात हल्ले चढविले. खामेनेईंचा खात्मा करणे या हल्ल्याचा उद्देश होता. सायबर हल्ले आणि इंटरनेट पुरवठा बंद पडल्याने इराणची लष्करी तळे, हवाई तळे, माध्यमे आणि सार्वजनिक संपर्कावरही परिणाम झाला. पर्यायाने इराणी लष्कराला ताबडतोब हल्ले करणे शक्य झाले नाही. देशभरातील इंटरनेट कनेक्टिव्हिटीमध्ये सुमारे ४ टक्क्यांपर्यंत घट झाली होती. लोकांच्या मोबाईलवर इराणने आत्मसमर्पण केल्याच्या सूचना आल्या. यामागील उद्देश केवळ नेटवर्कमध्ये व्यत्यय आणणे नव्हते, तर लोकांचे मनोबल कमकुवत करणे होते. *(वृत्तसंस्था)*

### कार्यालयात बैठक सुरू असताना क्षेपणास्त्रांचा मारा

**इराणची सरकारी वृत्तसंस्था आयआरएनएने दिलेल्या माहितीनुसार ज्यावेळी खामेनेई यांच्या कार्यालयावर क्षेपणास्त्राचा मारा करण्यात आला, त्यावेळी ते लष्करी अधिकाऱ्यांसोबत बैठक घेत होते. अचानक झालेल्या हल्ल्यात संपूर्ण इमारत उद्ध्वस्त झाली. ढिगाऱ्यातून खामेनेई आणि इतर नेत्यांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले.**



### कोण होते अयातुल्ला खामेनेई?

- १९३९ मध्ये इराणच्या मशहद या शहरातील एका धार्मिक कुटुंबात खामेनेई यांचा जन्म झाला.
- त्यांनी मशहदमधील मदरशांमध्ये धार्मिक शिक्षण घेतले आणि नंतर ते पुढील शिक्षणासाठी कोम शहरात गेले.
- १९६२ पासून खामेनेई यांनी इराणचे तत्कालीन सम्राट मोहम्मद रझा पहलवी (शहा) यांच्या विरोधात राजकीय हालचाली सुरू केल्या.
- अयातुल्ला अली खामेनेई यांना इराणच्या इस्लामी क्रांतीच्या आधी अनेकदा तुरुंगवासही भोगावा लागला.
- १९६० च्या दशकात ते काही काळ देशाबाहेर हद्दपार झाले होते, पण १९७९ च्या क्रांतीनंतर ते पुन्हा इराणमध्ये परतले.
- इराणच्या क्रांतीनंतर खामेनेई सत्तेच्या केंद्रस्थानी आले. त्यांनी इराणच्या क्रांतिकारी परिषदेवर काम केले.
- इराणच्या संरक्षण मंत्रालयाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनी देशात इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कोअरची स्थापना केली
- एका भीषण स्फोटात गंभीर जखमी झाल्यानंतर त्यांचा उजवा हात कायमस्वरूपी अकार्यक्षम झाला.




# अरब देशात अडकले ९० लाख भारतीय

## मायदेशी परतण्याचे आव्हान, दूतावासाच्या संपर्कात राहण्याच्या सूचना

◆ **नवी दिल्ली, १ मार्च**

अमेरिका-इस्रायलचे इराणवर सुरू असलेले संयुक्त हल्ले आणि प्रत्युत्तरात इराणकडून अरब देशांवरील हल्ल्यामुळे या भागात अडकलेल्या भारतीयांच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. युद्धाच्या सावटाखाली अरब देशांमध्ये जवळपास ९० लाख भारतीय अडकले असून त्यांना मायदेशी परत आणण्याचे मोठे आव्हान सरकारपुढे आहे.

युद्धाच्या पृष्ठभूमीवर भारतीय परराष्ट्र मंत्रालय आणि विविध देशांतील दूतावासांनी तेथे राहणाऱ्या भारतीय नागरिकांसाठी तातडीची मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. भारतीय नागरिकांना घराबाहेर न पडण्याचा आणि दूतावासाच्या संपर्कात राहण्याचा सल्ला दिला आहे.



### व्हिसा मुदतवाढीची विनंती

**इराणवरील हल्ल्यानंतर मध्य पूर्वेतील हवाई मार्ग बंद करण्यात आला आहे, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय उड्डाणे विस्कळीत आहेत. भारत सरकारने नऊ देशांना भारतीय नागरिकांसाठी व्हिसा मुदतवाढीची विनंती केली आहे. सरकारने या नागरिकांना व्हिसा मुदतवाढीसाठी संबंधित अधिकाऱ्यांशी त्वरित संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.**

### ४४४ आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द

**इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांच्या निधनानंतर मध्य पूर्वेतील तणाव वाढला आहे. यामुळे हवाई वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली. एअर इंडियाने रविवारी २२ आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. मध्य पूर्वेतील हवाई क्षेत्र बंदीमुळे १ मार्च रोजी विविध भारतीय विमान कंपन्यांची सुमारे ४४४ आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द झाली.**

इराणने कतार, बहरीन, कुवेत, सौदी अरेबिया, जॉर्डन आणि अबुधाबी (यूएई) येथील अमेरिकन नौदल तळांना लक्ष्य केले आहे. या भागात ८८ लाख ४९ हजार भारतीय राहतात. यात अप्रवासी भारतीय आणि भारतीय वंशांच्या नागरिकांचा समावेश आहे. इस्रायलच्या उत्तरेला लेबनान, उत्तर-पूर्वेला सीरिया, पूर्वेला जॉर्डन व दक्षिण-पश्चिम भागाला इजिप्त देश आहे. या चारही देशांमध्ये २४,६३० भारतीय राहतात. युद्धस्थिती लक्षात घेता या भागातील भारतीयांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. भारतीय दूतावासांनी नऊ देशांतील नागरिकांना विशेष काळजी घेण्याचा सल्ला दिला आहे. आपत्कालीन परिस्थितीत संपर्क साधण्यासाठी काही नंबर जारी करण्यात आले आहेत. अनावश्यक प्रवास टाळण्याच्या सूचना दिल्या असून आवश्यकता पडल्यास विशेष विमानांची सोय करणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. *(वृत्तसंस्था)*

### कोणत्या देशात किती भारतीय?

| देश | संख्या |
|---|---|
| इराण | १०,७६५ |
| इस्रायल | १,२३,००० |
| कतार | ८,३०,४९१ |
| बहरिन | ३,४६,८५६ |
| कुवैत | १०,१०,३१७ |
| सौदी अरब | २७,४७,५५१ |
| जॉर्डन | १७,०५० |
| यूएई | ३८,९७,५६७ |
| इजिप्त | ५,५०० |
| लेबनॉन | २,०४१ |
| सीरिया | ३९ |

◆ **तेहरान, १ मार्च**

खामेनेई यांनी तब्बल ३६ वर्षे इराणची सत्ता सांभाळली. सर्वोच्च नेते होण्यापूर्वी ते देशाचे राष्ट्राध्यक्ष आणि संरक्षणमंत्रीही होते.

# मौलवीपासून सर्वोच्च नेत्यापर्यंतचा खामेनेईंचा प्रवास

## ३६ वर्षे सांभाळली इराणची सत्ता

एका सामान्य मौलवीपासून सर्वोच्च नेते बनण्याचा त्यांचा प्रवास संघर्षमय राहिला. त्यांचा जन्म १९ एप्रिल १९३९ रोजी मशहद येथे झाला. लहान वयातच त्यांनी धार्मिक शिक्षण घ्यायला सुरुवात केली. कूममध्ये खामेनेई यांची भेट इस्लामी क्रांतीचे जनक अयातुल्ला रुहुल्लाह खुमैनी यांच्याशी झाली. खुमैनी यांच्या विचारांनी खामेनेई यांच्या जीवनाला नवे वळण दिले आणि हळूहळू ते त्यांच्या सर्वात विश्वासू शिष्यांपैकी एक बनले.

**खुमैनी यांचे ठरले वारसदार**

१९८९ मध्ये अयातुल्ला रुहुल्लाह खुमैनी यांचे निधन झाले. त्यानंतर अली खामेनेई यांची इराणचे नवे सर्वोच्च नेते म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या कारकीर्दीत इराणने आपला अणू कार्यक्रम वेगाने पुढे नेला. यामुळे अमेरिका आणि इस्रायलसोबतचे संबंध अधिकच तणावपूर्ण आणि शत्रुत्वाचे झाले. खामेनेई यांची ओळख एक कठोर आणि कट्टर विचारसरणीचे नेते अशी होती.

**इराणचे भविष्य काय?**

खामेनेई यांच्या निधनानंतर आता सर्वात मोठा प्रश्न उत्तराधिकाऱ्याचा आहे. इराणने लवकरच नव्या सर्वोच्च नेत्यांची घोषणा केली जाईल. संभाव्य उत्तराधिकारी म्हणून खामेनेई यांचे पुत्र मोजतबा खामेनेई आणि इराणचे संस्थापक अयातुल्ला खुमैनी यांचे नातू हसन खुमैनी यांची नावे चर्चेत आहेत. *(वृत्तसंस्था)*

# पाकिस्तानचा पुन्हा अफगाणवर हवाई हल्ला

**बगराम हवाई तळावर बॉम्बचा मारा**

**२५ तालिबानी ठार**

**५० पेक्षा अधिक जखमी**



◆ **काबूल, १ मार्च**

पाकिस्तानी वायुदलाने अफगाणिस्तानची राजधानी काबुलमधील बगराम हवाई तळासह विविध शहरात रविवारी पहाटे हवाई हल्ले चढविले. यात २५ तालिबानी सैनिक ठार, तर ५० पेक्षा अधिक जखमी झाले.

बगराम हवाई तळावर आणि काबुल शहरावर पाकिस्तानी वायुदलाने जोरदार हल्ले चढविले. याला प्रत्युत्तर देत तालिबानी फौजांनी जोरदार गोळीबार आणि बॉम्बचा मारा केला. हवाई तळावरील हल्ल्यात २५ तालिबानी सैनिक ठार, तर ५० पेक्षा अधिक जखमी झाल्याची पुष्टी तालिनाबानी सरकारच्या प्रवक्त्याने केली. अमेरिका आणि इस्रायल संयुक्तपणे इराणवर कारवाई करीत असताना, पाकिस्तानी हवाई दलाने अफगाणिस्तानवर हल्ले तीव्र केले. दोन्ही देशांच्या सीमेवर गोळीबार आणि तोफगोळ्याचा मारा केला जात आहे. पाकिस्तानी लष्कराने रविवारी हल्ल्याची पुष्टी केली आणि दहशतवाद्यांचा खात्मा होईपर्यंत कारवाई सुरूच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**दोन दिवसांत ११० पाकिस्तानी सैनिक ठार**

तालिबान सरकारचे प्रवक्ते जबीहुल्ला मुजाहिद यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले की, पाकिस्तानने रविवारी काबुल, कंधार आणि इतर शहरात हल्ले केले. प्रत्युत्तर म्हणून तालिबानने केलेल्या कारवाईत ११० पाकिस्तानी सैनिक ठार झाले, तर ६८ जखमी आहे. तालिबानी फौजांनी पाकिस्तानी सीमेसवरील अनेक चौक्यांवर ताबा मिळविला आहे. त्यांच्या सैनिकांची शस्त्रे ताब्यात असल्याचे त्यांनी सांगितले.

**पाकिस्तानमध्ये ड्रोन हल्ले**

तालिबान संरक्षण मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले की, त्यांच्या सैन्याने पाकिस्तानी सैन्याविरुद्ध सतत कारवाई केली आणि २७ लष्करी चौक्या ताब्यात घेतल्या. तालिबान ड्रोनने पाकिस्तानमधील लष्करी सुविधांना लक्ष्य केल्याचा दावाही त्यांनी केला. दुसरीकडे पाकिस्तानचे माहिती मंत्री अताउल्लाह तरार यांनी दावा केला आहे की पाकिस्तानने लष्करी कारवाई सुरू केल्यापासून ३३१ तालिबानी सदस्य मारले गेले आहेत. *(वृत्तसंस्था)*

# मध्य पूर्वेतील संघर्षाचा भारताच्या व्यापाराला फटका

## अर्थव्यवस्थेवर परिणाम, तेलाचे दर गगनाला भिडले

◆ **नवी दिल्ली, १ मार्च**

इराण आणि अमेरिका-इस्रायलमध्ये सुरू झालेल्या युद्धामुळे संपूर्ण मध्य-पूर्वेत तणाव वाढला आहे. संघर्ष लांबल्यास याचा परिणाम जगभरातील व्यापारावर होण्याची शक्यता आहे. सध्या मध्य- पूर्वेतील देशांत भारतातून होणारी आयात-निर्यात ठप्प असून, सागरी मार्गाने होणारी वाहतूकदेखील बंद आहे. अशातच कच्च्या तेलाचे दर प्रती बॅरल शंभर डॉलर्सच्या वर पोहोचले आहेत.

भारत आणि इराणमधील व्यापार खूप मोठा नसून तो प्रामुख्याने औषधे आणि फळांपुरता मर्यादित आहे. त्यामुळे सध्याच्या तणावाचा दोन्ही देशांमधील व्यापारावर थेट मोठा परिणाम होण्याची शक्यता कमी आहे आणि भारतीय अर्थव्यवस्थेवरही याचा मर्यादित परिणाम होऊ शकतो. मात्र, संघर्षामुळे इस्रायलसोबतच्या व्यापारावर परिणाम होऊ शकतो. गेल्या आर्थिक वर्षात (२०२४-२५) भारत आणि इराणमध्ये १६८ कोटी डॉलर्सचा व्यापार झाला, जो भारताच्या एकूण द्विपक्षीय व्यापाराच्या (१.७४ लाख कोटी डॉलर) केवळ ०.०१ टक्के आहे. सुमारे सहा वर्षांपूर्वी (२०१८-१९) दोन्ही देशांमध्ये १७०३ कोटी डॉलर्स व्यापार झाला होता. या व्यापारात झालेली मोठी घट प्रामुख्याने अमेरिकेच्या निर्बंधांमुळे इराणकडून होणाऱ्या कच्च्या तेलाच्या आयातीत झालेल्या कपातीमुळे आहे.

**इराणसोबचा व्यापार ठप्प**

दोन दिवसांपासून सुरू असलेल्या संघर्षामुळे भारतातून इराण आणि इस्रायलमधील व्यापार ठप्प आहे. २०२४-२५ च्या आकडेवारीनुसार, इराणमधून भारतात ४४ कोटी डॉलर्सचा माल आला, तर भारताने इराणला १२४ कोटी डॉलर्सचे साहित्य पाठविले. भारताची इराणला होणारी मुख्य निर्यात बासमती तांदूळ, चहा, साखर, ताजी फळे आणि औषधी आहे, तर सफरचंद, पिस्ता, खजूर आणि किवी तेथून आयात केले जाते. *(वृत्तसंस्था)*

### आयातीवर कोणते परिणाम दिसू शकतात?

**तज्ज्ञांच्या मते द्विपक्षीय करारांव्यतिरिक्त, मध्य पूर्वेतील तणावाचा जागतिक परिणाम होऊ शकतो. आशिया आणि युरोपला जोडणारा एक महत्त्वाचा मार्ग असलेल्या रेड सी कॉरिडॉरमधील समस्या मालवाहतूक आणि विमा खर्च वाढवू शकतात. भारताचा ऊर्जा आणि मध्यवर्ती वस्तूंच्या आयातीवरील खर्च वाढू शकतो. होर्मुझ सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे भारतावर लक्षणीय परिणाम होऊ शकतो.**




# मंगळावर आढळले खडकाळ रंगाचे 'बॉक्सवर्क'

◆ **वॉशिंग्टन, १ मार्च**

'नासा'च्या क्युरिऑसिटी रोव्हरने मंगळ ग्रहाच्या पृष्ठभागावर पसरलेल्या एका विशाल 'कोळिष्टका'सारख्या संरचनेचे चित्तवेधक फोटो काढले आहेत. याला 'बॉक्सवर्क' असे नाव देण्यात आले आहे. यातील एका फोटोमध्ये अंड्यासारखे गोलाकार दगड दिसून आले असून शास्त्रज्ञ सध्या त्यांच्या निर्मितीचा उलगडा करण्याचा प्रयत्न करत आहेत. मागील आठ महिन्यांपासून क्युरिऑसिटी रोव्हर 'गेल क्रेटर'मधील माऊंट शार्पच्या उतारावर असलेल्या एकमेकांशी जोडलेल्या खडकाळ रांगांचा अभ्यास करत आहे.

**फोटोमध्ये दिसले अंड्यासारखे गोलाकार दगड**



### रांगांची उंची ३ ते ६ फूट

**'नासा'ने नुकतेच प्रसिद्ध केलेल्या फोटोंमध्ये या संरचनेचे सूक्ष्म तपशील समोर आले आहेत. यात खडकाळ भिंती दिसते आहेत. जमिनीपासून या रांगांची उंची ३ ते ६ फूट आहे. २१ ऑगस्ट रोजी काढलेल्या एका 'क्लोज-अप' फोटोमध्ये या रांगांवर लहान, अनियमित आकाराचे ढेकूळ किंवा 'अंडी' सदृश गोलाकार भाग दिसून आले आहेत. असे भाग यापूर्वी कधीही पाहिले गेले नव्हते.**

सुमारे २० किलोमीटर परिसरात पसरलेल्या या रांगा अब्जावधी वर्षांपूर्वी मंगळाच्या पृष्ठभागाखालील भूजलामुळे तयार झाल्या असाव्यात, असा अंदाज आहे. २००६ मध्ये पहिल्यांदा उपग्रहाद्वारे या रांगा दिसल्या होत्या. मात्र, प्रथमच एखादे यान इतक्या जवळून त्यांचा अभ्यास करत आहे. हे 'कोळिष्टक' म्हणजे मंगळावर दिसणारे प्रसिद्ध 'स्पायडर' नव्हेत, असे शास्त्रज्ञांनी स्पष्ट केले आहे. हे 'स्पायडर' कार्बन डाय ऑक्साईडचा बर्फ वितळल्यामुळे तयार होतात. याउलट 'बॉक्सवर्क' हे खनिजांनी समृद्ध असलेल्या खडकांच्या एकमेकांना छेदणाऱ्या रांगा आहेत.

हे गोलाकार भाग गेल्या वर्षी 'परसेव्हरन्स' रोव्हरला जेझेरो क्रेटरमध्ये आढळलेल्या रहस्यमय 'स्पायडर एग' दगडासारखेच दिसत आहेत. हे गोलाकार भाग तिथेच का तयार झाले, याचे स्पष्टीकरण आमच्याकडे सध्या नाही. कदाचित प्रथम खनिजांमुळे रांगा तयार झाल्या असाव्यात आणि नंतर भूजलाच्या प्रवाहामुळे त्यांच्याभोवती हे गोलाकार भाग जमा झाले असावेत, असे राईस युनिव्हर्सिटीच्या शास्त्रज्ञ टीना सीगर यांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*

### दिव्यांग मुलीवर अत्याचार

◆ **लखीमपूर खेरी, १ मार्च**


लखीमपूर खेरी येथील सिंगाही पोलिस स्टेशन परिसरातील एका गावात एका दिव्यांग अल्पवयीन मुलीवर दोन नराधमांनी बलात्कार केला. शनिवारी रात्री घडलेल्या या घटनेमुळे परिसरात तणाव निर्माण झाला.

प्रकरणाची संवेदनशीलता लक्षात घेता, माहिती गोळा करण्यासाठी पोलिस अधिकारी घटनास्थळी पोहोचले. तपासादरम्यान, रात्री उशिरा पोलिसांची आरोपींसोबत चकमक झाली. यात एका आरोपीच्या पायाला गोळी लागली. तर दुसरा आरोपी पळून गेला. वृत्तानुसार, मुलगी एका कौटुंबिक कार्यक्रमासाठी तिच्या नातेवाईकाच्या घरी होती. दोन तरुणांनी तिला जवळच्या शेतात नेऊन तिच्यावर बलात्कार केला. *(वृत्तसंस्था)*

## चित्रपट वार्ता

### 'राणाबाली' चित्रपटाचा फर्स्ट लूक जारी

**मुंबई :** साउथ स्टार रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडा यांच्या आगामी चित्रपट 'राणाबाली'चा फर्स्ट लूक आणि गाणे प्रदर्शित करण्यात आले आहे. निर्मात्यांनी समाज माध्यमावर एक व्हिडीओ शेअर करून या जोडप्याला लग्नाच्या शुभेच्छाही दिल्या. चित्रपटाच्या निर्मात्यांनी इंस्टाग्रामवर शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये रश्मिका आणि विजयच्या म्हणजेच राणाबाली आणि जयम्मा या पात्रांच्या लग्नाशी संबंधित सुंदर क्षण दाखवले आहेत. याचबरोबर चित्रपटाचे पहिले गाणे 'एंधय्या साथी' /'ओ मेरे साजन' देखील प्रदर्शित करण्यात आले आहे. हा ट्रॅक विशेषतः चित्रपटातील लग्नाच्या दृश्याला गुंफतो आणि प्रेक्षकांना १९व्या शतकातील वातावरणात रोमँटिक जादूचा अनुभव देतो.




### अक्षयने केले 'भूत बंगला'चे अनोखे प्रमोशन




**मुंबई :** डोके नसलेल्या भूतासोबत खळखळून हसतानाचा अक्षय कुमारचा व्हिडीओ समाज माध्यमावर व्हायरल झाला आहे. व्हायरल क्लिपमध्ये अक्षय एका डोके नसलेल्या भूतासोबत फिरताना दिसतो आणि अत्यंत गंभीरपणे त्याला भूत खरेच असतात का, असे विचारतो. यानंतर भूत मजेशीर अंदाजात स्वतःलाच माहीत नाही, असे उत्तर देतो. हा प्रोमो अक्षय कुमारच्या आगामी हॉरर-कॉमेडी चित्रपट भूत बंगलाचा आहे. चित्रपटात भीतीदायक वातावरणात कॉमेडीचा तडका दिसणार आहे. व्हिडीओ पाहून निर्मात्यांनी प्रमोशनसाठी एक वेगळा आणि क्रिएटिव्ह मार्ग निवडला असल्याचे स्पष्ट होते.

### मार्चमध्ये ओटीटीवर प्रदर्शित होणार 'या' वेबसिरीज

**मुंबई :** सारा अली खान आणि पंकज त्रिपाठी यांचा रहस्यमय चित्रपट 'मर्डर मुबारक' मार्च महिन्यात नेटफ्लिक्सवर येत असून एका पार्टीतील हत्येभोवती याची कथा फिरते. मनोज बाजपेयी यांची लोकप्रिय मालिका 'फॅमिली मॅन ३' ॲमेझॉन प्राइमवर येण्याची चर्चा असून पुन्हा एकदा गुप्त मोहिमेची थरारक कथा दिसणार आहे. ज्युनिअर एनटीआर आणि जान्हवी कपूर यांचा भव्य साऊथ चित्रपट 'देवारा' मार्चमध्ये येणार आहे. अबिशन जीविंथ आणि अनस्वार राजन यांची 'कॉमेडी विथ लव्ह' ही वेबसीरिज नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे. विनित कुमार सिंह प्रमुख भूमिकेत असलेली 'हॅलो बच्चों' ही मालिका ६ मार्च रोजी नेटफ्लिक्सवर येत असून विद्यार्थ्यांच्या परीक्षा आणि आर्थिक अडचणींवर प्रकाश टाकते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# आत्मघातकी खामेनेई आणि जग

रमजानचा पवित्र महिना सुरू असताना मुस्लिम जगतासाठी रविवारची सकाळ दु:खद बातमी घेऊन आली. शनिवारी सकाळी अमेरिका आणि इस्रायलच्या लढाऊ विमानांनी इराणची राजधानी तेहरानवर बॉम्बवर्षाव केला. लक्ष्य होते तेहरानमधील खामेनेई यांचे निवासस्थान आणि कार्यालय. कधीकाळी इराणचे शासक मोहम्मद रझा पहेलवी यांचा राजवाडा म्हणून प्रसिद्ध इमारत ताब्यात घेऊन त्याला खामेनेई यांचे निवासस्थान आणि कार्यालयात रूपांतरित केले गेले. विशेष म्हणजे हा राजवाडा हंगेरीयन ज्यू अभियंत्याने डिझाईन केला होता. गेल्या जवळपास चार दशकांपासून खामेनेई राजवटीचे केंद्र असलेल्या या निवासस्थानावर शनिवारी सकाळी साडेआठ वाजताच्या सुमारास प्रचंड शक्ती असलेले ३० बॉम्ब टाकण्यात आले. जमिनीच्या पोटात खोलवर घुसलेल्या बॉम्बचे स्फोट झाल्याने खामेनेई यांचे निवासस्थान बेचिराख झाले. हल्ल्यात इराणचे सर्वोच्च धार्मिक नेते, सुप्रीम कमांडर आयातोल्लाह सय्यद अली हुसेनी खामेनेई यांचा मृत्यू झाला. त्यांच्या कुटुंबातील अनेक जण या हल्ल्यात मारले गेले. खामेनेई मारले गेल्याचा दावा इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यानाहू यांनी शनिवारी मध्यरात्रीच केला होता; पण इराणने तो साफ शब्दात फेटाळून लावला होता. आमचे सर्वोच्च नेते सुखरूप असून ते लवकरच जनतेला संबोधित करतील, असेही इराणी लष्कराने म्हटले होते. याचदरम्यान खामेनेई यांच्याबाबत उलटसुलट बातम्या पसरल्या होत्या. ते उत्तर कोरियात आश्रयास गेल्याच्या काही बातम्या होत्या. पण, शेवटी नेत्यानाहू यांनी केलेला दावा खरा ठरला. रविवारी सकाळी इराणच्या सरकारी टीव्हीने खामेनेई यांचा मृत्यू झाल्याचे सांगितले. अफगाणिस्तान-पाकिस्तान यांच्यात सुरू असलेल्या संघर्षात आधीच दोन्ही बाजूंचे शेकडो सैनिक आणि नागरिक मारले गेले आहेत. मारले गेलेले सर्व मुसलमान आहेत. रमजान हे अल्लाहच्या जवळ जाण्याचे, उपवास करून जास्तीत जास्त पुण्य कमाविण्याचे आणि जन्नतचा मार्ग सुकर करण्याचे पर्व आहे. पण, दुर्दैवाने इस्लामचा उदय, प्रसार आणि उत्थानाची भूमी असलेल्या अरबस्थानावर युद्धाचे ढग पसरले आहेत.

सौदी आणि इराण यांच्यातून विस्तवही जात नाही. एवढेच नव्हे, तर सौदीच्या राजपुत्रानेच खामेनेई यांचा ठावठिकाणा सांगितल्याचा आरोप केला जात आहे. एखादी राजवट असो, राजसत्ता असो की हुकूमशहा, जे जनतेच्या भल्यासाठी, तिच्या विकासासाठी आणि उत्थानासाठी कार्य करणार नाहीत, त्या सर्वांचा अंत असाच झाल्याचे दाखले इतिहासात आहेत. गेल्या अनेक दशकांपासून इराणमध्ये जनतेचे दमन सुरू आहे. गेले काही महिने तर तो देश अशांत आहे. तेथे बुरख्याविरोधात रस्त्यावर उतरलेल्या महिला, युवतींवर प्रचंड अत्याचार झाल्याचे जगाने पाहिले आहे; अगदी दीड महिन्यापूर्वी खामेनेई यांच्याविरोधात रस्त्यावर उतरलेल्या आंदोलकांवर प्रचंड अत्याचार करण्यात आले. साडेसात हजारांहून अधिक नागरिकांना ठार मारण्यात आले. शेकडो बेपत्ता आहेत. ज्या शासकाला जनतेचे हित कळत नाही, दु:खाची जाणीव होत नाही, त्या शासकाला सत्तेवर राहण्याचा मुळीच अधिकार नसतो. कधी शरण जाऊन तर कधी पटत नसला, तरी तह करून लोकांचे जीव आणि संपत्ती सुरक्षित राखणे हे राजाचे, शासकाचे कर्तव्य असते. शत्रू प्रबळ झाल्यास अथवा त्याचा दबाव सहन करणे अशक्य असल्याची जाणीव झाल्यास दोन पावले माघार घेणे शहाणपणाचे लक्षण मानले जाते. अली खामेनेई हे ताडण्यात कमी पडले. स्वत:ला सर्वशक्तिमान आणि समर्थ समजण्याची चूक त्यांनी केली. कोणत्याही अंगाने अमेरिकेचा सामना करण्याची क्षमता इराणमध्ये नाही. अमेरिका किंवा इस्रायल यात पूर्णपणे निर्दोष आहेत, असे म्हणता येत नाही. पण इराणने मध्य पूर्वेत मित्र कमावले नाहीत आणि तुलनेत बलाढ्य शत्रूशी पंगा घेतला. धर्माचे नाव घेत आपल्याकडे नसलेल्या शक्तीचे प्रदर्शन करणे आणि अमेरिकेला धडा शिकविण्याची भाषा करणे खामेनेई यांना भोवले. डोनाल्ड ट्रम्प हे गेल्या दोन महिन्यांपासून अण्वस्त्रांच्या मुद्यावर चर्चा करण्याचे आवाहन करीत होते. इराणने अण्वस्त्रे तयार करू नयेत, एवढीच अमेरिकेची मागणी होती. ही मागणी मान्य केली असती तर पुढील अनर्थ टळला असता. वास्तविक पाहता मध्यपूर्वेत इराण हा शक्तिशाली देश मानला जातो. इस्रायल आणि अमेरिका हे देश इराणपासून हजारो किलोमीटर अंतरावर आहेत. त्यामुळे भारताला जसा पाकिस्तान, चीन यांचा थेट धोका आहे, तसा इराणला नाही. शक्तिशाली सैन्य दल, शस्त्र भंडारात हजारो क्षेपणास्त्रे, ड्रोन्स असणाऱ्या इराणवर हल्ला करण्याची क्षमता जगातील कोणत्याही मुस्लिम देशात नाही. खरे तर मुस्लिम जगाचे नेतृत्व करण्याची क्षमता या देशात आहे; पण अमेरिका, इस्रायलचा विरोध करण्याच्या हट्टापायी इराणने स्वत:ला युद्धाच्या आगीत झोकून दिले. ईश्वरी शक्ती आपल्याला युद्धात विजय प्राप्त करून देईल, अशी भाबडी आशा बाळगणारे अली खामेनेई यांना अखेर जीव गमवावा लागला. देशाची इभ्रत घालविली ती वेगळीच. अली खामेनेई हे अमेरिका आणि इस्रायल यांना कायम शत्रू मानत आले. ज्यूंना जिवंत राहण्याचा अधिकारच नाही, असे खामेनेई म्हणायचे. याचा अर्थ ८० लाख इस्रायलींचे अस्तित्वच त्यांनी धोक्यात आणले. अमेरिकेलाही त्यांनी धमक्या दिल्या. मध्यपूर्वेतील अमेरिकेच्या लष्करी तळांवर तैनात असलेल्या ४० हजार सैनिकांना लक्ष्य करण्यात येईल, अशी धमकी खामेनेई यांनी दिली. अस्तित्वावरच संकट निर्माण झाल्याने इस्रायलने अमेरिकेच्या मदतीने खामेनेईंना संपविण्याच्या मोहिमेत सहभाग घेतला. लष्करी क्षमता, शस्त्रास्त्रे, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि गुप्तहेरांचे जाळे या बाबतीत इराण इस्रायलच्या आसपासही नाही. अमेरिकेसारख्या शक्तिशाली देशाला आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यासारख्या नफेखोर, सनकी, कुटिल आणि युद्धखोर राष्ट्राध्यक्षाला आव्हान देणे म्हणजे विषारी सापाच्या बिळात हात घालण्यासारखे आहे. ही भयंकर चूक खामेनेई यांनी केली आणि त्याचीच जबर किंमत इराणला चुकवावी लागत आहे. आज केवळ इराणच नव्हे तर जगाला युद्धाच्या झळा पोहोचत आहेत. इराणचे लष्कर अजूनही माघार घ्यायला तयार नाही. सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात, कतार, ओमान या मुस्लिम देशांवर इराण क्षेपणास्त्रांनी हल्ले करीत आहे. या संघर्षाला शिया-सुन्नी वादाची किनारही आहे. खामेनेई मारले गेल्यानंतर पाकिस्तानात शिया समुदाय रस्त्यावर उतरला आहे. कराचीतील अमेरिकन दुतावासात घुसून तोडफोड करीत आग लावल्याचा प्रकार घडला आहे. भारतातही शिया समुदाय संताप व्यक्त करीत रस्त्यावर उतरला आहे. लखनौ आणि श्रीनगरमध्ये शियांनी इस्रायल आणि अमेरिकेच्या विरोधात नारेबाजी केली. भारतात होणारी ही आंदोलने केवळ धर्माच्या आधारावर आहेत. खामेनेई शिया असल्याने शिया मुस्लिम आंदोलन करीत आहेत. पण, जेव्हा पहलगाममध्ये २६ हिंदूंना धर्माच्या आधारावर गोळ्या घालून ठार मारले गेले तेव्हा हिंदू समाज वगळता कुणीही रस्त्यावर उतरले नाही. बांगलादेशात गेले वर्षभर हिंदूंचा अनन्वित छळ सुरू आहे.

१५ पेक्षा जास्त हिंदूंना मुस्लिमांनी ठार मारले; त्यांची संपत्ती लुटली, पण एकही गैरहिंदू संघटना अथवा नागरिकांनी रस्त्यावर उतरून निषेधाचा शब्दही काढला नाही. काश्मीर खोऱ्यात जेव्हा काश्मिरी ब्राह्मणांना ठार मारले, डोळ्यादेखत बलात्कार केले, त्यांची घरेदारे लुटली, घरे, जमिनींवर कब्जा केला तेव्हा एकही शिया मुस्लिम श्रीनगरमध्ये रस्त्यावर उतरला नाही. हिंदू समुदाय ह्या घडामोडी मनात साठवून ठेवतो आहे. ८६ वर्षीय शिया धार्मिक नेते खामेनेई यांच्या मृत्यूचे समर्थन केले जाऊ शकत नाही. कोणत्याही देशाच्या सर्वोच्च धार्मिक नेत्याला अशाप्रकारे जिवानिशी संपविण्याच्या इस्रायल-अमेरिकेच्या कृतीचा निषेध होईलच. कारण शांततामय जगात हिंसेला थारा नाही. पण, खामेनेई यांनी ज्या चुका केल्या, त्याचे परिणाम केवळ खामेनेई अथवा इराणलाच नव्हे तर जगाला भोगावे लागत आहेत. एकप्रकारे इराणने स्वत:सोबत उर्वरित जगालाही संकटात टाकले आहे. यातून लवकर मार्ग निघो आणि जगात शांतता नांदो, एवढीच अपेक्षा सध्या करता येते.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# युद्धाची किंमत

चार दिवसात संपणाऱ्या युक्रेन युद्धाने मागील आठवड्यात पाचव्या वर्षात पदार्पण केले. मागील चार वर्षांत रशियाने युक्रेनचा काही भूभाग काबीज केला असला, तरी याची फार मोठी किंमत रशियाला मोजावी लागली आहे. किमान १० वरिष्ठ लष्करी अधिकारी, काही लाख सैनिक, ५०० हून अधिक विमाने, हजारावर रणगाडे, काही युद्धनौका आणि प्रचंड दारूगोळा ही ती किंमत आहे. दुसऱ्या महायुद्धात बलाढ्य जर्मनीला पराभूत करणाऱ्या रशियासाठी ही कामगिरी निश्चितच अभिमान वाटावी अशी नाही.

**हुकूमशहांची समस्या** : प्रत्येक हुकूमशहाची एक समस्या असते. त्याला जमिनीवरील वास्तव दिसत नाही. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत गुप्तचर विभागाने इंदिरा गांधींना प्रचंड विजयाचा विश्वास दिला होता. निवडणुका घोषित झाल्यावर काँग्रेसच्या विरोधात वारे वाहू लागले होते. पण, त्याचाही अंदाज इंदिरा गांधींना करता आला नाही. त्या निवडणुकीत स्वत: इंदिरा गांधी, संजय गांधी, काँग्रेस पक्ष या तिघांचेही पानिपत झाले.

**जुगार उलटला** : रशियाचे राष्ट्रपती व्लादिमिर पुतिन हे कधी काळी केजीबी या गुप्तचर संस्थेत काम करणारे अधिकारी. आता त्यांच्या अधिकाऱ्यांनी त्यांची दिशाभूल करणारे अहवाल त्यांना दिले. केवळ चार दिवसात युक्रेनचा पाडाव होईल आणि हा देश रशियाच्या ताब्यात येईल, असा अहवाल त्यांना देण्यात आला होता. त्या आधारे त्यांनी युक्रेनवर हल्ला करण्याचा निर्णय घेतला. चार वर्षांनंतरही विजय त्यांच्या दृष्टिपथात नाही. एकेकाळी जगाची महासत्ता असणाऱ्या रशियाला युक्रेनसोबत शांतता चर्चा करावी लागत आहे. पुतिन यांना युद्ध संपविण्यासाठी एखादी सबब हवी आहे; ती शोधण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. युक्रेनचा जुगार एकप्रकारे त्यांच्यावरच उलटला आहे असे दिसते.

**युरोपचा पाठिंबा** : युक्रेनला युरोपचा पाठिंबा असल्याने त्या देशाला ही लढत देणे शक्य होत आहे हे मान्य केले तरी युक्रेन सैनिकांच्या शौर्यगाथा थक्क करणाऱ्या आहेत. एकीकडे युरोपमधील देशांनी पुरविलेली अत्याधुनिक शस्त्रास्त्रे आणि दुसरीकडे युक्रेनच्या सैनिकांची जिद्द या दोन घटकांमुळे पुतिन यांना अद्याप तरी युक्रेनवर आपला झेंडा फडकाविता आलेला नाही.

**युद्धाच्या झळा** : डिसेंबर-जानेवारीच्या थंडीत युक्रेनची सारी वीज निर्मिती व्यवस्था बंद पाडण्याचा प्रयत्न रशियाने केला. त्यात त्याला काही प्रमाणात यशही मिळाले. युक्रेनच्या जनतेला या थंडीचे जोरदार तडाखे बसले. युरोपमधून आता या देशाला ऊर्जा पुरविली जात आहे. राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर आल्यापासून अमेरिका कधी इकडे तर कधी तिकडे अशी भूमिका घेत असली, तरी युरोप व युरोपियन युनियन मात्र युक्रेनच्या पाठीशी खंबीरपणे उभा ठाकला असल्याचे दिसते. कारण रशियासाठी युक्रेन हे युरोपात जाण्याचे प्रवेशद्वार आहे. युरोपचा किल्ला शाबूत ठेवायचा असेल तर रशियाला युक्रेनमध्ये येऊ देता कामा नये, याची पूर्ण जाणीव युरोपातील देशांना आहे आणि त्यातून त्यांना युक्रेनाला पाठिंबा कायम ठेवला आहे.

**आता रशियाला झळा** : युक्रेनमधील नागरिकांना थंडीचे तडाखे बसत असताना, रशियातील नागरिकांना आता महागाईच्या झळा बसू लागल्या आहेत. रशियातील नागरिकांचे घरगुती अंदाजपत्रक या युद्धाने कोलमडून पडले आहे. दूध उत्पादक वस्तूंपासून ब्रेड, भाजीपाला याच्या किमती ५० टक्क्यांहून अधिक वाढल्या आहेत. प्रारंभीची तीन वर्षे रशियाची जनता युक्रेन युद्धामुळे प्रभावित झाली नव्हती; आज मात्र ती होत आहे. याने रशियात युद्धविरोधी वातावरण तयार होत आहे. याची कल्पना पुतिन यांनी कधी केली नव्हती. पुतिन यांना आता हे युद्ध संपवायचे आहे, याचे हे मुख्य कारण आहे. त्यासाठी त्यांना एखादी पळवाट हवी आहे. फक्त ती सन्मानजनक असावी, असा त्यांचा प्रयत्न आहे.

**फक्त चीनची सहानुभूती** : रशियाला या युद्धात फक्त चीनची सहानुभूती मिळत आहे. युक्रेनचे युद्ध रशियाने जिंकावे असे त्याला मनोमन वाटत असल्याचे सांगितले आहे. यात रशिया-चीन मैत्री यासोबतच दोन्ही देशांचा अमेरिका विरोध हे कारण असल्याचे दिसते. रशिया-चीन हे दोन साम्यवादी देश, हुकूमशाही देश जसे जवळ आले, त्याला उत्तर म्हणून जगातील दोन मोठ्या लोकशाही, भारत-अमेरिका जवळ येतील असे वाटत होते. पण, दुर्दैवाने ते अद्याप तरी झालेले नाही.

**नवा हुकूमशहा** : लोकशाही व्यवस्थेत हुकूमशहाला स्थान राहात नाही असे मानले जाते. पण, राष्ट्रपती ट्रम्प याला अपवाद ठरावेत. ट्रम्प ज्या पद्धतीने निर्णय घेत आहेत त्यांची स्थिती हुकूमशहासारखीच झाली आहे. राष्ट्रपती ट्रम्प यांचे टेरिफ नावाचे 'ट्रम्प कार्ड' देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने बाद ठरविल्यानंतरही ते हार मानावयास तयार नाहीत. त्यांनी नवे 'टेरिफ' म्हणजे आयात शुल्क लावण्याचा निर्णय घेतला आहे. आता ते नवा जुगार खेळण्याची तयारी करीत आहेत. इराणवर हल्ला करणे हा त्यांचा नवा जुगार आहे. यासाठी त्यांनी अब्राहम लिंकन या युद्धनौकेसह काही अमेरिकन युद्धनौका इराणच्या दिशेने रवाना केल्या आहेत. अमेरिकेने २००३ मध्ये मध्यपूर्वेत आपल्या लष्कराची जेवढी जमवाजमव केली होती, त्याहून अधिक जमवाजमव त्यांनी आता केली आहे.

दबावतंत्र की युद्धतंत्र? : डोनाल्ड ट्रम्प यांची कार्यशैली पाहता ते दबाव तंत्राचा वापर करीत आहेत असे दिसते. तर, काही जाणकारांच्या मते ट्रम्प यांनी खोमेनी पिता- पुत्रास संपविण्याचा निर्णय घेतला आहे. इराणमध्ये सत्ताबदल करविण्याची त्यांची व्यूहरचना आहे. म्हणजे व्हेनेझुएलात ट्रम्प यांनी जे केले, ते त्यांना वेगळ्या प्रकारे इराणमध्ये घडवून आणावयाचे आहे. अमेरिकेने इराणचे आण्विक प्रक्रिया केंद्र उद्ध्वस्त करण्यासाठी खरोखरीच हल्ला केला तर इराणही त्यास प्रत्युत्तर देणार हे ठरले आहे. अमेरिकेच्या या कारवाईस प्रत्युत्तर देण्यासाठी इराणने चीनकडून काही अत्याधुनिक प्रक्षेपणास्त्रे खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेन युद्धनौकांना लक्ष्य बनविण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याचे सांगितले जाते. अमेरिका-इराण युद्ध सुरू झाल्यास दुसरे युक्रेन युद्ध सुरू होईल. ट्रम्प जनमताचा कानोसा घेण्यास तयार नाहीत. आपली जनता आपल्या विरोधात जात आहे; किंबहुना गेली आहे, हे त्यांच्या लक्षातच येत नाही.

**विरोधाभास** : राष्ट्रपती ट्रम्प एकीकडे इस्त्रायल-गाझा पट्टीत शांतता कायम करण्यासाठी शांतता मंडळाची बैठक बोलावित आहेत. भारतालाही त्यांनी निरीक्षक म्हणून या बैठकीसाठी आमंत्रित केले होते. त्या बैठकीत त्यांनी पुन्हा एकदा भारत-पाकिस्तान युद्ध संपविल्याचा दावा केला. चार दिवसांच्या या युद्धात ११ विमाने पाडली गेल्याचा दावा त्यांनी केला. आपण दोन्ही देशांमधील आण्विक युद्ध रोखले, असा दावा ते करीत आहेत आणि दुसरीकडे त्यांनी इराण युद्धाची तयारी चालविली आहे. या युद्धानंतर ट्रम्प बहुधा दोन नोबेल पुरस्कारांची मागणी करतील. एक नोबेल- काही युद्ध संपविण्यासाठी आणि दुसरे नोबेल- नवनवी युद्धे सुरू करण्यासाठी.

**भारतालाही झळा** : युक्रेन युद्धाच्या झळा भारतालाही बसल्या. कमी बसल्या. पण, अमेरिका-इराण युद्ध सुरू झाल्यास, त्या युद्धाच्या तीव्र झळा भारतास बसतील, असे मानले जाते. कारण, आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती लगेच भडकतील. अगोदरच भारताने रशियाकडून स्वत: दरात केली जाणारी कच्च्या तेलाची आयात घटविण्याचा की थांबविण्याचा निर्णय घेतला आहे. याचा ताण भारतीय व्यवस्थेवर पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यातच अमेरिका-इराण युद्ध सुरू झाल्यास, तेलाच्या किमती आगीसारख्या भडकतील.


## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# रक्तरंजित माओवादाचे फलित काय?

गेल्या सहा दशकांपासून भारताच्या ११ राज्यांतील ९० जिल्ह्यांनी रक्तरंजित माओवादाचा जाच सहन केला आहे. माओवाद्यांच्या हिंसाचारात हजारो नागरिकांसह देशाच्या असंख्य जवानांना आपल्या प्राणांची आहुती द्यावी लागली आहे. देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत देशातून सशस्त्र माओवादाचा पूर्णत: नायनाट करण्याची घोषणा केली आणि तेव्हापासून युद्धपातळीवर नक्षलवाद्यांना निष्क्रिय करण्याचे अभियान सुरू आहे. आज परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की, ९० जिल्ह्यांत विस्तारलेला नक्षलवाद आता मोजक्याच ठिकाणी उरला असून अखेरच्या घटका मोजत आहे. बोटावर मोजण्याइतकेच माओवादी जंगलात उरले असून इतरांना एक तर निष्क्रिय करण्यात आले आहे किंवा या लोकांनी शस्त्रे खाली टाकून शरणागती तरी पत्करली आहे.

नक्षलवाद्यांच्या केंद्रीय समितीचा सदस्य सोनू ऊर्फ भूपती याने काही महिन्यांपूर्वी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर आपल्या ६१ साथीदारांसह शरणागती पत्करली. भूपतीने आता सशस्त्र क्रांतीची गरज नसल्याचे सांगून काळानुसार सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत प्रचंड बदल झाल्याचे मान्य करीत इतर सशस्त्र माओवाद्यांनाही शस्त्रे खाली टाकण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर छत्तीसगडमध्ये सक्रिय रूपेश आणि रामधेर या केंद्रीय समिती सदस्यांनी आपल्या शेकडो साथीदारांसह टप्प्याटप्प्याने शस्त्रे खाली टाकली. परंतु, नक्षल्यांचा तथाकथित महासचिव देवजी याने आत्मसमर्पण करणाऱ्यांना गद्दार घोषित करून सशस्त्र संघर्ष कायम ठेवण्याबाबत बजावल्याने दिलीप बेडजा, हिडमा, पतिराम मांझी, प्रभाकर, सुधाकर या नक्षली नेत्यांसह शेकडो छोटे-मोठे महिला-पुरुष नक्षली जवानांच्या कारवाईत मारले गेले. या सर्वांच्या खात्म्यानंतर घाबरलेल्या देवजीने मात्र स्वत:चा जीव वाचविण्यासाठी झारखंड पोलिसांपुढे शरणागती पत्करली. छत्तीसगडमधून प्रसारित होणाऱ्या एका न्यूज चॅनलने देवजीच्या या कृत्याला 'कायर' घोषित केले आहे.



सशस्त्र नक्षलवाद प्रामुख्याने जंगलांच्या आडोशाने फोफावला होता. त्यामुळे त्याची सर्वाधिक झळ गोरगरीब आदिवासी समाजाला बसली. जल, जंगल आणि जमिनीचा हा लढा असल्याचे सांगून अर्बन नक्षल्यांनी आदिवासी समाजाला नक्षलवादाच्या खोल गर्तेत ढकलले. खरे तर ही जल, जंगल आणि जमिनीची लढाई नव्हतीच. डाव्या विचारसरणीच्या लोकांना केवळ नक्षलवादाच्या माध्यमातून आपला अजेंडा राबवायचा होता. यात ते कितपत यशस्वी झाले, हा संशोधनाचा विषय आहे. काळ बदलतो त्यानुसार परिस्थितीसुद्धा बदलते. २०१४ पासून सरकारने आदिवासींच्या विकासाचा ध्यास घेतला आहे. दुर्गम भागात विकास पोहोचविण्यासाठी हजारो जवानांना प्राणांची आहुती द्यावी लागली आहे. नक्षलवाद्यांचा विकासाला विरोध असल्याने त्यांचा नायनाट होणे अत्यंत गरजेचे होते. आज गडचिरोलीतील कितीतरी गुणवंत विद्यार्थी राज्य सरकारच्या माध्यमातून देश-विदेशात उच्च शिक्षण घेत आहेत. गेल्या २५ वर्षांत १३ हजारांपेक्षाही अधिक जणांचा या हिंसाचारात मृत्यू झाला आहे. विदेशी आतंकवाद्यांमुळे जितकी झळ देशाला बसली नाही त्याहून अधिक झळ नक्षली हिंसाचारामुळे बसली आहे. मागे हिडमा नावाचा कुख्यात नक्षली मारला गेला तेव्हा दिल्लीत त्याच्या समर्थनार्थ घोषणा देण्यात आल्या. केवळ आपली विचाराधारा जिवंत राखण्यासाठी क्रूरकर्म्याचे समर्थन होत असेल तर हा शुद्ध देशद्रोह आहे.

२५ मे १९६७ रोजी पश्चिम बंगाल राज्यातील नक्सलवाडी या गावातून या रक्तरंजित चळवळीला सुरुवात झाली. गोरगरिबांवर होणाऱ्या अन्यायाचे समर्थन कुठलाही न्यायप्रिय माणूस करणार नाही, करू शकतही नाही. परंतु, गोरगरिबांच्या नावाने सुरू केलेली चळवळ जेव्हा गोरगरिबांच्याच जिवावर उठते तेव्हा तिचा बीमोड करणेच न्यायप्रिय ठरते. चारू मजुमदार खूप श्रीमंत आणि जमीनदार होते. त्यांनी सुरू केलेली ही चळवळ नंतर छत्तीसगड, महाराष्ट्र, ओडिशा, झारखंड आणि आंध्रप्रदेशात फोफावली. या चळवळीचा केंद्रबिंदू ठरला तो आदिवासी समाज. १९८० मध्ये महाराष्ट्रात नक्षल्यांनी जम बसवायला सुरुवात केली. त्यानंतर गडचिरोलीसारख्या दुर्गम जिल्ह्यात सातत्याने रक्तपात होत राहिला. अलिकडेच चिन्ना मडावी या बहादूर जवानाने दोन नक्षल्यांना कंठस्नान घातल्यानंतर आपल्या प्राणाची आहुती दिली. आता जंगलात फक्त पापाराव, मिसिर बेसरा हे दोन प्रमुख नक्षली नेते आणि काही मोजके सशस्त्र नक्षलवादी उरले आहेत. ३१ मार्चपर्यंत सशस्त्र माओवाद नष्ट होऊन सरकारच्या विकासाची गंगा दुर्गम भागात झपाट्याने पोहोचल, अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

९८८१७१६०२७

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# भक्तीची शक्ती

होलिका पूजन आणि रंगपंचमी हा सण आपल्या देशामध्ये विविध प्रांतांमध्ये मोठ्या उत्साहात साजरा केला जातो; ज्यामध्ये पहिल्या दिवशी होलिकेचे पूजन करण्यात येते. आपल्या देशामध्ये जेवढेही सण-उत्सव आहेत, या सर्वांच्या मागे एक परंपरा आहे, एक अर्थ त्यामागे दडलेला असतो. समाजाला काहीतरी संदेश त्यामध्ये दिला गेलेला असतो. त्या संदेशाचे वारंवार स्मरण समाजाने करावे यासाठी हे सर्व सण-उत्सव आहेत. होलिका पूजन हा त्यामधीलच एक सण आहे.

आपल्या सर्वांनाच हिरण्यकश्यपूची गोष्ट माहिती असेल. त्याचा मुलगा भक्त प्रल्हाद हा भगवान विष्णूंचा फार मोठा भक्त होता. हिरण्यकश्यपू तीनही लोकांवर राज्य करीत होता. त्यामुळे ईश्वर नावाची काही गोष्ट नाही, मीच परमेश्वर आहे, अशा पद्धतीचा गर्व त्याला झालेला होता. त्यामुळे त्या वेळेचा सर्व समाज, म्हणजे सज्जनशक्ती आणि सनातन धर्माची उपासना करणारे ऋषिमुनी, या सर्वांनाच त्याने भगवान विष्णूंची किंवा कुठल्याही देवतेची कोणी पूजा करणार नाही व मलाच परमेश्वर म्हणतील, अशा पद्धतीची जबरदस्ती केलेली होती. शस्त्राच्या आधारावर, सत्तेच्या आधारावर, बळाच्या आधारावर तुम्ही काही लोकांना काही काळ भयभीत करू शकता, परंतु तुम्ही सर्व लोकांना सर्वकाळ भयभीत करू शकत नाही, हे तेवढेच खरे आहे. ईश्वरभक्तीचे हे रोप कुठे उगवले, तर ते हिरण्यकश्यपूच्याच घरी उगवले. असे म्हणतात की, प्रल्हादाची माता कयाधू ही तिच्या गरोदर अवस्थेमध्ये ज्या ऋषींच्या आश्रमात राहिली, तिथे तिने देवभक्तीचे व सात्त्विकतेचे संस्कार ग्रहण केले. त्या संस्काराच्या बीजातूनच भक्त प्रल्हादाचा जन्म झाला. मुलगा असला, तरी जर तो राजसत्तेला आव्हान देत असेल, तर ते राक्षसी प्रवृत्तीच्या लोकांना मान्य होत नाही. भक्त प्रल्हाद हा विष्णूंचा भक्त आहे. तो दिवस-रात्र नारायणाचे स्मरण करतो, ही गोष्ट हिरण्यकश्यपूला बिलकूल आवडत नव्हती. त्यामुळे त्याने सैनिकांना प्रल्हादाला संपविण्यासाठी कधी प्रल्हादाला पर्वतावरून ढकलून देण्याचा आदेश दिला, तर कधी समुद्रामध्ये बुडविण्याचा आदेश दिला. कधी विषारी सापांद्वारे त्याला दंश करायला लावले. त्याचे हे सर्वच प्रयत्न अपुरे पडले व भक्त प्रल्हाद नेहमी सुरक्षित राहिला. या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून हिरण्यकश्यपूची बहीण होलिका, जिला अग्नीपासून अभय होते; अग्नी तुला भस्म करू शकणार नाही, असे जिला वरदान होते, त्या वरदानाचा उपयोग करून होलिकेने प्रल्हादाला आपल्या मांडीवर घेऊन बसावे व अग्नी प्रज्वलित केला जावा, असा आदेश दिला. होलिकेला हे माहीत होते की, अग्नीमध्ये प्रल्हादच भस्म होणार आणि माझ्या वरदानामुळे माझे काहीही होणार नाही, असा भाव तिच्या मनामध्ये होता. परंतु अग्नी प्रज्वलित झाल्यानंतर जिच्याकडे वरदान होते, तीच अग्नीमध्ये जळून भस्म झाली व भगवान नारायणांनी प्रल्हादाचे रक्षण केले. किती वर्षे झाली माहीत नाही, परंतु राजसत्तेला व राक्षसी प्रवृत्तींना हा संदेश कायमस्वरूपी स्मरावा म्हणून होळीचा हा सण साजरा केला जातो. अटलजींच्या शब्दात सांगायचे झाले, तर



*'प्रल्हाद परीक्षा की बेला अब है आयी, होलिका बनी देखो अब्दुल्ला शाही...'*

तिला सत्तेचे वरदान आहे, ती सत्तासुद्धा भस्म होते. आपले सण-उत्सव हे निसर्गाशी, ऋतूंशी जुळलेले आहेत. वसंत ऋतूचा प्रारंभ होतो. पानगळीनंतर पुन्हा हिरवी पालवी फुटू लागते. अनेक वृक्ष फुलांनी बहरून जातात. रस्त्याने जाताना आपल्यालाही अनेक ठिकाणी लालबुंद फुलांनी भरलेले पळस वृक्ष दिसत असतील. हे सृष्टीचे सौंदर्य आहे. वसंताच्या आगमनाचा हा संदेश मनुष्य समाज या सणाच्या निमित्ताने साजरा करतो. आज सर्वांनाच घाई आहे. कोणालाही कोणाकडे लक्ष द्यायला वेळ नाही. आपण सोशल मीडियाच्या जाळ्यात अडकले गेल्यामुळे घरातीलच चार लोकांना एकमेकांकडे लक्ष द्यायला वेळ नाही. अशा परिस्थितीमध्ये सृष्टीमध्ये हळुवार होणाऱ्या या बदलाकडे कोणाचे लक्ष जाणार? आज प्रत्येक व्यक्ती कुठल्या ना कुठल्या पद्धतीच्या तणावात जगत असते. तशीच सवय लागलेली असते. त्यामुळे निसर्गाचा हा रंगोत्सव बघायला वेळ कुणाकडेच नाही. डोळे आहेत, पण दृष्टी नाही. दृष्टी नाही म्हणून आनंदही नाही. होळी हा निसर्गाचा उत्सव आहे. तो आपण साजराच करायलाच हवा. वनभ्रमण केले पाहिजे. अनेक वेळा प्रवासात एक दृश्य दिसते. रस्त्याच्या कडेला एखाद्या वृक्षाच्या सावलीमध्ये एखादा परिवार आपले वाहन बाजूला उभे करून बसलेला असतो. न्याहारी करीत आनंद अनुभवत असतो. निसर्गाच्या जवळ जाण्याचा हा एक सुंदर प्रसंग आहे. आजकाल होळीमध्ये लोक मोठ्या प्रमाणावर रासायनिक रंगांचा उपयोग करीत असताना दिसतात; याच वेळेला काही पर्यावरणप्रेमी नैसर्गिक रंगांचा आग्रहसुद्धा धरतात. ठिकठिकाणी अशा संस्था व पर्यावरणप्रेमी मिळून नैसर्गिक रंग होळी खेळण्यासाठी लोकांना कसे उपलब्ध होतील, यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. हिंदू सणांचा विरोध करण्याचा वसा घेतलेले काही लोक समाज माध्यमांवर पाण्याची नासाडी टाळा, वृक्षतोड टाळा असे संदेश पसरविताना दिसतात. पूर्वीपासूनच गावाच्या परिसरात असलेल्या वनांमधून वाळलेल्या झाडांच्या फांद्या आणि इतर प्रकारचे सरपण गोळा केले जायचे. होळीसाठी कोणीही हिरव्या झाडाला तोडत नाही. होळीच्या निमित्ताने पाण्याचा जो वापर केला जातो, त्यामध्ये फार तर दोन बादल्या पाणी एक माणूस वापरत असेल. परंतु इतर ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पाण्याचा गैरवापर होत असतो. बादलीमध्ये पाणी घेऊन आंघोळ करणे आणि शॉवरखाली आंघोळ करणे यामध्ये फरक आहे; याबद्दल समाज माध्यमांवर एकही लेख येत नाही. होळीच्या निमित्ताने पर्यावरणाची चिंता करणारे, वर्षभर इतर धर्मीयांचे सण साजरे होत असताना त्याबद्दल मूग गिळून बसलेले असतात. जिवंत बकरीला कापण्यापेक्षा केकची बकरी कापा, असाही संदेश हे लोक कधी देत नाही. लहानपणीचे मित्र, कॉलेजचे मित्र, जुने मित्र, परिसरातील शेजारी या सर्वांसोबत आपण हा सण साजरा करू शकतो. या निमित्ताने दूर गेलेली मने भेटीमुळे पुन्हा एकदा जवळ येऊ शकतात. सर्व सण-उत्सव हे माणसांना जोडण्यासाठीच आहेत. निसर्गाचा हा रंगोत्सव आपण धार्मिकता, परंपरा यांचा सन्मान करून व पर्यावरणाशी जुळून साजरा करावा, असे वाटते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### श्रमाला सर्वोच्च मानण्याचा संकल्प रुजवा

अलिकडेच जो भारतीय तरुण एआय इंजिनीअर म्हणून रशियात गेला होता त्याला रशियातील रस्त्यावर झाडू मारण्याचे काम करावे लागले. या आशयाची चित्रफीत समाजमाध्यमांवर व्हायरल झाली होती. त्यावरून भारतातील उच्चशिक्षित बेरोजगारांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. मुकेश मंडल नावाचा हा २६ वर्षांचा तरुण रशियातील मायक्रोसॉफ्ट या सॉफ्टवेअर कंपनीत एआय डेव्हलपर म्हणून काम करीत होता. मात्र, सध्या रशियातील सेंट पिटर्सबर्ग शहरांमध्ये रस्ते सफाईचे काम करताना तो दिसला. रशिया सध्या युक्रेनसोबत युद्धात गुंतलेला असल्यामुळे संपूर्ण देशात सफाई कामगारांचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे तिथे स्थलांतरित झालेले उच्चशिक्षित भारतीय तरुण पडेल ते काम करीत आहेत. रस्त्यांची देखभाल करणाऱ्या एका रशियन कंपनीतर्फे भारतातून १७ कामगार नेण्यात आले. हे सर्वजण उच्चशिक्षित आहेत. तरीदेखील ते रशियासारख्या देशात स्वच्छतेचे काम आनंदाने करताना दिसत आहेत. या भारतीय कामगारांना सदरहू कामाचे महिन्याला सुमारे एक लाख रुपये मिळतात. त्याचबरोबर त्यांच्या राहण्या-खाण्याची सोय कंपनीकडून केली जात आहे. भारतासारख्या देशात श्रमसंस्कृतीला सन्मान मिळाला पाहिजे. परदेशामध्ये कुठल्याही कामाला कमी न लेखण्याची प्रवृत्ती आहे. त्यातून प्रत्येकाच्या श्रमाला प्रतिष्ठा देण्याचीच वृत्ती दिसून येते. तीच वृत्ती भारतातही वाढीस लागल्यास रोजगारासाठी परदेशात जाणाऱ्या तरुणांची संख्या आपोआप कमी होईल तसेच श्रमाला सर्वोच्च मानण्याचा संकल्प रुजवला जाईल.

**प्रा. मधुकर चुटे** / ९४२०५६६४०४

• • • •

### मैत्रीचा षटकोन

भारत आणि इस्रायल यांच्यातील मैत्रीने आता एक ऐतिहासिक वळण घेतले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फेब्रुवारी २०२६ मध्ये केलेल्या दुसऱ्या अधिकृत दौऱ्याने या दोन्ही देशांमधील संबंधांना एका नवीन उंचीवर नेऊन ठेवले आहे. मैत्रीचा 'षटकोन' या दौऱ्यात 'हेक्सागन ऑफ अलायन्स' ही नवीन संकल्पना पुढे आली. यामध्ये भारत, इस्रायल, ग्रीस, सायप्रस आणि काही आशियाई-आफ्रिकी देशांचा समावेश करून कट्टरतावादाविरोधात एक सुरक्षा कवच निर्माण करण्यावर चर्चा झाली. याचा निष्कर्ष असा की, पंतप्रधान मोदींच्या या दौऱ्याने सिद्ध केले आहे की, भारत आणि इस्रायल आता केवळ शस्त्रास्त्रांचे ग्राहक-विक्रेते उरले नसून, ते भविष्यातील आव्हानांना सामोरे जाणारे 'सामरिक मित्र' बनले आहेत...

**वीरेंद्र सोनावणे**/ ८८८८२४४८८३

• • • •

## वाचक पत्रे

### डिजिटल पेमेंट

गेल्या ११ वर्षांत सरकारच्या धोरणामुळे आपला भारत देश सर्वच क्षेत्रात प्रगती करतो आहे, हे आपण अनुभवतो आहे. तांत्रिकदृष्ट्या झपाट्याने विकास झाला. अनेक योजना कार्यान्वित झाल्यात. सामान्यातला सामान्य नागरिक आज डिजिटल पेमेंट करू शकतो. कॅशलेस पेमेंटमुळे भ्रष्टाचाराला आपसुकच आळा बसतो. त्यामुळे दैनंदिन जीवनात आपल्याला सगळे व्यवहार डिजिटली करता येतात. हल्ली हातगाडीवरही क्यूआर कोडद्वारे पेमेंट उपलब्ध असते. भाजीबाजार, छोट्यातल्या छोट्या दुकानात तसेच मोठ्यातले मोठे बिल पेमेंट एका क्लिकवर सुलभ व्हायला लागले आहे. त्यामुळे भारत डिजिटल पेमेंटमध्ये अव्वल स्थानावर पोहोचला आहे. युपीआयचा प्रभाव भारताबाहेरही काही देशांमध्ये उपलब्ध आहे; ज्यामुळे भारताबाहेर राहणाऱ्या किंवा प्रवास करणाऱ्या भारतीयांना आर्थिक व्यवहार करणे सोपे झाले आहे. परंतु आर्थिक देवाणघेवाण करताना अत्यंत सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. सुविधा जितक्या जास्त तितक्या गुन्हेगारांसाठी नवीन वाटा तयार होतात, हे लक्षात घेतले जावे.

**स्नेहल खंडागळे** /नागपूर

• • • •

### वाईटावर विजयाचा उत्सव

होलिका दहन, ज्याला आपण 'छोटी होळी' म्हणून ओळखतो. हा सण भारतीय संस्कृतीत अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. होळी आपल्या जीवनातील नकारात्मकता जाळून टाकण्याचा आणि सत्याच्या मार्गावर चालण्याचा संदेश देणारा सण आहे. होळीमध्ये लाकडे जाळणे म्हणजे आपल्यातील क्रोध, द्वेष आणि अहंकार यांसारख्या दुर्गणांची होळी करणे होय. होळीची पूजा करतात, तिला गंध-अक्षता, नारळ अर्पण करतात आणि पुरणपोळीचा नैवेद्य दाखवतात. वाईट प्रवृत्तींचा निषेध म्हणून होळीसमोर बोंब मारण्याची एक जुनी परंपरा आहे. आजच्या काळात होळी केवळ धार्मिक राहिलेली नाही, तर ती सामाजिक एकोपा वाढविण्याचे माध्यम बनली आहे.

शक्ती कितीही मोठी असली, तरी सत्याच्या आणि भक्तीच्या सामर्थ्यापुढे ती टिकू शकत नाही. थंडीचा ऋतू संपून वसंत ऋतूचे आगमन होत असताना निसर्गातील बदलांचे स्वागत या अग्नीद्वारे केले जाते. पर्यावरणाचे रक्षण करणे काळाची गरज असून झाडे न तोडता केवळ सुकी लाकडे किंवा गोवऱ्यांचा वापर करावा. मात्र कचरा किंवा प्लॅस्टिक होळीत टाकू नका; जेणेकरून प्रदूषण होणार नाही. राखेचा वापर खत म्हणून करा.

**वर्षा आवदे** /नागपूर

## महत्वाचे...




### चोरीस गेलेले १२८ तोळे सोने व ९२ तोळे चांदीचे दागिने केले परत

**सोलापूर, दि. १ मार्च-**

जिल्ह्यातील विविध १७ पोलीस स्टेशनकडील २० गुन्हयातील चोरीस गेलेल्या दागिने पोलीस विभागाकडून वेगवेगळ्या गुन्ह्यातील आरोपींना ग्रामीण पोलिसांनी अटक करून तो जप्त केला होता. यात १२८.५ तोळे सोन्याचे दागिने व ९२ तोळे चांदीचे दागिने त्याची किंमत ५१ लाख ४९ हजार ९०३ रुपयाचे दागिने फिर्यादी तसेच मुळ मालकांना परत देण्यात आले. चोरीस गेलेले किंमती दागिने परत मिळाल्यामुळे संबंधीत नागरिक हे भारावून जावून त्यांनी पोलीस खात्याच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले. ही कामगिरी ग्रामीम पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, संकेत देवळेकर, पोलीस निरीक्षक संजय जगताप यांच्या मार्गदर्शना खाली पोलिस निरीक्षक राहूल देशपांडे, सहायय्क पालिस निरीक्षक डोंगरे, टिळेकर, पो.उपनिरीक्षक प्रभाकर ताटे-देशमुख, एएसआय गोलेकर, एएसआय गाडे, पोहेकॉ पांढरे, पोकॉ. डोंगरे, हुलगे, चापोकॉ बुरकुल तसेच मुददेमाल कारकुन श्रेणी पोसई जाधव, जरे, मपोहेकॉ कुंभार, नागरे, एएसआय पाटील, अनिसा शेख, कस्तुरे पोहेकॉ कलमाडी, कदम, देशमुख, मुलाणी, शेटे, मणेरी, मोरे, टिंगरे, पोकों मोहिते यांनी पार पाडली आहे.

### राष्ट्रीय लॉन टेनिस स्पर्धेत चव्हाण, चाबुकस्वारची कामगिरी

**सोलापूर, दि. १ मार्च-**



महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना पुरस्कृत व अखिल भारतीय लॉन टेनिस संघटनेच्या अधिपत्याखाली १२ वर्षाखालील राष्ट्रीय मानांकन लॉन टेनिस स्पर्धेत येथील एसकेएस लॉन टेनिस क्लबचे ऋषिकेश संजय चव्हाण व जान्हवी संतोष चाबुकस्वार यांनी सहभाग नोंदवून एकेरी व दुहेरीत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांचे समाज कल्याण येथील एसकेएस लॉन टेनिस क्लबचे संगमनाथ नागोजी यांच्या अधिपत्याखाली प्रशिक्षक सुधीर व पूजा सालगुडे यांचे मार्गदर्शन लाभले.

### घरासमोर थांबलेल्या व्यक्तीस दारूच्या नशेत मारहाण

**सोलापूर, दि. १ मार्च-**

घरासमोर थांबलेल्या एका व्यक्तीस दारूचा नशेत येऊन विनाकारण चेष्टा मस्करी करत चिडून जाऊन रिकामी बिअरची बाटलीने डाव्या हातावर, पाठीवर बाटलीने मारहाण केली. या हकीकत अशी की, दि. २७ फेब्रुवारी रोजी गुरुदेव बसप्पा आलुरे राहणार २१९ धोत्रेकर वस्ती शेळगी सोलापूर हे घरासमोर थांबले असताना नागेश बेनुरे रा. धोत्रेकर वस्ती हा दारूचा नशेत येऊन विनाकारण गुरुदेव यांची चेष्टा मस्करी करत असताना तू नेहमी माझी चेष्टा करतो असे म्हणाले असता चिडून जाऊन रिकामी बिअरची बाटलीने डाव्या हाताच्या दंडावर मारले. पाठीवर बाटलीने मारहाण केली. यामुळे गुरुदेव यांच्या पाठीवर, दंडावर मारून जखमी केल्याप्रकरणी विजापूर नका पोलीस ठाण्यात दि. २७ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास वाघमारे करत आहेत.



### एका व्यक्तीला ट्रकने दिली पाठीमागून धडक

**सोलापूर, दि. १ मार्च-**

चालत असताना पाठीमागून जोरात एका व्यक्तीला ट्रकने धडक दिली. त्यामुळे ते ट्रकच्या चाकाखाली सापडून दोन्ही पायाला गंभीर दुखापत झाल्याने गुन्हा दाखल झाला आहे. या हकीकत अशी की, दि. २८ फेब्रुवारी रोजी मार्केट यार्ड चौकात ट्रक क्रमांक केइ ५६ ९२९७ चा चालक मुस्तफा अकमुद्दीन निरगुडे वय २६ राहणार केसर जळगाव, ता. उमरगा, जि. सोलापूर यांच्या ताब्यातील ट्रक ही अतिवेगाने, हायगाईने चालवून नूरजहा अकबर दुधनीवाले वय ५९ राहणार २३/२ जुना वेडी घरकुल नर्मदा कॉम्प्लेक्स च्या बाजूला खानचा हॉटेल शेजारी यांचे पती चालत असताना पाठीमागून जोरात धडक दिली. त्यामुळे ते त्या ट्रकच्या चाकाखाली सापडून दोन्ही पायाला गंभीर दुखापत झाली. नुरजहा यांचे पती यांना गंभीर दुखापत झाल्याने चालकाविरोधात जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. पुढील तपास वाघमारे करत आहेत.




# मानांकित खेळाडूंची विजयी सलामी

### 'शिवछत्रपती चषक' बुद्धिबळ स्पर्धा; खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि १ मार्च-**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती शंभूराजे बहुउद्देशीय संस्था, श्री. रामराव शिंदे मित्र परिवार, सोलापुर चेस अकॅडमी व सोलापूर चॅम्प स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने आयोजित करण्यात आलेल्या 'शिवछत्रपती चषक' बुद्धिबळ स्पर्धेला खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. खुला तसेच ११ वर्षाखालील मुले व मुलींच्या गटांमध्ये एकूण १७६ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. यामध्ये ३७ आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडूंचा समावेश असून सोलापूर शहरासह पुणे, बारामती, पंढरपूर, मंगळवेढा, बार्शी, माढा, माळशिरस आदी तालुक्यांतील खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला




स्पर्धेचे उद्घाटन मातोश्री लक्ष्मीबाई पाटील पतसंस्थेचे माजी चेअरमन राजन ढवण व महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामराव शिंदे यांच्या प्रदर्शनीय लढतीने झाले. यावेळी बार्शीचे दत्तात्रय गोरे, टाकळीकर मंगल कार्यालयाच्या व्यवस्थापिका नीलम उपाध्ये, आंतरराष्ट्रीय पंच व संस्थेचे सचिव सुमुख गायकवाड तसेच आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त अतुल कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय पंच संतोष पाटील यांनी केले.

अध्यक्षीय मनोगतात रामराव शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श समोर ठेवून खेळाडूंनी मेहनत, शिस्त व जिद्दीच्या बळावर ध्येय गाठावे, असे आवाहन केले. खेळाडूंच्या सर्वांगीण विकासासाठी बौद्धिक क्षमता व शारीरिक तंदुरुस्ती यांचे महत्त्वदेखील त्यांनी अधोरेखित केले.

स्पर्धेचे प्रमुख पंच म्हणून वरिष्ठ राष्ट्रीय पंच उदय वगरे कार्यरत असून त्यांना वरिष्ठ राष्ट्रीय पंच रोहिणी तुम्मा-राठी, विजय पंगुडवाले, जयश्री कोंडा, प्रज्वल कोरे, यश इंगळे व पद्मजा घोडके आदी काम पाहत आहेत.

पहिल्या फेरीत खुल्या गटात अग्रमानांकित आंतरराष्ट्रीय कँडिडेट मास्टर श्रेयांस शहा, आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त सौरव साहू, विशाल पटवर्धन, बार्शीचे शंकर साळुंके, नितीन अग्रवाल, सान्वी गोरे, पुण्याची समृद्धी मक्तेदार, आदिराज म्हेत्रे, अकलूजचा श्रीराम राऊत तसेच भारत संचार निगमचे राष्ट्रीय खेळाडू चंद्रशेखर बसारगीकर यांनी विजयी सलामी दिली. ११ वर्षांखालील गटात आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त सिद्धार्थ कोठारी, श्रेयस कुदळे, ओम राऊत, हर्षदा जाधव, नियान कंदीकटला, पृथा ठोंबरे व सृष्टी मुसळे यांनी आकर्षक विजय मिळविला. तसेच सात वर्षीय ज्ञानदा सांगुळे, अनन्या गाडे या उदयोन्मुख खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे दर्शन घडविले. जिल्हा परिषद शाळेतील काव्या व समिधा चंदनशिवे, वेदिका घरबुडवे, समृद्धी कसबे, अविष्कार दलाल व संदेश गायकवाड यांनीही प्रभावी खेळ करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.



### बीएमआयटीमध्ये क्रीडा महोत्सवास सुरवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ मार्च-**

ब्रह्मदेवदादा माने इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मध्ये 'स्मॅश' या वार्षिक क्रीडा स्पर्धांचा थरार मोठ्या उत्साहात पार पडला. या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन संस्थेच्या सचिवा जयश्री माने यांच्या हस्ते करण्यात आला.

स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. आर. डी. कुलकर्णी, उपप्राचार्य एस. जी. कुलकर्णी, उपस्थित होते. दोन दिवस चाललेल्या या क्रीडा महोत्सवात विविध वैयक्तिक आणि सांघिक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने क्रिकेट, व्हॉलिबॉल, कॅरम, बॅडमिंटन बुद्धीबळ अशा विविध स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेतील विजेत्या खेळाडूना व संघाना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी, पदके व प्रमाणपत्रके देऊन गौरवण्यात आले.

विजेत्या खेळाडूंचे व संघाचे संस्थेचे अध्यक्ष दिलीप माने यांनी अभिनंदन केले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी संस्था उपाध्यक्ष डॉ. पृथ्वीराज माने व संकुल संचालक प्रा. राहुल माने यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील क्रीडा प्रमुख प्रा. एम. ए. चोपडे, प्रा. व्हि. एस. शिंदे, प्रा. बी. यु. धावरे, विद्यार्थी प्रतिनिधी प्रवीण मुचंडी, रिंकू भोसले यांनी परिश्रम घेतले.

### लोखंडी स्टीलच्या कड्याने गंभीर मारहाण केल्याचा आरोप असलेल्या आरोपीचा जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. १ मार्च**

बार्शी शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर ६४/२०२६ नुसार फिर्यादी सूरज मोहन साळुंखे वय ३५ वर्षे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी जय जगन्नाथ गायकवाड,स्वप्निल संतोष भालशंकर याच्यावर बीएनएस कलम ११८(२), ३(५), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल होता.



अधिक माहिती अशी की फिर्यादी दि.१० फेब्रुवारी रोजी रात्री तानाजी चौकातील लिनिशा बिअर बार येथे दारु पिण्यासाठी गेले असता फिर्यादीच्या ओळखीचे जय जगन्नाथ गायकवाड, अमित शिंदे व स्वप्निल संतोष भालशंकर हे तेथे जोरजोराने गोंधळ करीत असल्याने,फिर्यादीने गोंधळ करु नका, असे म्हणून बिल देण्यासाठी गेले असता जय जगन्नाथ गायकवाड याने फिर्यादीच्या डोक्यात स्टीलच्या कड्याने मारुन गंभीर जखमी केले व लिनिशा बिअर बारच्या पार्किंगमध्ये ओढत नेऊन जय गायकवाड,अमित शिंदे व स्वप्निल भालशंकर यांनी लाथा बुक्क्यांनी गंभीर मारहाण केल्याची तक्रार बार्शी शहर पोलीस स्टेशन येथे दाखल केली होती.

सदर गुह्यातील जय गायकवाड व स्वप्निल भालशंकर या संशयित आरोपीच्यावतीने बार्शी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात ॲड. विवेक गजशिव यांनी जामीन अर्ज दाखल केला होता. यावेळी अरोपींच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरत प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती जी.एस. पाटील यांनी वर नमूद आरोपींचा जामीन अर्ज मंजूर केला. यावेळी आरोपींच्यावतीने ॲड.विवेक गजशिव, ॲड.श्रीराम काशीद, ॲड. विजय गलांडे यांनी काम पाहिले.

# दर्जेदार लेखनानेच मराठी भाषा समृध्द: सिताराम सावंत

**सोलापूर विद्यापीठात मराठी भाषा दिनानिमित्त ज्येष्ठ लेखकांचा सन्मान**

**छत्रपती शंभुराजे साहित्य पुरस्काराचेही वितरण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ मार्च-**

लेखक, साहित्यिकांच्या दर्जेदार लेखनानेच मराठी ही दिवसेंदिवस समृद्ध होत चालली आहे. त्यामुळे आता नव्या लेखकांनी दर्जेदार लेखन करत राहिले पाहिजे, त्यातून वाचकवर्गाशी संवाद दृढ होतो आणि लेखकाला सन्मानही लाभतो, असे मत ज्येष्ठ लेखक सिताराम सावंत यांनी व्यक्त केले. मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त



#### कवी संमेलनाचा कार्यक्रमही उत्साहात

मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधत विद्यापीठात कवी संमेलन आयोजित करण्यात आले. यामध्ये कवी इंद्रजीत घुले, बदीउज्जमा बिराजदार, तालीब सोलापुरी, गणेश गायकवाड, रोहित देशमुख, रामप्रभू माने, सागर अचलकर, डॉ. शिवाजी शिंदे, डॉ. ममता बोल्ली आदींनी सहभाग घेतला. आई, बाप, प्रेम, आधी विविध विषयांवरील यावेळी कवितांचे सादरीकरण झाले त्यानंतर भावनांचा मल्हार : पावसाच्या कवितांचा अभिवाचन कार्यक्रमही पार पडला. यात डॉ. ममता बोल्ली आणि जैद शेख यांचे सादरीकरण झाले.

विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात ज्येष्ठ लेखकाचा सन्मान म्हणून सिताराम सावंत यांचा गौरव करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा हे होते. यावेळी व्यासपीठावर प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, भाषा संकुलाच्या संचालिका डॉ. अंजना लावंड, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, वित्त व लेखाधिकारी सीए महादेव खराडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ केदारनाथ काळवणे यांनी केले. मान्यवरांचा परिचय डॉ. नानासाहेब गव्हाणे यांनी करून दिला. यावेळी विद्यापीठाच्यावतीने छत्रपती शंभुराजे साहित्य पुरस्काराचे वितरण करण्यात आले. शिक्षक गटातून गणपतराव देशमुख म हाविद्यालय, सांगोला येथील डॉ. किसन माने यांना आणि कर्मचारी गटातून विद्यापीठातील सहायक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांना हा पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

# तिरळेपणा मुक्त समाजासाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक : डॉ. मधुसूदन झंवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ मार्च-**

राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम सोलापूर, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम सोलापूर, नेत्रसेवा प्रतिष्ठान पुणे, रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर ईलाईट व रोटरी क्लब ऑफ जुळे सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा रुग्णालय, सोलापूर येथे आयोजित मोफत तिरळेपणा व नेत्र शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये एकूण ६८ रुग्णांवर तिरळेपणाच्या यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून गरजू रुग्णांना मोफत अत्याधुनिक नेत्रसेवा उपलब्ध करून देण्यात आली.

याप्रसंगी नेत्रसेवा प्रतिष्ठान पुणेचे अध्यक्ष डॉ. मधुसूदन झंवर यांनी मनोगत व्यक्त करत तिरळेपणा हा लपवण्याचा नव्हे तर उपचार करण्याचा आजार असून योग्य वेळी शस्त्रक्रिया केल्यास रुग्णांचा आत्मविश्वास व दृष्टी दोन्ही सुधारतात, असे सांगितले. समाजातील गरजू रुग्णांपर्यंत दर्जेदार नेत्रसेवा पोहोचविण्यासाठी शासकीय यंत्रणा व सामाजिक संस्थांचे संयुक्त कार्य महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.




यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे यांनी मनोगतात सांगितले की, तिरळेपणामुळे अनेक रुग्ण मानसिक व सामाजिक अडचणींना सामोरे जातात. मात्र वेळेत निदान व उपचार उपलब्ध झाल्यास रुग्णांचे जीवनमान सुधारते. जिल्हा रुग्णालयामार्फत अशा विशेष शिबिरांच्या माध्यमातून गरजू नागरिकांना दर्जे दार आरोग्यसेवा देण्याचा सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमात डॉ. राजेश पवार, रो. अजय डोईजोडे तसेच बालमुकुंद राठी,रो. विक्रम बंडेवार यांनी मनोगत व्यक्त केले.

समारोप कार्यक्रमास अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. चंद्रकांत क्षीरसागर, जिल्हा नेत्रतज्ज्ञ डॉ. गणेश इंदुरकर, रो. बालमुकुंद राठी, रो. रोशन भुतडा, रो. प्रमोद देशपांडे,रो राहुल डांगरे तसेच डॉ. खान मॅडम उपस्थित होते. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी तसेच डॉ. रोहन वायचळ यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डॉ. पल्लवी अंभोरे यांनी तर आभार प्रमोद देशपांडे यांनी मानले.

### राहत्या घराजवळून गेली दुचाकी चोरीला

**सोलापूर -** राहत्या घराजवळ हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. यात हकीकत अशी की, दि. २३ फेब्रुवारी रोजी योगिनाथ रेवनसिद्ध टूमणे (वय ४२, रा. २६० निवारानगर, अक्कलकोट रोड) यांच्या ताब्यातील मोटरसायकल क्रमांक एम एच १३ बीबी ३८७३ ही निवारा नगर अक्कलकोट रोड येथे हँडल लॉक करून ठेवली होती. योगिनाथ यांची होंडा कंपनीची प्रो काळ्या रंगाची लाल पट्टे असलेली वीस हजार रुपयांची मोटरसायकल चोरीला गेली आहे. याबाबत जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास आरेनवरून करत आहेत.

### विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी पाच जणांविरोधात गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १ मार्च-**

तुझ्या घरच्यांनी लग्नात मानपान केला नाही. हुंडा दिला नाही. सोन्याचे डोरले घातले नाही म्हणून जावई, सासु, सासरा, दीर व अनोळखी महिलेने विवाहितेचा छळ केला. हिला खूप मस्ती आली आहे असे बोलून तिचा तीन महिन्याच्या गर्भपात होण्यास कारणीभूत होऊन शारीरिक व मानसिक त्रास दिल्याबद्दल पाच जणांविरुद्ध फौजदार तावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याची हकीकत अशी की, दि. ४ ते २४ फेब्रुवारी २०२६ रोजी पर्यंत परमेश्वर पिंपरी ता. मोहोळ व हब्बू वस्ती, सोलापूर याठिकाणी फिर्यादी सारिका अंबादास वाघमारे (वय ३७ रा. डी वाय पाटील हॉस्पिटल जवळ वल्लभनगर पिंपरी चिंचवड पुणे) यांची मुलगी सासरी नांदत असताना यातील आरोपी दादासाहेब फडतरे जावई, यल्लामा फडतरे सासू, मगर फडतरे सासरा, किशोर फडतरे दीर (सर्व रा. परमेश्वर पिंपरी ता. मोहोळ) एक अनोळखी महिला यांनी सारिकाची मुलगी साक्षी हिला तुझ्या घरच्यांनी लग्नात मानपान, हुंडा दिला नाही तसेच सोने घातले नाही व दादा फडतरे याने साक्षीला तुझ्या आई-वडिलांकडून चार चाकी गाडीसाठी पैसे आणण्यासाठी मानसिक व शारीरिक त्रास देत होते तसेच सारिकाची मुलगी साक्षीला अनोळखी महिलेचा फोन येऊन फडतरे हा माझा नवरा आहे तू कशी काय त्याच्यासोबत राहते मी त्यांची खरी पत्नी आहे असे म्हणून शिवीगाळ व दमदाटी केली. साक्षीही तीन महिन्यांची गरोदर असताना देखील फडतरे याने आमच्या सांगण्याप्रमाणे पैसे देत नाही असे म्हणून तिला उचलून जमिनीवर आपटल्याने रक्तस्त्राव होऊन तिचा तीन महिन्यांचा गर्भपात होण्यास कारणीभूत ठरला. पुढील तपास सुतार करत आहेत.

# डब्ल्यू.आय.टी.च्या नवसर्जनाला इन्फोसिसचे केदार बर्वे यांची दाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ मार्च-**

वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे आयोजित 'विचार-२६' या राष्ट्रीय तांत्रिक महोत्सवाचा बक्षीस समारंभ उत्साह, ऊर्जा आणि नवोन्मेषाच्या प्रेरणादायी वातावरणात पार पडला. विविध अभियांत्रिकी शाखांतील विद्यार्थ्यांच्या कल्पकता, संशोधनवृत्ती आणि तांत्रिक प्रावीण्याचा यावेळी गौरव करण्यात आला.

इन्फोसिस कंपनीचे इंडस्ट्री प्रिन्सिपल व डिलिव्हरी व्यवस्थापक केदार बर्वे यांनी म्हणाले, 'विचार-२६'सारखे उपक्रम विद्यार्थ्यांना नवसर्जनाची दिशा देतात. स्पर्धेत जिंकणारेच नव्हे, तर सहभाग घेणारा प्रत्येक विद्यार्थी हा भविष्यातील यशस्वी अभियंता आहे. अध्यक्षस्थानी वालचंद शिक्षण समूहाचे विश्वस्त वैभव गांधी होते. प्राचार्य डॉ. विजय आठवले तसेच समन्वयक डॉ. सतीशकुमार काशीद यांच्या उपस्थितीत विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.




या स्पर्धेस ऑटोडेस्क इंडिया कंपनीचे प्रायोजकत्व लाभले होते. तसेच डब्ल्यू.आय.टी.चे माजी विद्यार्थी तथा न्यू तुळजाई इनफ्रा या आघाडीच्या बांधकाम कंपनीचे संचालक सुनील चव्हाण यांनीही विद्यार्थ्यांच्या बक्षीसासाठी रु. १५ हजाराचे प्रायोजकत्व स्वीकारले.

**विजयी स्पर्धक याप्रमाणे(प्रथम तीन प्रत्येकी ३,२ व २ हजाराचे पारितोषिक)**

**गट अ (सिव्हिल अभियांत्रिकी):** मानस बिचाडू व शुभम ढोले, स्नेहा पाटील व श्रेया नारायणकर (डब्ल्यू.आय.टी.), चंद्रकांत व शिवकुमार (बसवेश्वर महाविद्यालय, बागलकोट).

**गट ब-(संगणक व माहिती तंत्रज्ञान):** अथर्व बावधनकर (एमआयटी), प्रगती अंदेवाडी व तृषिका बसुदे, अभिषेक धानोळे व तनमय पाटील (डब्ल्यू.आय.टी.)

**गट क (इलेक्ट्रॉनिक्स व दूरसंचार):** भूमी उपाध्ये व पुनीत कांकरिया (डब्ल्यू.आय.टी.),आदित्य मोरे व गौरी सोमवंशी (एन. बी. नवलें सिंहगड), श्रद्धा तंबाके व स्नेहल कलानी (डब्ल्यू.आय.टी.

**गट ड (मेकॅनिकल अभियांत्रिकी):** विजयलक्ष्मी कलशेट्टी व श्रेयस कवडे (डब्ल्यू.आय.टी.) गोविंद भंडारे व शुभांगी सागर (स्वेरी,पंढरपूर), तनिष्क किनगी (डब्ल्यू.आय.टी.)

**इनोव्हर्स व हॅकाथॉन स्पर्धा**

सिव्हिल गट इनोव्हर्स : आर्यन जोशी (द्वितीय, डब्ल्यू.आय.टी.२ हजार), संगणक गट हॅकाथॉन : अंश जैन, देवांग मेहता, येशा बापना व गुरुराज गुर्रम (प्रथम, डब्ल्यू.आय.टी., ३ हजार) मेकॅनिकल गट ऑटोडेस्क आव्हान : सार्थक मेटकरी (डब्ल्यू.आय.टी., ८ हजार), नंदकिशोर पगाडे व अयान शेख (द्वितीय, ऑर्किड, ७ हजार) भुवन सिडनाळे आणि संस्कार (तृतीय, ५ हजार)

**नावात बदल**

मी **रफिक महमदसाब शेख** (Rafik Mahamadsab Shaikh) रा. ६२२, संजयगांधी नगर झोपडपट्टी नं. २ विजापूर रोड, सोलापूर या नोटीसीने सर्व लोकांना कळविण्यात येते की,

माझे जुने नांव रफिक महमदसाब मासुलदार असे होते. माझ्या नावात बदल झाल्याने महाराष्ट्र शासन राजपत्र (गॅझेट) मध्ये दि. मे २६ ते जून १, २०१६ ने नावात दुरुस्ती केलेली आहे. भविष्यात माझे नवीन नांव **रफिक महमदसाब शेख** असे वाचण्यात यावे.



# टी-२० विश्वचषकाचा थरार



## महत्त्वाचे

### शायना मनिमुथूला कांस्यपदक

**हर्लिम :** नेदरलॅण्डच्या हर्लिम शहरात रविवारी नेदरलॅण्ड कनिष्ठ आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत भारताची उदयोन्मुख बॅडमिंटनपटू शायना मनिमुथूने शायनाने कांस्यपदक जिंकले. बॅडमिंटन आशिया



चॅम्पियनशिपमध्ये १५ वर्षांखालील मुलींच्या गटात विजेती असलेल्या शायनाने उपांत्य फेरीत प्रभावी कामगिरी केली, जिथे तिला चीनच्या यी किंग यिनकडून ३५ मिनिटांत १७-२१, ८-२१ असा पराभव पत्करावा लागला. उपांत्य फेरीत पोहोचताना, शायनाने तिसऱ्या आणि १३ व्या मानांकित खेळाडूंवर उल्लेखनीय विजय मिळवले. यामुळे जागतिक स्तरावर शायनाने आपली वाढती क्षमता आणि सातत्य स्पष्ट केले. यापूर्वी, बॅडमिंटन आशिया १७ वर्षांखालील आणि १५ वर्षांखालील गटाच्या स्पर्धेत भारताने आतापर्यंतचा सर्वोत्तम प्रदर्शन नोंदवला. शायना मनिमुथु व दीक्षा सुधाकरने आपापल्या गटात सुवर्णपदके जिंकलीत. १५ वर्षांखालील मुलींच्या एकेरीच्या अंतिम सामन्यात शायनाने जपानच्या चिहारू तोमिता हिचा २१-१४, २२-२० असा पराभव केला, तर दीक्षाने देशाच्या लक्ष्य राजेशचा २१-१६, २१-९ असा पराभव करून १७ वर्षांखालील मुलींच्या एकेरीचा मुकुट पटकावला.

### इथिओपियाचा ओल्बाना चंदीगड मॅराथॉन विजेता

**चंदीगड :** इथिओपियाचे ओल्बाना नेगासा यादाते आणि मेस्केरेम टेस्फाये फिकाडू अनुक्रमे पुरुष आणि महिला चंदीगड पूर्ण मॅराथॉन प्रकारात विजेते ठरले. रविवारी येथे झालेल्या चंदीगड आंतरराष्ट्रीय मॅराथॉनमध्ये सुमारे ३,५०० धावपटूंनी भाग घेतला. अर्ध मॅराथॉनमध्ये (२१ किमी) भारताच्या हरमनजोत सिंग व इथिओपियाच्या त्सेहे देसलेगनने अनुक्रमे पुरुष आणि महिला विजेतेपद पटकावले. १० कि. मी. धावण्याच्या शर्यतीत साहिल कपूरने पुरुषांची शर्यत जिंकली, तर भारतातील सोनियाने महिला गटात प्रथम क्रमांक पटकावला. एकूण ३२३ स्पर्धकांनी ४२ किमी, ७४० स्पर्धकांनी २१ किमी, १,२७० स्पर्धकांनी १० किमी आणि १,१६८ स्पर्धकांनी ५ किमी श्रेणीत भाग घेतला. या स्पर्धेत आठ देशांतील ३८ आंतरराष्ट्रीय स्पर्धक आणि २१ विशेष दिव्यांग सहभागी झाले होते. पंजाबचे राज्यपाल आणि केंद्रशासित चंदीगडचे प्रशासक गुलाबचंद कटारिया यांनी त्यांच्या पत्नी अनिता कटारिया यांच्यासह चंदीगड मॅराथॉनला हिरवा झेंडा दाखवला आणि ५ किमी श्रेणीतही भाग घेतला, असे एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

### एलिसा हिली निवृत्त

**होबार्ट :** कर्णधार एलिसा हिलीने रविवारी येथे झालेल्या तिसऱ्या आणि शेवटच्या सामन्यात विश्वविजेत्या भारतावर ऑस्ट्रेलियाच्या १८५ धावांच्या विजयात १५८ धावांची भर घालत आपल्या क्रिकेट कारकिर्दीला पूर्णविराम दिला. यावेळी तिने एक आनंददायी निरोपासाठी क्रिकेट देवतांचे आभार मानले. ३५ वर्षीय एलिसा हिलीने १५८ धावांची खेळी केली. तिच्या दमदार खेळासह बेथ मूनीच्या नाबाद १०६ धावांच्या मदतीने ऑस्ट्रेलियाने सात बाद ४०९ धावांचा डोंगर उभा केला. भारतीय संघाला ४५.१ षटकांत २२४ धावांत गुंडाळले व तीन सामन्यांच्या वन-डे मालिकेत ३-० ने वर्चस्व गाजविले. मला प्रत्येक मैलाचा दगड ठरणारा सामना आवडत नाही, म्हणून आज बाहेर जाऊन त्याचा आनंद घेण्याची संधी होती. आणि तो माझ्या अनुभवांपैकी एक होता. त्यासाठी क्रिकेट देवांचे आभार मानते, असे एलिसा हिली म्हणाली.

# अपराजित दक्षिण आफ्रिका उपांत्य फेरीत

## झिम्बाब्वेवर ५ गड्यांनी विजय

◆ **नवी दिल्ली, १ मार्च**

टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत दक्षिण आफ्रिकाने तिसराही सुपर एट सामना जिंकून गट १ मध्ये सहा गुणांसह अव्वल स्थान पटकावले. फलंदाजी आणि गोलंदाजीत समतोल साधत दक्षिण आफ्रिकेने आपल्या अखेरच्या सुपर एट सामन्यात झिम्बाब्वेवर १३ चेंडू शिल्लक ठेवित ५ गड्यांनी विजय मिळविला. झिम्बाब्वेने तिसराही सुपर एट सामना गमावला व ते शून्यासह स्पर्धेच्या बाहेर झाले आहे. गट एकमधून दक्षिण आफ्रिकाने उपांत्य फेरी गाठली असून भारत आणि वेस्ट इंडीजदरम्यानच्या सामन्यातील विजयी संघ या अ गटातून उपांत्य फेरी गाठणारा दुसरा संघ ठरेल.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या झिम्बाब्वेने २० षटकांत ७ बाद १५३ धावा काढल्या आणि दक्षिण आफ्रिकेने १५४ धावांच्या विजयाचे लक्ष्य १७.५ षटकांत ५ गडी गमावित गाठले. सामना वाचविण्यासाठी अष्टपैलू खेळाचे प्रदर्शन करणाऱ्या झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझाला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. सिकंदरने ४३ चेंडूंत ७३ धावांची खेळी केली व



सामनावीर सिकंदर रझा

२९ धावांत ३ बळी टिपले.

झिम्बाब्वेच्या डावाची सुरुवात निराशाजनक झाली. ताडीवानाशे मारूमनी (७), ब्रायन ब`नेट (१५) व डियॉन मेयर्स (११) लवकरच बाद झालेत. झिम्बाब्वेची ८.२ षटकांत ३ बाद ६६ अशी स्थिती होती. मात्र त्यानंतर कर्णधार सिकंदर रझा व क्लाईव्ह मदांडेने जबाबदारीने फलंदाजी करत झिम्बाब्वेला आव्हानात्मक धावसंख्या उभारून दिली. सिकंदरने रायन बर्ल (५) व टोनी मुन्योंगा (२) व क्लाईव्हच्या साथीने संघाला १२६ धावांचा टप्पा गाठून दिला. एमफाकाच्या गोलंदाजीवर झेलबाद होण्यापूर्वी सिकंदर रझाने ४३ चेंडूंत ८ चौकार व ४ षट्कारांच्या मदीतने ७३ धावांची खेळी केली. क्लाईव्ह मदांडेने नाबाद २६ धावांची खेळी करत झिम्बाब्वेला ७ ब ाद १५३ धावांचा टप्पा गाठून दिला. दक्षिण आफ्रिकेच्या क्वेना एमफाका व कॉर्बिन बॉशने प्रत्येकी २ बळी, जॉर्जिया लिंडे, लुंगी नगिदी व ॲनरिक नॉर्टिजने प्रत्येकी एक बळी टिपले.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेची त्रेधातिरपीट उडाली. एडन मार्कराम (४) व क्विंटन डी कॉक (०) ही भरवशाची सलामी जोडी तिसऱ्याच षटकांत १४ धावांत तंबूत परतली, मात्र त्यानंतर रायन रिक्लेटन (३१), डेवाल्ड ब्रेव्हिस (४२) व डेव्हिड मिलरने (२२) छोट्या-छोट्या भागीदारी करत संघाच्या विजयाच्या आशा पल्लवित ठेवल्या. पुढे ट्रिस्टन स्टब्स व जॉर्ज लिंडेने नाबाद खेळी करत दक्षिण आफ्रिकेच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. स्टब्सने ४२ चेंडूंत नाबाद २१ धावांची, तर लिंडेने २१ चेंडूंत २ चौकार व एका षट्कारसह नाबाद ३० धावांची विजयी खेळी केली.

◀(वृत्तसंस्था)

# आम्ही सुरक्षित, पण थोडी चिंता

## पी. व्ही. सिंधू व प्रशिक्षक इरवन्स्याह सुखरूप ● दुबई विमानतळाजवळ स्फोट

◆ **नवी दिल्ली, १ मार्च**

दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेत्या पी. व्ही. सिंधूला प्रशिक्षण देणारे इंडोनेशियन प्रशिक्षक इरवन्स्याह आदि प्रतामा ऑल इंग्लंड बॅडमिंटन स्पर्धेसाठी बर्मिंगहॅमला जात असताना दुबई विमानतळावर थांबलेल्या जागेजवळ स्फोट झाला.

मध्य पूर्वेतील वाढत्या तणावामुळे उड्डाणे थांबवण्यात आल्यानंतर सिंधू व तिचे प्रशिक्षक इरवन्स्याह दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर अडकून पडले होते. ही स्पर्धा मंगळवारी सुरू होणार आहे.

संयुक्त अरब अमिरातीची राजधानी अबू धाबी व दुबईसह इराणने क्षेपणास्त्रांचा मारा केल्यानंतर आखाती देशांच्या काही भागात स्फोट झाल्याची नोंद झाली, त्यामुळे दुबई विमानतळावरील सर्व उड्डाणे रद्द करण्यात आली.

सध्या दुबईमध्ये उड्डाणे रद्द होत आहेत. विमानतळावर स्फोट झाला आहे, म्हणून सध्या येथेच अडकून आहेत, असे इरवन्स्याह यांनी सांगितले.

त्यांनी आम्हाला हॉटेलमध्ये ठेवले आहे, आम्ही ठीक आहोत पण पुन्हा एकदा थोडी चिंता आहे. आम्हाला ऑल इंग्लंड बॅडमिंटन स्पर्धेला जायचे आहे. मला आशा आहे की आम्ही आज विमानाने बाहेर पडू शकू, कारण सिंधूचा सामना बुधवारी आहे, असे त्यांनी सांगितले.

सिंधूने शनिवारी रात्री समाज



माध्यमावर तणावपूर्ण क्षणांची सविस्तर माहिती दिली. अग्निपरीक्षा उलगडतच आहे व तासाभराने परिस्थिती अधिक भयावह होत चालली आहे. काही तासांपूर्वी, विमानतळावर आम्ही जिथे अडकलो होतो तिथेच एक स्फोट झाला, असे सिंधूने इंस्टाग्रामवर लिहिले.

माझे प्रशिक्षक धूर व ढिगाऱ्याच्या अगदी जवळ असल्याने त्यांना तातडीने त्या भागातून पळून जावे लागले. तो आमच्या सर्वांसाठी अत्यंत तणावपूर्ण व भयावह क्षण होता, असेही तिने म्हटले आहे.

इतर बहुतेक भारतीय संघ आधीच बर्मिंगमला पोहोचला आहे. सात्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी ही अव्वल पुरुष दुहेरी जोडी, पुरुष एकेरी खेळाडू लक्ष्य सेन, तरुण बॅडमिंटनपटू आयुष शेट्टी व गायत्री गोपीचंद आणि त्रिशा जॉली ही महिला दुहेरी जोडी आली आहे. इतरांसोबत मालविका बनसोडही पोहोचली आहे, परंतु उन्नती हुड्डा भारतातच आहे, कारण तिची नवी दिल्लीहून बर्मिंगमला जाणारी थेट विमानसेवा शेवटच्या क्षणी रद्द करण्यात आली.

मी आज ११ वाजता प्रवास करणार होते, पण सकाळी लवकर कळले की विमानसेवा रद्द करण्यात आली आहे. आता कनेक्टेड विमानसेवांमध्ये जागा उपलब्ध नाहीत. मी बीएआयशी संपर्कात आहे आणि ते कदाचित माझे सामने उशिरा वेळापत्रक ठरवण्यासाठी बीडब्ल्यूएफशी चर्चा करत आहेत, असे उन्नतीने सांगितले.

भारताचे माजी प्रशिक्षक विमल कुमार हे देखील शनिवारी निघणार होते, परंतु बंगळुरूमध्ये विमानसेवा सुरू होण्यापूर्वीच त्यांना त्यांची विमानसेवा रद्द झाल्याची माहिती मिळाली.

दुहेरी प्रशिक्षक बी. सुमित रेड्डी मिश्र दुहेरी जोडी रोहन कपूर आणि ऋत्विका शिवानीसह सिंगापूरमार्गे प्रवास करतील.

आम्ही काही खेळाडूंना सिंगापूरमार्गे पाठवण्याचा प्रयत्न करत आहोत, काही पोहोचले आहेत. सात्विक व चिराग पोहोचले आहेत, असे भारतीय बॅडमिंटन संघटनेचे सचिव संजय मिश्रा म्हणाले.

पुढील सूचना मिळेपर्यंत अबू धाबी, दम्माम, दोहा, दुबई, जेद्दाह, मस्कत, रियाध आणि तेल अवीव यासारख्या प्रमुख आखाती स्थळांना जाणारी आणि येणारी सर्व उड्डाणे रद्द केली आहेत, असे एअर इंडियाने सांगितले.

◀(वृत्तसंस्था)

# विश्वचषकातून बाहेर पडल्यामुळे पाकिस्तानच्या क्रिकेट जगतात निराशा

◆ **कराची, १ मार्च**

पाकिस्तानने टी-२० विश्वचषक मोहिमेचा शेवट विजयी पद्धतीने केला असला तरी या महास्पर्धेतील संघाच्या एकूण कामगिरीने देशाच्या क्रिकेट जगतात निराशा पसरली आहे.

तुम्हाला तुमच्या देशाच्या क्रिकेट उत्कृष्टतेची छाप सोडण्याची दोन वर्षांतून एकदा संधी मिळते व तुम्ही पुन्हा अपयशी ठरता. हे सर्व पाहून खूप निराशा होतो, असे माजी कर्णधार व महान फलंदाज जावेद मियांदाद म्हणाला. टी-२० क्रिकेट हा एक अतिशय पद्धतशीर स्वरूप आहे व पाकिस्तानचे खेळाडू इतर संघांसोबत टिकून राहू शकत नाहीत. उच्च श्रेणीतील संघांविरुद्ध संघाची कामगिरी ही खूप चिंतेची बाब आहे आणि पाकिस्तान क्रिकेट मंडळाला आता काही आमूलाग्र निर्णय घेण्याची आवश्यकता आहे, असेही तो म्हणाला.

काही खेळाडूंना टी-२० क्रिकेटमध्ये स्वतःला स्थापित करण्यासाठी खूप जास्त संधी देण्यात आल्या आहेत आणि ते मोठ्या स्पर्धांमध्ये कामगिरी करण्यात अपयशी ठरले आहेत, असे माजी कर्णधार मोहम्मद युसूफ म्हणाला. आपल्या चुकांमधून शिकण्याची आणि पुढे जाण्याची वेळ आली आहे, असे तो म्हणाला. जोपर्यंत पाकिस्तान उच्च श्रेणीतील संघांना हरवू शकत नाही, तोपर्यंत ते कधीही आयसीसी स्पर्धा जिंकू शकणार नाही. जर तुमच्याकडे अव्वल संघांना हरवण्याची क्षमता नसेल तर तुम्ही मोठी स्पर्धा जिंकू शकत नाही, असे माजी कर्णधार मोईन खान म्हणाला. आमच्या मुख्य खेळाडूंनी विश्वचषकात चांगली कामगिरी केली नाही, अशा शब्दात त्याने दुःख व्यक्त केले.

माजी कर्णधार बाबर आझम, विद्यमान कर्णधार सलमान अली आघा आणि शादाब खान, शाहीन शाह आफ्रिदी आणि मोहम्मद नवाज यांसारखे इतर वरिष्ठ खेळाडू तीव्र टीकेला सामोरे जात आहेत. मायदेशी परतल्यानंतर आघा नेतृत्वाच्या भूमिकेतून पायउतार होण्याची अपेक्षा आहे.

भूतकाळात पाकिस्तानचे प्रशिक्षक असलेले सकलेन मुश्ताकनेही मुख्य प्रशिक्षक माइक हेसनवर दोषारोप करून आपला जावई शादाबच्या कामगिरीचे समर्थन करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल बरीच टीका झाली आहे.

◀(वृत्तसंस्था)

# गुकेश-नवारा लढत बरोबरीत

## व्हॅन फॉरेस्टने आघाडी घेतली ● प्राग बुद्धिबळ महोत्सव

◆ **प्राग, १ मार्च**

आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महोत्सवाच्या चौथ्या फेरीत झेक प्रजासत्ताकच्या डेव्हिड नवाराने बरोबरीत रोखल्याने विश्वविजेता डी. गुकेशचा पहिला विजय मिळविण्याचा प्रयत्न सुरूच राहिला.

हॉलंडचा जॉर्डन व्हॅन फॉरेस्ट चार सामन्यांमध्ये तिसरा विजय मिळवून मैदानात उतरला, त्याच दिवशी गतविजेता अरविंद चिदम्बरम् जर्मनीच्या विन्सेंट कीमरविरुद्ध लढत देत पराभूत झाला. व्हॅन फॉरेस्टने उझबेकिस्तानच्या नोदिरबेक याकुबबोएव्हचा पराभव केला, तर १० खेळाडूंच्या राऊंड-रॉबिन स्पर्धेतील इतर दोन सामने बरोबरीत आटोपले. अमेरिकन हान्स मोके



निमनने इराणच्या परहम मग्सूडलूशी बरोबरी साधली. डेव्हिड ॲंटोन गुइजारोने विजय नोंदविला.

पाच फेऱ्या अजून शिल्लक असताना आणि स्पर्धा अर्ध्या मार्गावरील अडथळा ओलांडण्याच्या मार्गावर असताना, व्हॅन फॉरेस्टचे तीन गुण आहेत, त्यानंतर अब्दुसत्तोरोव्ह आणि नवरा असून ते दोघे याकुबबोएव्ह, कीमर व गुइजारो यांच्यापेक्षा अर्धा गुण पुढे आहेत. चिदम्बरम्, गुकेश, निमन व मगसूडलू - हे सर्वजण प्रत्येकी १.५ गुणांसह सातव्या स्थानावर आहेत.

**दिव्या-फिनेक लढत बरोबरीत**

चॅलेंजर्स विभागात, जागतिक महिला चषक विजेत्या दिव्या देशमुखने एकमेव आघाडीवर असलेल्या झेक प्रजासत्ताकच्या व्हॅक्लाव फिनेकशी बरोबरी साधली, तर दुसरा भारतीय खेळाडू सूर्य शेखर गांगुलीने यजमान देशाच्या स्टेपन हर्बेकशी बरोबरी साधली. दिव्याचे या स्पर्धेत १.५ गुण आहेत आणि गांगुलीचे या स्पर्धेत चार सामन्यांत एक गुण आहे. फिनेक ३ गुणांसह आघाडीवर आहे.

◀(वृत्तसंस्था)

# टी-२० विश्वचषकातून श्रीलंका बाहेर पडल्यानंतर जयसूर्या मुख्य प्रशिक्षकपदाचा राजीनामा देणार

◆ **कोलंबो, १ मार्च**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत संघाच्या निराशाजनक कामगिरीमुळे श्रीलंकेच्या मुख्य प्रशिक्षकपदाचा राजीनामा देण्याचा निर्णय सनथ जयसूर्या यांनी घेतला आहे.



सुपर एट फेरीत सह-यजमान श्रीलंकेने आपले सर्व तीनही सामने गमावले. सुरुवातीच्या टप्प्यात त्यांना झिम्बाब्वेकडून पराभव पत्करावा लागला आणि ऑस्ट्रेलिया, ओमान व आयर्लण्डविरुद्ध विजय मिळवले.

माझा करार जूनमध्ये संपतो, पण त्यापूर्वी मी मुख्य प्रशिक्षकपद सोडणार आहे. मी माझ्या पदावरून हटण्याचा निर्णय घेण्यासाठी श्रीलंका क्रिकेट मंडळाशी संवाद साधणार आहे, असे शनिवारी श्रीलंकेने पाकिस्तानविरुद्ध पराभव पत्करल्यानंतर जयसूर्या यांनी पत्रकारांना सांगितले.

आम्ही चांगली कामगिरी करायला हवी होती, मला माफ करा आणि मी चाहत्यांची माफी मागतो, असे जयसूर्या म्हणाले.

वानिंदू हसरंगा, मथेशा पाथिराना आणि कुसल मेंडिस यांच्या दुखापतींमुळे श्रीलंकेला खूप त्रास झाला. त्यांच्या जागी खेळाडू आवश्यक पातळीपर्यंत कामगिरी करू शकले नाहीत. हसरंगा माझा सर्वोत्तम खेळाडू होता, त्याच्या जागी सहजासहजी दुसरा खेळाडू सापडणार नाही, असे जयसूर्या म्हणाले. गोलंदाज व फलंदाज दोघांच्याही कामगिरीत सातत्य नसल्याने वाईट कामगिरी झाली.

आपल्या दीड वर्षांच्या कारकिर्दीत श्रीलंकेने सर्व प्रकारामध्ये आपले मानांकन सुधारले, असेही तो म्हणाले.

◀(वृत्तसंस्था)

# भारतीय हॉकी संघाचे नेतृत्व सलीमा टेटे करणार

## सविता पुनिया हॉकी विश्वचषक पात्रता फेरीतून बाहेर

◆ **नवी दिल्ली, १ मार्च**

हॉकी इंडियाने रविवारी मिडफिल्डर सलीमा टेटे हिच्या नेतृत्वाखाली २० सदस्यीय भारतीय महिला हॉकी संघाची घोषणा केल्यानंतर अनुभवी गोलरक्षक व माजी कर्णधार सविता पुनियाने वैयक्तिक कारणांमुळे महिला विश्वचषक पात्रता फेरीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे.

एफआयएच हॉकी विश्वचषक २०२६ पात्रता फेरी ८ ते १४ मार्च दरम्यान हैदराबाद येथे होणार आहे.

ऑगस्टमध्ये होणाऱ्या बेल्जियम आणि नेदरलॅण्डमध्ये यजमान भारत, इंग्लंड, स्कॉटलंड, कोरिया, इटली, उरुग्वे, वेल्स आणि ऑस्ट्रिया हे तीन पात्रता फेरीच्या जागांसाठी स्पर्धा करतील.

संघांना दोन गटात विभागण्यात आले आहे, यात इंग्लंड, कोरिया, इटली व ऑस्ट्रिया हे गट अ मध्ये आहेत, तर यजमान भारत, स्कॉटलंड, उरुग्वे आणि वेल्स गट ब मध्ये आहेत.



सविताने कौटुंबिक कारणांमुळे विश्रांती घेतली आहे असे सूत्राने सांगितले.

भारतीय आक्रमणात नवनीत कौर, इशिका, लालरेमसियामी, ब्युटी डुंगडुंग, बलजीत कौर आणि अन्नू यांच्यासह उत्कृष्ट कामगिरी करणारे खेळाडू आहेत.

आम्ही आमच्या पहिल्या स्पर्धेसाठी खरोखर उत्सुक आहोत. आम्ही तंदुरुस्ती व रणनीतींवर काम करत आहोत, त्यामुळे सर्वांना त्यांची कामे आणि संघातील भूमिका समजते. पुढील सामन्यांसाठी पूर्णपणे तयार राहण्यासाठी आम्ही हैदराबादमध्ये दोन सराव सामने खेळणार आहोत, असे मुख्य प्रशिक्षक सोर्ड मारिज्ने म्हणाले.

भारत ८ मार्च रोजी उरुग्वेविरुद्ध आपली मोहीम सुरू करेल, त्यानंतर ९ मार्च आणि ११ मार्च रोजी स्कॉटलंड आणि वेल्सविरुद्ध सामने खेळेल.

"कौटुंबिक कारणांमुळे सविता स्पर्धेपूर्वी राष्ट्रीय शिबिराचा भाग नव्हती. म्हणूनच तिच्यावर विचार करण्याचे कोणतेही कारण नव्हते," असे एका सूत्राने सांगितले.

अनुभवी सलीमा संघाचे नेतृत्व करत राहील. संघात बंसारी सोलंकी आणि बिचू देवी खारीबाम यांचा समावेश आहे. गोलकीपिंगची जबाबदारी त्यांच्याकडे आहे.

सुशीला चानू पुख्रम्बम, निक्की प्रधान, मनीषा चौहान, उदिता आणि इशिका चौधरी बचावात्मक संघात आहेत तर कर्णधार टेटे, नेहा, सुनीलिता टोप्पो, साक्षी राणा, वैष्णवी विठ्ठल फाळके, रुताजा दादासो पिसाळ आणि दीपिका सोरेंग मध्यक्षेत्रात असतील.

◀(वृत्तसंस्था)

# ऑस्ट्रेलिया महिला संघाचे वन-डे मालिकेत वर्चस्व

## भारताविरुद्ध ३-० ने जिंकली मालिका

◆ **होबर्ट, १ मार्च**

एलिसा हिलीची दमदार दीड शतकी खेळी व बेथ मूनीच्या नाबाद १०६ धावांच्या बळावर ऑस्ट्रेलिया महिला संघाने अखेरच्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात भारतावर १८५ धावांनी विजय नोंदविला. या विजयाबरोबरच ऑस्ट्रेलियन महिला संघाने या वन-डे मालिकेत ३-० असे वर्चस्व गाजविले. माजी विश्वविजेत्यांचे हे सध्याच्या विश्वविजेत्यांविरुद्ध अत्यंत प्रभावी प्रदर्शन राहिले आहे. एलिसा हिलीने सामनावीर पुरस्कार पटकावला.

भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. ऑस्ट्रेलियाने तडाखेबंद फलंदाजी करत ५० षटकांत ७ बाद ४०९ धावांचा डोंगर



सामनावीर एलिसा हिली

उभा केला, प्रत्युत्तर देताना भारताचा संपूण संघ ४५.१ षटकांत २२४ धावांतच गारद झाला.

डावाची सुरुवात करताना ऑस्ट्रेलियाची सलामीवीर फोबे लिचफिल्ड लवकरच बाद झाली, परंतु त्यानंतर कर्णधार एलिसा हिली, जॉर्जिया वोल व बेथ मूनी या अव्वल फळीतील फलंदाजांनी जबरदस्त कामगिरी करत ऑस्ट्रेलियाची स्थिती मजबूत केली. हिलीने जॉर्जियासोबत दुसऱ्या गड्यासाठी १०४ धावांची भागीदारी केली. जॉर्जियाने ५२ चेंडूंत ७ चौकार व एका षट्कारसह ६२ धावांची खेळी केली. पुढे हिलिने बेथ मूनीसोबत तिसऱ्या गड्यासाठी १४५ धावांची भागीदारी करून संघाला २८१ धावांवर पोहोचवले. स्नेह राणाच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी एलिसा हिलीने ९८ चेंडूंत १५८ धावांची आकर्षक खेळी केली, यात तिने तब्बल २७ चौकार व २ षट्कार खेचले. पुढे बेथ मूनीने अनाबेल सदरलॅण्ड (२३) हिच्यासोबत चौथ्या गड्यासाठी ४७ धावांची भागीदारी करून ऑस्ट्रेलियाला ३२८ धावांचा पल्ला गाठून दिला. बेथ मूनीला साथ देण्यास आलेल्या ॲशले गार्डनर ( ४), ताहिला मॅकग्राथ (२) व जॉर्जिया वेरहॅमला (१) भारताच्या रेणुका सिंग व श्री चरणीने नियमित अंतराने तंबूत परत पाठविले, परंतु त्यानंतर बेथ मूनीला साथ लाभली ती निकोला कॅरीची. या दोघांनी आठव्या गड्यासाठी नाबाद ५४ धावांची भागीदारी करत ऑस्ट्रेलियाला ५० षटकांत ७ बाद ४०९ धावांचा डोंगर रचून दिला. बेथ मूनीने ६४ चेंडूंत १० चौकार व एका षट्काराच्या मदतीने नाबाद १०८ धावांची खेळी, तर निकोला कॅरीने १५ चेंडूंत नाबाद ३४ धावांची खेळी केली. श्री चरणी व स्नेह राणाने प्रत्येकी २ बळी, तरेणुका सिंग, काश्वी गौतम व दीप्ती शर्माने प्रत्येकी एक बळी टिपण्यात यश मिळविले.

विजयासाठी ४१० धावांचा पाठलाग करताना भारतीय महिला क्रिकेटपटूंची चांगलीच दमछाक झाली. सलामीवीर स्मृती मंधाना शून्यावरच बाद झाली. स्नेह राणा (४४), जेमिमाह रॉड्रिग्ज (४२), दीप्ती शर्मा (२८), कर्णधार हरमनप्रीत कौर (२५), प्रतिका रावल (२३), ऋचा घोष (१८), हर्लिन देओलने (१४) व श्री चरणीने (११) कसोशीने प्रयत्न केले, परंतु त्यांचे प्रयत्न अपुरे पडले आणि भारताचा डाव ४५.१ षटकांत २२४ धावांतच आटोपला.

ऑस्ट्रेलियाकडून अलाना किंगने ४ बळी, जॉर्जिया वेरहॅमने २ बळी, तर निकोला कॅरी, अनाबेल सदरलॅण्ड व ॲशले गार्डनरने प्रत्येकी एक बळी टिपला.

◀(वृत्तसंस्था)

# युद्धाच्या भडक्यामुळे आशियाई चॅम्पियन्स लीगचे सामने पुढे ढकलले

◆ **नवी दिल्ली, १ मार्च**

सोमवार आणि मंगळवारी मध्य पूर्वेतील आशियाई चॅम्पियन्स लीग एलिटचे सामने या प्रदेशात सुरू असलेल्या युद्धामुळे पुढे ढकलण्यात आले आहेत, अशी माहिती आशियाई फुटबॉल कॉन्फेडरेशनने रविवारी दिली.

स्पर्धेच्या १६ व्या फेरीतील पहिल्या टप्प्यातील चार सामने संयुक्त अरब अमिराती आणि कतारमध्ये खेळवण्यात येणार होते ज्यात त्या देशांचे क्लब तसेच सौदी अरेबिया आणि इराणमधील संघांचा समावेश होता, परंतु आता ते नंतरच्या तारखेला आयोजित केले जातील.

एएफसी या वेगाने विकसित होणाऱ्या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवत राहील आणि सर्व खेळाडू, संघ, अधिकारी आणि चाहत्यांची सुरक्षितता आणि सुरक्षा सुनिश्चित



करण्यासाठी दृढ राहील, असे स्पर्धेच्या प्रशासकीय मंडळाने रविवारी एका निवेदनात म्हटले आहे.

अमेरिका आणि इस्रायलने इराणवर हवाई हल्ले सुरू केल्यापासून शनिवारपासून हा प्रदेश हाय अलर्टवर आहे. इराणींनी युएई, कतार आणि सौदी अरबसह या प्रदेशातील लक्ष्यांवर हल्ला करून प्रत्युत्तर दिले.

**प्रभावित सामने**

सौदी अरबचा गतविजेता अल-अहली सोमवारी अल-दुहैल संघाशी सामना करण्यासाठी कतारला जाणार होता, तर युएईचा शबाब अल-अहली इराणच्या ट्रॅक्टर एफसीचे आयोजन करणार होता.

कतारचा अल-सद्द मंगळवारी सौदी अरबयाच्या अल-हिलाल संघाशी सामना करणार होता, तर युएईचा अल-वाहदा संघ अल-इतिहाद संघाचे आयोजन करणार होता.

आशियाई चॅम्पियन्स लीग टूमधील सामने, जे उपांत्यपूर्व फेरीत आहे, त्यावरही परिणाम झाला आहे. कतारचा अल-अहली संघ मंगळवारी जॉर्डनच्या अल-हुसेन संघाशी सामना करणार होता आणि युएईचा अल-वासल आणि युएईचा अल-वासल यांची बुधवारी होणारी सौदी अरेबियाच्या क्रिस्टियानो रोनाल्डोच्या अल-नासर संघाशी लढत होणार होती.

◀(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### चंद्रग्रहणानिमित्त पंढरपूर येथील मंदिरात श्रींच्या नित्योपचार वेळेत बदल

**पंढरपूर दि.१ मार्च :**

दि. ३ मार्च रोजी ग्रस्तोदित चंद्रग्रहण असल्याने श्री विठ्ठल व श्री रूक्मिणी माता यांच्या नित्योपचार व पूजाविधीच्या वेळेत शास्त्रोक्त नियम ानुसार आवश्यक बदल करण्यात आले आहेत. पंचांगानुसार ग्रहणाचा स्पर्श सायं. ६.३४ वा. असून मोक्ष सायं. ६.४८ वा. आहे. पंढरपूर येथे सूर्यास्त सायंकाळी ६.३४ वा. होत असल्याने सायंकाळी ६.३४ ते ६.४८ (एकूण १४ मिनिटे) या कालावधीत ग्रहण नियम पाळण्यात येणार आहेत. ग्रहण काळातील प्रमुख बदल पुढीलप्रमाणे :



**काकड आरती व नित्यपूजा** - पहाटे ४ ते ५.५५ वा. नेहम ीप्रमाणे. **महानैवेद्य** - सकाळी १०.४५ ते ११ वा. महानैवेद्यामध्ये नेहमीचा नैवेद्य दाखविण्यात येणार नाही. त्याऐवजी सुकामेवा नैवेद्य दाखविण्यात येईल. **पोशाख / दुपारचा नैवेद्य** (४.३० ते ५ वा.) ग्रहणाचा वेध सुरू होणार असल्याने लाडूचा नैवेद्य दाखविण्यात येणार नाही. त्याऐवजी सुकामेवा दाखविण्यात येईल. **ग्रहण स्पर्शानंतर** (सायंकाळी ६.३४ वा.) श्री विठ्ठल व श्री रूक्मिणी माता तसेच मंदिरातील व मंदिराबाहेरील सर्व परिवार देवतांना चंद्रभागा नदी (भीमा) नदीचे पाणी आणून स्नान घालण्यात येईल. ग्रहण मोक्षानंतर (सायंकाळी ६.४८ वा.) सर्व देवतांना पुनः स्नान घालून शुद्धीकरण विधी पूर्ण करण्यात येईल. धुपारती - रात्री ९.३० वा. शेजारती - रात्री १२ वाजे नंतर नेहमीप्रमाणे होईल. खग्रास चंद्रग्रहणाच्या पार्श्वभूमीवर श्रींच्या नित्योपचारात वरीलप्रमाणे बदल करण्यात येत असून, भाविकांनी दर्शन व पूजाविधीच्या वेळेची नोंद घ्यावी, असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

| अ.क्र | वेळ | तपशील |
|---|---|---|
| १ | सायं. ०६.२० ते सायं. ०७.१५ | श्री चे दर्शन बंद |
| २ | रात्री ०७.२० ते रात्री ०९.०० | श्री चे दर्शन चालू |
| ३ | रात्री ०९.०० ते रात्री ०९.३५ | (महानैवेद्य व धुपारती ) श्री चे दर्शन बंद |
| ४ | रात्री ०९.३५ | श्री चे दर्शन चालू |
| ५ | रात्री १२.०० वा | शेजारती नहमीप्रमाणे |

### सचिन वसेकर यांची तात्काळ बदली करा; ग्रामस्थांकडून मागणी

**मोहोळ, दि.१ मार्च-**

कोळेगांव येथील ग्रामसेवक सचिन वसेकर यांची तात्काळ बदली करण्याची ग्रामस्थांनी मागणी केली आहे. कोळेगांव ( ता मोहोळ) येथील विद्यमान ग्रामसेवक सचिन वसेकर यांनी कोळेगांव येथे पदभार घेतल्यापासून केलेल्या शासकीय कामांची व राबविलेल्या योजनांची सखोल चौकशी करावी आणि जनतेस शासकीय योजना लाभ न देता न झालेल्या कामाची बिले दाखवून रक्कम हडप करून शासनाची फसवणूक केल्याचा आरोप करीत त्यांनी केलेल्या सर्व कामाची सखोल चौकशीची व अशा ग्रामसेवकाची तात्काळ बदली करण्यात यावी व त्यांना प्रशासक म्हणून नेमणूक करण्यास विरोध असल्याचे लेखी तक्रार ग्रामस्थांचे वतीने सोलापूर जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी व मोहोळ पं.स.गटविकास अधिकारी यांना दिले आहे. या निवेदनावर ग्रा.पं चे माजी सरपंच, ग्रा.पं सदस्य व प्रतिष्ठीत व्यक्तीच्या देखील सह्या आहेत. यावर प्रशासन काय निर्णय घेणार व भ्रष्ट अशा ग्रामसेवकाच्या कारभाराची चौकशी होणार की प्रशासन पाठीशी घालण्याचे काम करणार याकडे कोळेगांव येथील जनतेचे लक्ष लागले आहे.

## निधन वृत्त...

### प्रदीप बोध्दुल



**सोलापूर, दि.१ मार्च-**

शेळगी परिसरातील जयलक्ष्मी सोसायटी येथील रहिवासी प्रदीप दशरथ बोध्दुल यांचे रविवार, दि. १ मार्च २०२६ रोजी निधन झाले. सोमवार, दि.२ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या राहत्या घरापासून अंत्ययात्रा निघणार आहे. पद्मशाली समाजाच्या विविध उपक्रमात त्यांनी सक्रीय सहभाग नोंदविले होते.

# अक्कलकोट नगरपरिषदेचा करवाढ नसलेला तुटीचा अर्थसंकल्प मंजूर

## ४७६ कोटी २ लाख ९२ हजार ४४५ रूपयांचे अंदाजपत्रक सादर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ मार्च -**

अक्कलकोट नगरपरिषदेच्या यंदाच्या निवडणुकीनंतर पहिला अर्थसंकल्प युवा नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली सादर झाला.त्यामध्ये २०२६-२७ साठी १ कोटी ४ लाख १८ हजार २६८ रुपयांच्या तुटीचा अर्थसंकल्प एकमताने मंजूर करण्यात आला.कोणतीही करवाढ प्रस्तावित न करता सादर करण्यात आलेल्या या अंदाजपत्रकामुळे शहरवासीयांना मोठा दिलासा मिळाला आहे.

नगरपालिकेचे निवडणुकीनंतर नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष सभेत सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय बजेटच्या बैठकीत कोणतीही करवाढ प्रस्तावित न करता सादर केलेल्या अंदाजपत्रकामुळे शहरवासीयांना मोठा दिलासा मिळाला असून उपलब्ध उत्पन्न स्रोतांचा कार्यक्षम वापर करून विकासकाम ांना गती देण्याचा निर्धार या सभेत करण्यात आला.नगरपरिषदेच्या सभागृहात झालेल्या अंदाजपत्रकीय सभेत २०२६ २७ साठीचे अंदाजपत्रक सादर करण्यात आले. मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी ४७६ कोटी दोन लाख ९२ हजार ४४५ रुपयांचे अंदाजपत्रक सभागृहासमोर मान्यतेसाठी सादर केले. या अंदाजपत्रकात सुरुवातीची



शिल्लक ६३ कोटी १९ लाख ९९ हजार ८३७ रुपये असताना महसुली जमा २१ कोटी ७० लाख ७२ हजार ९०० रुपये आणि महसुली खर्च २८ कोटी ८८ लाख ९८ हजार ४५ रुपये इतका प्रस्तावित आहे. भांडवली जमा ४५ कोटी २८ लाख २४ हजार ४०० रुपये तर भांडवली खर्च ४४ कोटी ७१ लाख ३९ हजार ४०० रुपये इतका असून अखेरीस १ कोटी ४ लाख १८ हजार २६८ रुपयांची तुट दर्शविण्यात आली आहे. या अर्थसंकल्पात शहराच्या मूलभूत सुविधांना प्राधान्य देण्यात आले आहे. पाणीपुरवठा व्यवस्था सक्षमकरणे, शहर स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन सुधारणा, अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती, प्रकाश व्यवस्था बळकट करणे, आरोग्यविषयक सेवा वाढविणे यांसह तीर्थक्षेत्र विकास आराखडा राबविण्यावर भर देण्यात आला आहे. तसेच नवीन आठवडे बाजार उभारणी, मटन चिकन मासे मार्केट उभारणी, शॉपिंग सेंटर उभारणी, शासकीय जागांवरील अतिक्रमण हटविणे, केंद्रीय सहाय्यक योजनांचा प्रभावी वापर आणि अग्निशमन योजना सक्षमकरणे या विविध विकासकामांसाठी निधीचो तरतूद करण्यात आली आहे. सभागृहात अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा झाली. नगरसेवकांनी विविध सूचनांद्वारे विकासकामांना अधिक गती देण्याची अपेक्षा व्यक्त केली. करवाढ टाळून तुटीचा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल काही सदस्यांनी प्रशासनाचे स्वागत केले. चर्चेनंतर अंदाजपत्रक एकमुखी मंजूर करण्यात आले.

## मंद्रूपमधील बेशिस्त रिक्षा चालकांवर कारवाई करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.१ मार्च-**

मंद्रूप येथील हुतात्मा व शिवबसव चौक येथे रिक्षा स्टॉप असल्यामुळे येथील रिक्षा चालकांकडून बेशिस्त वर्तन दिसून येत आहे. वाहन चालविण्याचा परवाना नसताना रिक्षा चालवून प्रवाशांच्या जीवितास धोका निर्माण करणे, रस्त्यावर रिक्षा थांबवून प्रवाशांना बोलवणे,

अनेक रिक्षाचालकांकडून नियमांचे उल्लंघन होणे यासारख्या गोष्टींकडे मंद्रूप वाहतूक पोलीस दुर्लक्ष करीत असल्यामुळे प्रवाशांम धून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. मंद्रूपमधून दररोज ३० ते ४० रिक्षा चालक सोलापूर व मंद्रूप परिसरातील प्रवाशांची वाहतूक करतात. मात्र अनेक रिक्षाचालक अतीरिक्त प्रवाशांचा जीवघेणा प्रवास करीत आहेत. तसेच अनेक लहान मुलेही रिक्षा चालवून नियमबाह्य प्रवाशांची वाहतूक करीत आहेत. त्यामुळे त्या रिक्षा चालकांकडून वाहतूक नियमांचे उल्लंघन होताना दिसून येत आहे.

एक वर्षापूर्वी बसवनगरजवळ रिक्षा अपघातात मंद्रूपमधील दोन प्रवाशांचे मृत्यू झाले आहे. त्यामुळे मंद्रूप पोलिसांनी अवैद्य प्रवाशी वाहतूक व वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षा चालकांवर कारवाई करण्याची म ागणी करण्यात येत आहे.

पोलीस निरीक्षक शंकर पटवारी यांनी अवैद्य प्रवाशी वाहतूक बंद करण्यासाठी व वाहतूक नियमांचे उल्लंघन करणार्या रिक्षाचालकांवर कारवाई करण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी होत आहे.

## विठ्ठलाच्या मूळ पादुका अरण उत्सवात नेण्याचा निर्णय सर्वसंमतीने घ्या : उपसभापती डॉ. गोऱ्हे

### सभागृहात झाली चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १ मार्च -**

संत परंपरेने समृद्ध असलेल्या महाराष्ट्रात संत शिरोमणी संत सावता महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्याला यंदा सुमारे ७३० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर अरण येथे होणाऱ्या सोहळ्यासाठी पांडुरंगाच्या मूळ पादुका नेण्याच्या मागणीवर लक्षवेधीद्वारे चर्चा झाली. या विषयावर सभागृहात विविध सदस्यांनी मते मांडल्यानंतर पीठासीन अधिकारी विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सर्व संबंधितांनी एकत्रित बैठक घेऊन सर्वसंमतीने निर्णय घ्यावा अशा सूचना केल्या.

लक्षवेधी क्र. २ द्वारे सदस्य योगेश टिळेकर यांनी अरण येथे होणाऱ्या संत सावता महाराजांच्या समाधी सोहळ्यासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर मार्फत पांडुरंगाच्या मूळ पादुका आणण्याची मागणी म ांडली. वारकरी संप्रदायाच्या भावना आणि संत



परंपरेतील अध्यात्मिक संदर्भ लक्षात घेऊन समितीने आवश्यक तरतुदींमध्ये दुरुस्ती करावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच संबंधित न्यासच्या काम काजाबाबत तक्रारींची चौकशी करून आवश्यक असल्यास प्रशासक नेमण्याची मागणीही करण्यात आली. यावर उत्तर देताना राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी स्पष्ट केले की अरण येथे मूळ पादुका नेण्याची परंपरा अस्तित्वात नसून, सुमारे दीडशे वर्षांपासून स्थानिक परंपरेनुसार दुसऱ्या पादुकांची पालखी जाते. २०१४ पासून पंढरपूर ते आळंदी दरम्यान मूळ पादुका नेण्याची प्रथा सुरू झाली आहे; मात्र अरण संदर्भात अंतिम निर्णय संबंधित न्यासच्या बैठकीत घेतला जाईल. तक्रारी प्राप्त झाल्यास नियमानुसार चौकशी करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. चर्चेत सहभागी होताना सदस्य अमोल मिटकरी यांनी वारकरी संप्रदायाच्या भावनांचा आदर करून सकारात्म क निर्णय घ्यावा, अशी भूमिका मांडली. तसेच मंदिर समिती व न्यासच्या मुदतवाढ आणि कार्यपद्धतीबाबतही प्रश्न उपस्थित केले.

यावर उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी संत परंपरा, वारकरी समाजाच्या भावना आणि कायदेशीर बाबी यांचा समतोल साधणे आवश्यक असल्याचे नमूद केले. न्यासातील अनेक सदस्यांची कालमर्यादा संपल्याने सद्यस्थितीत न्यासची नाममात्र असल्याने त्यांनाही निर्णय घेतांना मर्यादा येत आहेत .न्यासाची सद्यस्थितीनव संभाव्य मतभेद लक्षात घेता सर्व संबंधित घटक , परंपरा अभ्यासक , वारकरी प्रतिनिधी आणि कायदेविषयक तज्ज्ञ यांची बैठक घेऊन सर्वसंमतीने निर्णय घेण्याचा प्रयत्न करावा, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या. समाधी सोहळ्यापूर्वी निर्णय व्हावा, असेही त्यांनी सभागृहातून सुचित केले. या चर्चेमुळे अरण येथील धार्मिक परंपरा, वारकरी संप्रदायाच्या भावना आणि मंदिर समितीच्या अधिकारक्षेत्राचा प्रश्न चर्चेत आला आहे.

## पंढरपूर तालुक्यातील अतिक्रमणाकडे दुर्लक्ष करणारा सरपंच कार्यमुक्त

- कर्तव्यात कसूर करीत हलगर्जीपणा केल्याचा ठपका
- तपकिरी शेटफळच्या सरपंचाला विभागीय आयुक्तांकडून दणका

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१ मार्च -**

सरकारी गायरान जमिनीवर केलेले अतिक्रमण हटविण्याबाबत दुर्लक्ष केल्याचा फटका पंढरपूर तालुक्यातील तपकिरी शेटफळच्या सरपंचांना बसला आहे. पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी त्यांना कर्तव्यातकसूर करीत हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवत कार्यमुक्त केले आहे.

शहर असो वा ग्रामीण भाग अनेक ठिकाणी अतिक्रमण करण्याची मोठी सवय काही सत्ताधारी लागून गेली आहे. याकडे प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष असते. मात्र तक्रार केल्यास यामध्ये असणाऱ्या जबाबदार पदाधिकाऱ्यांनाही पदमुक्त व्हावे लागते. याचाच अनुभव पंढरपूर तालुक्यातील तपकिरी शेटफळ येथील सरपंच नूतन मासाळ यांना आला आहे. तपकिरी शेटफळ येथील गायरान सरकारी जागेवर अतिक्रमण वाढले होते. गावातील ३० एकर जागेमधून हे अतिक्रमण वाढले होते. गायरान जमीन असलेल्या या गट नंबर ५४९/१,५४९/२,५५२,व १० मधील अतिक्रमण केलेल्या कृतीबाबत ठोस पावले उचलून त्यास प्रतिबंध घातला नव्हता.

गावातील ही सार्वजनिक मालम त्ता असतानाही याकडे दुर्लक्ष करीत, कर्तव्यामध्ये हलगर्जीपणा दिसून आला आहे. संबंधित प्रकरणात सरपंच नूतन मासाळ यांना पदमुक्त करावे अशी मागणी रिपाइं (आठवले गट) चे कार्यकर्ते सुनील सर्वगोड, जितेंद्र बनसोडे आणि तपकिरी शेटफळचे आरपीआयचे निष्ठावान कार्यकर्ते राजकुमार भोपळे यांनी केली होती. त्यानुसार तपासणी करीत, सरपंच मासाळ यांना पुणे विभागाचे महसूल आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी २३ फेब्रुवारी रोजी लेखी आदेश देऊन पदमुक्त केले आहे.

### सरपंचावरील कारवाईने नागरिकांतून जागृती

अनेक गावातील गावठाण आणि गायरान यासह सरकारी जागेवर विविध प्रकारची अतिक्रमणे दिसून येत आहेत. याकडे प्रशासन आणि पदाधिकारी यांचे दुर्लक्ष होत होते. तपकिरी शेटफळ येथील या सरपंचावर झालेल्या कारवाईने मात्र अशा प्रकारच्या अतिक्रमणाबाबत मोठी जागृती निर्माण झाली आहे. अन्य गावांतूनही अशाच तक्रारी यापुढे होणार आहेत. याचा फटका विविध गावातील सरपंच आणि ग्रामसेवक यांना नक्की बसणार आहे. अतिक्रमण हटाव मोहीम न राबवल्यास सरपंच रडारवर येणार हे नक्की आहे.




## व्हीके इन्स्टिट्यूटतर्फे ६० विद्यार्थ्यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१ मार्च -**

येथील व्ही. के. इन्स्टिट्यूट ऑफ अबॅकस तर्फे तालुका पातळीवरील स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. तालुका पातळीवरील कार्यरत विविध शाखांमधून एकूण ६० स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदविला होता. सायंकाळी या स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा पार पडला. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्रा. डॉ.राहुल पालके तसेच बँक ऑफ महाराष्ट्रचे निवृत्त कर्मचारी बसवराज पुरवंत हे उपस्थित होते.

सुरुवातीला विनोद कबाडे यांनी प्रास्ताविकपर बोलून डॉ.पालके तसेच पुरवंत यांचे स्वागत व सत्कार केला. स्पर्धांमधून सहभागींना पुढे जाण्याची उर्मी मिळतेच तसेच स्पर्धाही उत्साही वातावरणात असावी व आपण आपल्याशीच स्पर्धा करुन रोजची प्रगती तपासून पहावी व मुलांचे विश्व समजून त्यांना घडविण्यासाठी केलेले परिश्रम ही भविष्याची उत्तम संस्कार पेरणी असते, असे बोधपर विचार डॉ. पालके व पुरवंत यांनी मांडले. या स्पर्धेत कु. सार्थक सूळ, कु. विराज शिंदे, कु. पुष्कर तिकटे हे तिघेही आपल्या वयोगटांनुसार प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ.वनुजा कबाडे यांच्या म ार्गदर्शनाखाली बार्शी तालुक्यातील कार्यरत वेगवेगळ्या शाखांचे अबॅकस टीचर, सौ. सारिका कबाडे, सौ. रेखा तुपे, सौ. ज्योती डांगे, सौ. मोनिका कट्टीमनी, सौ. शुभांगी मस्तुद यांचे मार्गदर्शन लाभले. यलाप्पा कट्टमणी, प्रथमेश निरंजन व श्रद्धा, यशराज व कोमल कबाडे यांचेही परिश्रम लाभले. सहभाग व विजेत्या स्पर्धकांना डॉ. पालके व पुरवंत यांच्या हस्ते पारितोषक वितरण करण्यात आले. कार्यक्रमाची सांगता विनोद कबाडे यांनी केली.

## पुरंदावडे जिल्हा परिषदेच्या शाळेत रंगले बालचमुंचे कविसंमेलन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१ मार्च -**

सभोवार जमलेली रसिक मंडळी.... त्यांच्यासमोर सादर होणाऱ्या एकाहून एक सरस अशा कविता...आणि त्यांना मिळणारी भरभरून दाद....हे दृश्य कुठल्या महाविद्यालयातील नाही तर चक्क एका जिल्हा परिषद शाळेतील आहे. म ाळशिरस तालुक्यातील पुरंदावडे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने शाळेतील विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या कवितांचे अभिनव काव्यसंमेलन आयोजित केले होते. यावेळी प्रख्यात निवेदक राजाराम गुजर व प्रसिद्ध कीर्तनकार मोहनानंद महाराज पुरंदावडेकर, वैशाली ओवाळ हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमास प्रारंभ झाला. शाळेतील पदवीधर शिक्षक व साहित्यिक डॉ.प्रेमनाथ रामदासी यांनी प्रास्ताविकामध्ये या अभिनव उपक्रमाची माहिती दिली. कविता निर्मितीची कार्यशाळा घेतली असून विद्यार्थ्यांना कविता लिहिण्यासंदर्भात योग्य ते मार्गदर्शन केल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या 'उमलती प्रतिभा' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन उपस्थितांच्या




हस्ते करण्यात आले. कु. आलीया मुलाणी हिच्या 'बाप' नावाच्या कवितेने कविसंमेलानास प्रारंभ झाला. 'जवळ काही नसले तरी नाही कधी म्हणाले नाही, माझ्या बापापेक्षा दिलदार मी कुणी पाहिले नाही'. या तिच्या ओळींना उत्स्फूर्त दाद मिळाली. कु.स्वराली तुपे हिने माझी शाळा या कवितेतून शाळेच्या विविध वैशिष्ट्यांचा आढावा घेतला. 'पुस्तकांच्या पानांतून ज्ञानाचे अमृत मिळते जीवनाचे सार सर, तुमच्यामुळेच कळते' या तिच्या ओळींनी सर्वांना मंत्रमुग्ध केले. कु.समीक्षा मोहिते हिने कवितेतून गुरुचे महत्त्व अधोरेखित केले. कु.बुद्धमी ओवाळ हिने कवितेतून आईचे शब्दचित्र उभा केले. 'कशानेच कळू शकत नाही तिचे स्वरूप, आई म्हणजे देवाचेच दुसरे रूप !' या तिच्या ओळींना उपस्थितांनी दाद दिली. कु. सार्थकी देवकाते, राजरत्न ओवाळ, कार्तिक मोरे व करण मोहिते यांनी कवितेतून आई विषयीच्या भावनांना वाट करून दिली. कु.श्रुती नाळे हिने आपल्या कवितेतून भावाचे महत्त्व मांडले. 'उदास असला तरी माझ्यासाठी हसतो, माझा हट्ट पुरविण्यासाठी माझा भाऊ जीवाचे रान करतो'. या तिच्या ओळी लक्षवेधी ठरल्या. श्रेयस हिवरे या विद्यार्थ्याने स्वत:कडे पाहण्याची एक दृष्टी देणारी कविता सादर केली. रुद्र ओवाळ या विद्यार्थ्याने आईवरील एक सुंदर गीत सादर केले. शाळेतील शिक्षक व कवी डॉ.प्रेमनाथ रामदासी यांनी 'टिपटूश' व 'निवडुंगाचे झाड' या कविता सादर केल्या. प्रम ुख अतिथी मोहनानंद महाराज यांनी आपल्या मनोगतातून भूतकाळातील आठवणींना उजाळा दिला. कविसंमेलनाचे अध्यक्ष राजाराम गुजर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे मनभरून कौतुक केले. विद्यार्थिनी कु.सार्थकी देवकाते हिने बहारदार सूत्रसंचालन केले. मुख्याध्यापक रमजान शेख यांनी आभार मानले. या उपक्रम ाबद्दल सर्वांचे कौतुक केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील उपशिक्षिका स्वाती गायकवाड, श्रद्धा कुलकर्णी व शुभम म्हसवडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## अक्कलकोटमध्ये मावा विक्री करणाऱ्यावर गुन्हे दाखल करणार

### नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि.१ मार्च -**

शहरात मावा विक्री करणाऱ्या पानटपऱ्या चालक व दुकानदारांवर तत्काळ गुन्हे दाखल करण्यात येणार असून पोलिस निरीक्षक दीपक भिताडे आणि मुख्याधिकारी रमाकांत डाके यांच्या संयुक्त विद्यमाने एक समिती कायम स्वरूपी कार्यरत ठेवण्याचे आदेश नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी दिले.

या आदेशामुळे मावा शहरातून हद्दपार होणार आहे. यासाठी आरोग्य समिती सभापती अविनाश मडीखांबे आणि नगरसेवक तम्मा मामा शेळके यांनी पुढाकार घेतला आहे. या कामास नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रमाकांत डाके यांचे सहकार्य मिळत आहे. अक्कलकोट मध्ये जे कोणी मावा विक्री करतील त्यांच्यावर आणि मावा विक्री करणाऱ्या पान टपऱ्या चालक व दुकानदारांवर गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. शहरातील चांगले रस्ते मावा खाऊन थुंकल्यामुळे रंगीत आणि अस्वच्छ होत आहेत. ही अस्वच्छता बघून नागरिकांना किळस येऊन उलट्या होण्याची वेळ आली




आहे. याची गंभीर दखल नुतन सभापती अविनाश मडीखांबे आणि नगरसेवक भिमराव उर्फ तम्मा मामा शेळके यांनी घेत पुढाकार घेतला. शहरातील मावा विक्री त्वरीत बंद करण्यात यावी आणि जे कोणी मावा विक्री करतील त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी मागणी या दोघांनी मुख्याधिकारी रमाकांत डाके यांच्याकडे केली आहे. या मागणीची दखल घेत नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी एक समिती गठित करण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशाचे पालन न करणाऱ्यावर गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. त्यामुळे मावाआता हद्दपार होणार आहे. आरोग्यास घातक असलेल्या मावा ची अनेक दुकाने पान टपऱ्या अक्कलकोट येथे मोठ्या प्रमाणात असून या पान टपऱ्या समोर मोठ्या प्रमाणात मावा खाऊन रस्त्यावर थुंकले जात आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून रस्त्यावर अस्वच्छता निर्माण झाली आहे. आरोग्य समितीचे सभापती अविनाश मडीखांबे यांनी आपल्या पदाची सुत्रे हाती घेतल्या नंतर त्यांनी अक्कलकोट मधील स्वच्छतेला प्राधान्य दिले आहे.

> या निर्णयाचे नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, मुख्याधिकारी रमाकांत ढाके, पोलीस निरीक्षक दीपक भिताडे आणि पर्यावरणवादी सर्व नागरिकांनी स्वागत केले असून हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी नागरिकांचा पाठिंबा मिळत आहे. अक्कलकोट शहरात आणि नगरपरिषदेच्या मालकीच्या शॉपिंग सेंटरच्या समोर आणि जागोजागी तसेच अयोध्या शॉपिंग सेंटर एस टी बस स्थानकासमोर मोठ्या प्रमाणात पान टपऱ्यामध्ये आणि तेथील हॉटेल्ससमोर मावा खाऊन रस्त्यावर थुंकले जात आहे. त्यामुळे अशी घाण बंद होणे गरजेचे आहे.
>
> **- अविनाश मडीखांबे**
> आरोग्य समिती सभापती, न प अक्कलकोट

# सुरु झाला उन्हाळा; सोलापूरकर घामाघुम

## मार्च महिन्याच्या पहिल्याच दिवशी सुर्यदेवाचा कोप

## यंदाच्या सर्वाधिक ३७.२ अंश तापमानाची झाली नोंद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ मार्च-**

१ मार्च २०२६ रोजी दुपारी उन्हाचा चटका चांगलाच वाढला आणि यामुळेच आज रविवार, दि. १ मार्च रोजी यंदाच्या सर्वाधिक तापमानाची म्हणजेच ३७.२ अंश सेल्सियस इतकी नोंद झाली. वाढत्या उन्हामुळे सोलापूरकर घामेघुम झाल्याचे दिसून आले. गेल्या काही दिवसांपासून सोलापुरात तापमानाचा पारा हळूहळू चढत होता.

फेब्रुवारीच्या २० तारखेपासूनच या तापमानात वाढ होती. २८ तारखेपर्यंत ३५ अंश ते ३६ अंशापर्यंत हा पारा वाढत गेला. २७ तारखेला ३६.९ अंश सेल्सियस पारा होता, तर दि. २८ रोजी तो ३६.५ वर आला. दरम्यान, आज १ मार्च रोजी पुन्हा तापमान वाढून तो थेट ३७.२ अंशावर गेला आहे. रविवारी सकाळी हवामान सुखद होते; दुपारच्या वेळी कडक ऊन आणि उष्णता जाणवत होती. सायंकाळी पुन्हा वातावरण थंड पडले.

उन्हाळ्यामुळे दिवसेंदिवस उन्हाचा पारा चढणार असल्याने दुपारी १२ ते ४ या वेळेत नागरिकांनी शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे, असेही प्रशासनाच्या आपत्ती विभागाकडून सांगण्यात येत आहे. भरपूर पाणी प्या आणि कडक उन्हापासून संरक्षण करण्याचीही गरज आहे. दरवर्षी सोलापुरात एप्रिल-मेच्या दरम्यान ४० ते ४४ अंशाच्या घरात तापमान जात असते.

त्यामुळे अनेक नागरिक दुपारच्या वेळात घराबाहेर पडणे टाळतात. थंड पेयांच्या गाडीवर, दुकानात मोठी गर्दी दिसते. पाणी थंड ठेवणाऱ्या गरिबांचे फ्रीज म्हणजेच माठांचीही विक्री या एक-दोन महिन्यात मोठ्या प्रमाणात होते. अवकाळी पाऊस आणि गारपिटीच्या तडाख्यानंतर आता हळूहळू उन वाढत आहे.

रविवारी ३९.४ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली आहे. कमी दाबाच्या पट्ट्याचा प्रभाव कमी झाल्याने काही दिवसांपासून हवामान कोरडे आहे. त्यामुळे उन्हाचा चटका जाणवू लागला आहे. गेल्या चार-पाच दिवसांपासून ३७ अंश सेल्सिअसच्या वर कमाल तापमान आहे. त्यामुळे रस्त्यावर दुपारी एक ते तीन वाजेच्या सुमारास शुकशुकाट दिसून येत आहे.



# ‘उमेद’च्या माध्यमातून राज्यातील सर्व महिलांना लखपती दीदी बनवण्यात येणार

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे प्रतिपादन

## रुक्मिणी महोत्सवाचे पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ मार्च-**

राज्यातील सर्व महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासन महिलांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. उमेद च्या माध्यमातून राज्यातील सर्व महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या माध्यमातून सर्व महिलांना लखपती दीदी बनवण्याची ग्वाही राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज्यमंत्री चा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

नॉर्थकोर्ट मैदान येथे ग्रामविकास व पंचायत राज विभाग जिल्हा परिषद सोलापूर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सोलापूर उमेद, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान आयोजित रुक्मिणी महोत्सव व मिनी सरस जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन या कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन करून उद्घाटन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी ते मार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त सचिन ओंबसे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा परिषद सदस्य चेतन केदार ,नगरसेविका रोहिणी तडवळकर, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा श्री. जगताप आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. गोरे म्हणाले की, महिला बचत गटांनी स्वतः उत्पादित केलेल्या मालांचे वस्तूचे विक्री व प्रदर्शन करण्यासाठी हक्काची बाजारपेठ मिळावी म्हणून हा मिनी सरस जिल्हा रुक्मिणी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. महिलांची आर्थिक बळकटी व सक्षमीकरणासाठी हा महोत्सव घेण्यात येतो. उमेद च्या माध्यमातून देशाचे पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील महिला स्वतःच्या पायावर उभ्या राहाव्या, त्यांना मानाने, सन्मानाने जगता यावे त्यांना मानाचे स्थान मिळावे यासाठी उमेदच्या माध्यमातून प्रयत्न केले जातात, असे त्यांनी सांगितले.

तसेच महिला बचत गटाच्या माध्यमातून नवनवीन मोठे उद्योग महिलांनी निर्माण करावे, तसेच प्रत्येक गावागावांमधून महिला बचत गटाच्या माध्यमातून प्रत्येक गावी एक प्रभाग संघ निर्माण व्हावे अशी भूमिका ठेवून आपण सर्वांनी काम करावे. गावातील दूध व्यवसाय करणाऱ्या महिलांनी स्वतःची दूध बँक तयार करावी. शेळ्या, मेंढ्या व गाई पालन हा व्यवसाय सर्वात जास्त पैसा मिळवून देणारा ग्रामीण भागातील व्यवसाय आहे. महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून उत्पादित केलेल्या मालाला चांगले पॅकिंग केले तर चांगला पैसा मिळतो. महिलांच्या उत्पादित मालाला हक्काची बाजारपेठ मिळण्यासाठी सोलापूर जिल्ह्यासाठी उमेद मॉल मंजूर केला गेला आहे, अशी ही माहिती पालकमंत्री श्री. गोरे यांनी दिली. उमेद मॉल मुळे सोलापूर जिल्ह्यातील महिलां च्या उत्पादित वस्तूंसाठी बारा महिने हक्काची बाजारपेठ मिळणार आहे . राज्यातील जवळपास सर्व जिल्ह्यात मुख्यमंत्री महोदयांनी असे मॉल मंजूर केले आहेत. तसेच गावांमध्येमहिला बचत गटाच्या बैठकीसाठी हक्काचे कार्यालय निर्माण करून देण्याचा प्रस्ताव आम्ही शासनाकडे सादर केला जाणार असल्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

### महिला स्वयंसहायता समूहांना कर्ज वाटप धनादेश वितरण

कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर महिला बचत गटांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल बक्षीस वितरण करण्यात आले यामध्ये महिला स्वयंसहायता समूहांना समुदायिक गुंतवणूक निधी ३२ कोटी ९ लाख ४० हजार रुपये चा धनादेश देण्यात आला, तसेच महिला स्वयं सहायता समूह बँक कर्जवाटप २ कोटी २५ लाख रुपयांचा धनादेश वितरित करण्यात आला. उमेद अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील पहिल्या महिला फेडरेशनच्या नोंदणी पत्राचे वितरण करण्यात आले. सन २०२५ - २६ अंतर्गत वार्षिक कृती आराखडा मधील सर्व उद्दिष्ट पूर्ण केल्याबद्दल प्रत्येक तालुका अभियान व्यवस्थापन कक्षाचा प्रमाणपत्र देऊन सत्कार पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आला. व त्यानंतर पालकमंत्री महोदयांनी महोत्सवातील प्रत्येक स्टॉलला भेट देऊन पाहणी केली. या महोत्सवात महिला बचत गटांचे ८० स्टॉल लागलेले आहेत. तरी सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या स्टॉलला भेट देऊन महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंची खरेदी करावी असे आवाहन करण्यात आले. हे प्रदर्शन नॉर्थ कोर्ट मैदान येथे दिनांक १ ते ५ मार्च २०२६ या कालावधीत आहे. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन व समारोप प्रकल्प संचालक श्री. जगताप यांनी केले.



# धर्मवीर बलिदान मासामुळे छत्रपती श्री संभाजी महाराजांच्या बलिदानाचे स्मरण

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे प्रतिपादन

## धर्मवीर बलिदान मासानिमित्त २७६ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ मार्च-**

धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांनी धर्मासाठी केलेला त्याग अतुलनीय आहे. धर्मवीर बलिदान मासामुळे धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांच्या बलिदानाचे स्मरण समाजातील प्रत्येकाला होते असे प्रतिपादन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले. धर्मवीर बलिदान मासानिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे शिवस्मारक येथे आयोजित रक्तदान शिबिरात रविवारी २७६ जणांनी रक्तदान करून धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांना श्रद्धांजली वाहिली. यात सोलापूर शहरातून १७५ तर दक्षिण सोलापूर तालुक्यातून १०१ जणांनी रक्तदान केले.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, भाजपा शहर अध्यक्षा रोहिणी तडवळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांनी दिलेली धर्माची शिकवण नव्या पिढीला माहीत व्हावी, त्यांचा आदर्श नव्या पिढीने घ्यावा हा उद्देश श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या कामातून सफल होताना दिसत आहे.

छत्रपती श्री संभाजी महाराजांच्या धर्मवीर बलिदान मासानिमित्त दरवर्षी राज्यभरात रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येते. त्या अंतर्गत सोलापूर शहरात रक्तदान शिबिर घेण्यात आले.

याप्रसंगी डॉ. हेडगेवार रक्तपेढीचे अध्यक्ष सतीश मालू, शिवस्मारकचे सचिव गंगाधर गवसने, नगरसेवक राजकुमार पाटील, नगरसेवक सत्यनारायण गुर्रम, नगरसेवक अक्षय अंजिखाने, नगरसेवक श्रीनिवास दायमा, नगरसेवक ज्ञानेश्वर म्याकल, श्रीरंग गवई, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान सोलापूर विभागाचे तसेच तळे हिप्परगा, हगलूर, उळेवाडी, उळेगाव, कासेगाव, वडजी आदी भागातील धारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घटनेचे मूळ दडपलेली फिर्याद अविश्वासहार्य

## उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ मार्च -**

आलेगाव (ता.माढा) येथे टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे कॉन्स्टेबल तपासास गेलेले असताना त्यांच्या सरकारी कामात अडथळा आणला या आरोपावरून गुन्हा दाखल झालेले रामचंद्र तुकाराम चंदनकर व रुपेश मनोहर मुळीक यांच्याविरुद्ध दाखल झालेल्या गुन्ह्या संदर्भात दाखल झालेल्या अटकपूर्व जामीन अर्जाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालय कोल्हापूर सर्किट बेंच येथे होऊन न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी यांनी दोन्ही आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला. फिर्यादीने घटनेचे मूळ दडपलेले आहे त्यामुळे फिर्यादीवर विश्वास ठेवणे शक्य होणार नाही असे महत्त्वपूर्ण निरीक्षण न्यायमूर्तींनी निकालपत्रात नमूद केले आहे.



दि.०१.०१.२०२६ रोजी टेंभुर्णी पोलीस स्टेशनला ११२ नंबर वरून तातडीचा फोन आला त्यासंदर्भात फिर्यादी पोलीस कॉन्स्टेबल आलेगाव येथे तपास कामासाठी गेलेले असताना व तपास करत असताना त्या ठिकाणी विटारा ब्रेझा ही कार तिथे आली व त्या कारमधून उतरून आरोपींनी फिर्यादी पोलीस कॉन्स्टेबल याचे बरोबर भांडण करून तू येथे का आलास म्हणून धक्काबुक्की करून त्यास खाली पाडून सरकारी कामात अडथळा आणला असे सरकार पक्षाचे म्हणणे होते. आरोपीने दाखल केलेला अटकपूर्व जामीन अर्ज बार्शी सत्र न्यायालयाने फेटाळून लावला होता. त्याविरुद्ध आरोपींनी उच्च न्यायालयात ड. जयदीप माने यांच्यामार्फत अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. सदर जामीन अर्जाच्या सुनावणी दरम्यान ड. जयदीप माने यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की आरोपी हे घरातील आजारी महिलेला उपचारासाठी इंदापूरला घेऊन गेले होते व ते परत येत असताना विनाकारण फिर्यादीने गाडी अडवली व आरोपीबरोबर गैरवर्तन केले, त्याबद्दल आरोपीने मी तुमच्यावर फिर्याद दाखल करतो असे म्हटल्याने त्याला शह देण्यासाठी आरोपींना खोटेपणाने गुंतवलेले आहे. फिर्यादी व आरोपीची ओळख देखील नाही किंवा त्या ठिकाणी झालेल्या घटनेची काही संबंध नाही परंतु केवळ अहंकार दुखावल्यामुळे पोलीस फिर्यादीने घटनेचे मूळ दडपून आरोपीला खोटेपणाने गुंतवले आहे असा युक्तिवाद न्यायालयात केला. या प्रकरणी आरोपींतर्फे ॲड. जयदीप माने, ॲड. विकास मोटे तर सरकारतर्फे एस. एस. चौधरी यांनी काम पाहिले.



# ‘पुट्टींटी पट्टुचिरा’च्या अनुषंगाने तिरुपती देवस्थानच्या टी.जानकीदेवी यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ मार्च-**

सोलापुरातील पद्मशाली पद्मावती ब्रम्होत्सवम समितीच्या वतीने तिरुपती येथे ब्रह्मोत्सवम् काळात पुट्टींटी पट्टूचिरा अर्थात् माहेरची साडी हा उपक्रम राबविण्यात येते. या अनुषंगाने सोलापुरातील भाविकांना याकाळात दर्शन, निवास, मानाची पूजा यासाठी विशेष सोय उपलब्ध करुन देण्यात यावी, अशा आशयाचे निवेदन तिरुमला तिरुपती देवस्थानम्च्या संचालिका टी.जानकीदेवी यांच्याकडे देण्यात आले. पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघम्च्या वतीने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमाच्या निमित्ताने तिरुमला तिरुपती देवस्थानम्च्या संचालिका टी.जानकीदेवी ह्या सोलापूरच्या दौऱ्यावर आल्या होत्या. यावेळी त्यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी प्रा.व्यंकटेश पडाल, गोपीकृष्ण वड्डेपल्ली, नागेश सरगम, नरसप्पा इप्पाकायल, सुरेश फलमारी, संतोष सोमा, शंभय्या वडलकोंडा आदी उपस्थित होते.

# शिक्षण, उद्योग, सहकार, राजकीय आदी क्षेत्रात पद्मशालीयांनी उमटविला ठसा : नरहरी परकीपंडला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ फेब्रुवारी-**

शिक्षण, उद्योग, सहकार, राजकीय, सामाजिक आदी क्षेत्रात सोलापूरसह देशभरातील पद्मशाली समाजबांधव आपला ठसा उमटविला-उमटवित आहेत. राजकीय क्षेत्रातून समाजाला खूप काही साध्य करता येऊ शकते. त्यामुळे पद्मशाली समाजाने सामाजिक आर्थिक क्षेत्राबरोबरच राजकारणात अधिक सशक्त होण्याची गरज आहे, असे प्रतिपादन मध्य प्रदेश सरकारचे प्रधान सचिव नरहरी परकीपंडला यांनी केले.



अखिल भारतीय पद्मशाली संघ संचलित पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघम्च्या वतीने आयोजित केलेल्या महाराष्ट्रभरातील पद्मशाली समाजाच्या नूतन लोकप्रतिनिधींच्या सत्कार सोहळ्यात बोलताना ते पुढे म्हणाले, पद्मशाली बांधव विविध कलाकौशल्यात पारंगत आहेत. राजकीय क्षेत्रात केवळ एकदा निवडून येऊ नये तर सुमारे ५० वर्षे सातत्याने निवडून आले पाहिजे, असे काम करणे अभिप्रेत आहे.

व्यासपीठावर महापौर विनायक कोंड्याल, अखिल भारतीय पद्मशाली संघम्चे गौरव अध्यक्ष श्रीधर सुंकुरवार, अध्यक्ष स्वामी कंदगटला, उपाध्यक्ष रामकृष्ण कोंड्याल, सरचिटणीस प्रदीप संगा, समन्वयक तुकेश भैरी, महाराष्ट्र पद्मशाली संघम्चे अध्यक्ष भूपती कमटम, पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघम्चे अध्यक्ष डॉ.सूर्यप्रकाश कोठे, माजी आमदार कैलास गोरंट्याल, महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओंबासे, माजी आयुक्त चंद्रकांत गुडेवार, सहाय्यक पोलिस आयुक्त विजयालक्ष्मी कुर्री यांच्यासह व्यंकटेश चाटला, वासुदेव इप्पलपल्ली, यल्लप्पा गड्डम, दयानंद मामड्याल, श्रीनिवास चिलका, हरिदास पोटाबत्ती, सुरेश फलमारी, दशरथ गोप, डॉ.माणिक गुर्रम, रमेश विडप, धनश्री कोंड्याल उपस्थित होते. याप्रसंगी महापौर कोंड्याल यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ.सूर्यप्रकाश कोठे यांनी प्रास्ताविक केले. अनिता बुरा यांनी सूत्रसंचालन केले. प्रदीप संगा यांनी आभार मानले. यावेळी महापौर विनायक कोंड्याल, यांच्यासह नगरसेवकद्वय प्रथमेश कोठे, स्वाती बडगू, मेघनाथ येमूल, उज्ज्वला दासरी, दीपिका यलदंडी, सतीश सिरसिल्ला, अजय पोन्नम, सिध्देश्वर कमटम, अर्चना वडनाल, सत्यनारायण गुर्रम, विजय चिप्पा, श्रीकांचना यन्नम, प्रशांत पल्ली, कविता गज्जम, व्यंकटेश कोंडी, ज्ञानेश्वर म्याकल, दत्तात्रय रासकोंडा, श्रीपाद छिंदम, सरोजिनी पगड्याल या लोकप्रतिनिधींचा सन्मान करण्यात आला.

# सायबर गुन्हे, ड्रोन व डायल ११२ उपक्रमांकाची जनजागृती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ मार्च-**

सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधीकरणच्या वतीने वडाळा (ता. उत्तर सोलापूर) येथे सेवा महाशिबीर आयोजित करण्यात आले होते. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती निजामोद्दिन जमादार, न्यायमूर्ती फिरदोश पुनीवाला, सोलापूर जिल्हा सत्र न्यायाधीश मनोज शर्मा, पोलिस आयुक्त एम.राजकुमार, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.




सायबर गुन्हे जनजागृतीत गुन्हेगारीचे प्रकार, बचावाचे उपाय तसेच ऑनलाईन फसवणूक टाळण्यासाठी आवश्यक खबरदारी याची जनजागृती करण्यात आली. डायल ११२ या सेवा वापर, आषाढी वारी, कोम्बींग ऑपरेशन, कायदा व सुव्यवस्था बंदोबस्त, मोर्चे आदींविषयी माहिती देण्यात आली.यावेळी अपर पोलिस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलिस अधिकारी संकेत देवळेकर यांच्यासह पोनि संजय जगताप, राहुल देशपांडे, सपोनि डोंगरे, टिळेकर, पोउपनि अमितकुमार करपे, मणूरे, पोहेकॉ तांबोळी, पोकॉ अजित सुरवसे, अरब आदी उपस्थित होते.

# वायर चोरणाऱ्या सिक्युरिट गार्डसह एकास अटक

**सोलापूर** : सोलार प्लांट मधील वायर चोरणारा सिक्युरिट गार्डसह एकास अटक करण्यात आली असून वळसंग पोलीस ठाणेकडील १ गुन्हा उघड करून एकुण १८ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सपोनि भिमगोंडा पाटील व त्यांचे पथक पेट्रोलिंग करीत असताना सागर माळी व अनिल माळी (दोघेही रा.लिंबिचिंचोळी ता.दक्षिण सोलापूर) हे आचेगाव येथील टाटा पावर सोलार प्लांटमधील वायर चोरुन त्यातील तांबा विक्रीकरिता गिऱ्हाईक शोधत फिरत आहेत, अशी गोपनीय माहिती प्राप्त झाली. त्याअनुषंगाने शोध घेत असताना कुंभारी ब्रिजखाली ते दोघे मिळून आले. त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता गुन्हा केल्याची कबुली दिली. पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलिस अधीक्षक प्रितम यावलकर, वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि भिमगोंडा पाटील, पोहेका सलीम बागवान, विजयकुमार भरले, पोकॉ सागर ढोरे-पाटील, प्रमोद शिंपाळे, यश देवकते, समर्थ गाजरे, चापोकॉ दिलीप यांनी ही कामगिरी बजाविली.

# लावणीच्या ठसक्याने प्रेक्षकांना खिळवून ठेवले

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१ मार्च-**

तुमच्या वीणा राया मला कुणी सुद्धा न्हाय... अर्ध्यावरती डाव असा मोडायचा न्हाय... वाढत्या वयाला सांगा रोखू कशी काय.... लावणी मरेपर्यंत तरूणच हाय...’चाळानं माझी भूक जाणली...’ ’ काय केला हो तुमचा गुन्हा, तुम्हा वाचून जीव माझा सुना’ म्हणत अकलूज लावणी नृत्य स्पर्धेत लावण्यवतींनी रसिकांची मने जिंकली.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती आयोजित २९ वी राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धेच्या दुसऱ्या दिवसाच्या सादरीकरणाची सुरुवात वैष्णवी कोल्हापूरकर, रेणुका सांस्कृतिक कला केंद्र अंबप वाठार जि. कोल्हापूर यांनी रसिकांना ठेका धरायला लावला. दि. २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी दोन दिवसीय राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. आजच्या नृत्य स्पर्धेनिमित्त प्रमुख पाहुणे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, माजी मंत्री आमदार दिलीप सोपल, पद्मश्री पुरस्कार प्राप्त तमाशा कलावंत रघुवीर खेडकर, जयंती समारंभ समितीचे संस्थापक जयसिंह मोहिते-पाटील, प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुजरा, गवळण, बैठकीची लावणी, छक्कड व जुगलबंदी या पारंपारिक लावणी प्रकाराच्या सादरीकरणातून वैष्णवी कोल्हापूरकर व रेणुका संस्कृती कला केंद्राच्या लावण्यवतींनी आपल्या अदाकारीने रसिकांना भुरळ घातली. नृत्याला अभिनयाची जोड देत, ढोलकी व घुंगराची जुगलबंदी सादर करत महाराष्ट्राचा लोककलेचा वारसा या स्पर्धेत छाया, पूजा, श्रद्धा कोल्हापूरकर रेणुका संस्कृती कला केंद्र अंबप वाठार जिल्हा कोल्हापूर, राजनंदिनी सांस्कृतिक कला केंद्र यवत चौफुला जि पुणे, यांनी अतिशय सुंदर सादरीकरण करत प्रेक्षकांची मने जिंकली तर गायिका अस्मिता वर्मा यांनी आपल्या सुरेल आवाजात लावणी गायन केले. वैष्णवी कोल्हापूरकर अतिशय सादरीकरण चांगले केले. नटरंग सांस्कृतिक कला केंद्र मोडनिंब,जि. सोलापूर, प्रिया नगरकर न्यू सांस्कृतिक कला केंद्र यवत चौफुला जि पुणे, रुक्मिणी, अर्चना, ज्योत्स्ना वाईकर पिंजरा सांस्कृतिक कला केंद्र वेळे जि. सातारा यांच्या अप्रतिम सादरीकरणातून रसिक मंत्रमुग्ध झाले.



**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## दयानंद विज्ञानमध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ मार्च :** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात भाषा विभागाच्या वतीने दि.२७ फेब्रुवारी २०२६ रोजी ज्येष्ठ कविवर्य कुसुमाग्रज ऊर्फ वि.वा.शिरवाडकर यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी कॉलेज,परभणी येथील डॉ.एस.एन.केशेट्टी व ग्रामीण कॉलेज वसंतनगर कोटग्याल,जि.नांदेड येथील डॉ.डी.के.केंद्रे यांनी कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सर्वांना जयंतीच्या व मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा देताना मराठी भाषेचे जतन व संवर्धन करणे हे प्रत्येक मराठी भाषिकांचे आद्य कर्तव्य असून मराठी भाषेची अस्मिता जोपासली पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षक हेमंत वरुडकर, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, कनिष्ठ लघुलेखक बन्सी कांबळे, भाषा विभागातील इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.मेघा पंडित, हिंदी विभाग प्रमुख डॉ. गजानन बने, मराठी विभाग प्रमुख डॉ.रामशेट्टी शेटकार, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.महेश बेंबडे, कॅप्टन डॉ.विजेंद्र चौधरी, डॉ.विश्वनाथ मोटे, प्रा.कविता जाधव, डॉ.पांडुरंग गोरे, विठ्ठल चव्हाण, विनोद घार, सतीश तांदळे, किशोर जाधव, सुनील राक्षे, बाबासाहेब बचाटे, सागर इंदाणी, पर्णवी ढवारे यांच्यासह इतर प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.



# सांप्रदाय वाढला तरच जग टिकणार

## देशातील सर्वात भव्य संत तुकाराम महाराजांचे मंदिर लातूरात व्हावे: आ. रमेशआप्पा कराड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ मार्च :** लाखो लोकांना एकत्र आणण्याची खरी ताकद फक्त संताच्या विचारात आणि वाणीत आहे जोपर्यंत सांप्रदाय जिवंत आहे तोपर्यंत सर्व समाज जिवंत असेल सांप्रदाय टिकला तरच जग टिकणार असून देशातील सर्वात भव्य जगद्गुरु तुकाराम महाराजांचे मंदिर लातूरात व्हावे, जिथे संकल्प असतो तिथे कसलीही अडचण येत नाही असे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखवले.





श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या ३७५ व्या वैकुंठगमन, श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या ६७५ व्या संजीवन समाधी आणि कैवल्य चक्रवर्ती संतश्रेष्ठ ज्ञानोबा माऊलीच्या ७५० व्या जन्म उत्सव सोहळ्यानिमित्त लातूरनजीक खंडापूर गावाजवळ अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यानिमित्ताने संतांचा मेळा आणि वारकऱ्यांचा कुंभमेळा होत आहे. या अभूतपूर्व सोहळ्यात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड आणि त्यांच्या सुविद्यपत्नी सौ. संजीवनीताई कराड यांनी शनिवारी सहभागी होऊन विविध संतांच्या पादुकाचे भक्तीभावे दर्शन घेतले. हभप गुरुवर्य ज्ञानेश्र्वर माऊली कदम महाराज यांच्या प्रवचनानंतर त्यांचा यथोचित सत्कार करून स्वागत केले.

यावेळी शुभेच्छा देताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, खंडापूर परिसरात साधुसंताचा मेळा होतोय या निमित्ताने देहूचे तुकाराम महाराज, आळंदीचे ज्ञानेश्र्वर माऊली आपल्या परिसरात आले त्यांचे दर्शन आणि आशीर्वाद आपल्याला मिळत आहेत. खरोखरच आम्ही सर्वजण नशीबवान आहोत. एवढा मोठा सप्ताह देशात कुठे झाला असेल असे मला वाटत नाही, भविष्यातही अशीच संधी लातूरकरांना मिळावी सेवेसाठी लातूरकर कुठेही कमी पडणार नाही याची मला खात्री आहे. लाखो लोकांना एकत्र आणण्याची खरी ताकद फक्त संताच्या विचारात आणि वाणीत आहे. जोपर्यंत सांप्रदाय जिवंत आहे तोपर्यंत सर्व समाज जिवंत आहे.

सप्ताह परिसरात जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचे मंदिर उभारण्याची संकल्पना पुढे आली. हे मंदिर देशातील सर्वात भव्य मंदिर व्हावे जिथे संकल्प सत्य असतो तिथे कुठलीही अडचण येत नाही या मंदिर उभारणी बरोबरच प्रति देहू उभे राहावे अशी इच्छा व्यक्त करून संत महात्मे जे आज्ञा, सूचना, आदेश करतील ती सेवा देण्याचे काम मी आणि माझा परिवार करेल असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, संप्रदाय टिकावा यासाठी मी माझ्या लातूर ग्रामीण मतदार संघातील तब्बल ५५० भजनी मंडळांना भजनाच्या साहित्याचे वाटप केले असल्याचे बोलून दाखवले.

आप्पाचा विषय लय हार्ड आहे त्यांच्याकडे क्रेडिट कार्ड आहे असे बोलून माऊली कदम महाराज यांनी शेवटच्या दिवशी होणाऱ्या पुरणपोळी जेवणाकरिता दुधाची अपेक्षा व्यक्त केली. सर्वांच्या आशीर्वादाने लातूर ग्रामीण मतदार संघाची सेवा करण्याचे भाग्य मला मिळाले असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड यांनी लागेल तेवढे दूध आणि तूपही देऊ असे जाहीर केले त्याचबरोबर या सप्ताहाच्या नियोजनासाठी अकरा लक्ष रुपयाची यावेळी मदत केली. रस्त्याच्या कडेने फिरून पोट भरणाऱ्या भिकाऱ्याला कोविड झाला नाही मात्र करोडपती, आरोबोपतीचा ऑक्सिजन अभावी मृत्यू झाला हे सत्य आहे. सांप्रदाय टिकला तर जग टिकणार याचा प्रत्यय कोरोना काळात सर्वांना आला असल्याचेही त्यांनी बोलून दाखवले.

यावेळी भाविक भक्त महिला पुरुष प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. आ. कराड यांच्यासमवेत भाजपाचे प्रदीप पाटील खंडापूरकर, जिल्हा परिषद सदस्य महादेव साळुंके, महेंद्र गोडभरले, पद्माकर चिंचोलकर, प्रताप पाटील, बन्सी भिसे, उद्धव काळे, सतीश आंबेकर, अनंत चव्हाण, अभिषेक आकनगिरे, दशरथ सरवदे, शरद दरेकर, साहेबराव मुळे, सुरज शिंदे, दीपक वांगसकर, राजकिरण साठे, ज्ञानोबा भिसे, वसंत करमूडे, अनंत पाटील, मारुती शिंदे, चंद्रकांत कातळे, राम मोरे, रवींद्र नागरगोजे, धनराज शिंदे, संतोष चव्हाण, लक्ष्मण खलंग्रे, किरण मुंडे, प्रशांत शिंदे, अक्षय भोसले, शंकर चव्हाण, श्रीमंत नागरगोजे, देवराव मोहिते, बंटी शिंदे, ओम चव्हाण, रवींद्र पाटील, बालाजी गवळी, एम. डी. मुळे, दत्ता सप्ताळ, गोविंद मुंडे यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी व इतर अनेक जण होते.

## विविध वृत्त...

### सावित्रीबाई फुले आधार व पं. दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेसाठी अर्ज करावेत

**लातूर:** राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती (भटक्या जाती क वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी शासनाने सन २०२५-२६ साठी सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना सरू केलेली आहे. प्रति जिल्हा ६०० विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

महसुली विभाग शहरातील व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजन, निवास व निर्वाह भत्ता ४३ हजार रुपये, जिल्ह्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजन, निवास व निर्वाह भत्ता ३८ हजार रुपये व तालुक्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भोजन, निवास व निर्वाह भत्ता विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांक सलग्न असलेल्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे. या योजनेतर्गत अर्ज करण्याकरीता विद्यार्थी वसतिगृह प्रवेशास पात्र असावा. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवाशी असावा. सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र,तसेच जात वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याच्या पालकाचे उत्पन्न २ लाख ५० हजार रुपयापेक्षा जास्त नसावे. विद्यार्थ्यांने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था शहराच्या तथा तालुक्याच्या ठिकाणी आहे, अशा शहरातील विद्यार्थी स्थानिक रहिवाशी नसावा. विद्यार्थी बारावीनंतरचे उच्च शिक्षण घेत असावा. तसेच विद्यार्थ्याने इयत्ता बारावीमध्ये ६० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले असावेत. वरील अटींची पूर्तता करणाऱ्या इतर मागास वर्ग विमुक्त जाती व भटक्या जमाती (भटक्या जाती क वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले आधार योजना व धनगर समाजातील विद्यार्थ्यांनी पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वंयम योजनेतर्गत १० मार्च, २०२६ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने या संकेतस्थळावर https://hmas.mahait.org अर्ज भरावे. अधिक माहितीसाठी निरीक्षक भगवान केंद्रे (मो. न. ९५६११०९०१८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूर येथील इतर मागास बहुजन कल्याण सहायक संचालक अभय अटकळ यांनी केले आहे.

### जेईई परीक्षेत जिल्ह्यात पहिला आल्याबद्दल सुमित धावणे याचा सत्कार



**लातूर:** जेईई मेन्स परीक्षेत लातूर जिल्ह्यात पहिला आल्याबद्दल सुमित गोविंद धावणे या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष पाडुरंग देडे, प्रेमाताई देडे यांनी सत्कार केला. सुमित धावणे या विध्यार्थ्याने आंतरभारती, राष्ट्र सेवा दलाची संस्कार शिबीरांत सहभाग घेतलेला आहे. अत्यंत अभ्यासू आणि होतकरू विद्यार्थी आहे. यावेळी सुमितची आई सौ साधना धावणे, इतर विद्यार्थी, पालक उपस्थित होते

## युवकांच्या सहभागातूनच शाश्वत विकास साध्य होईल – डॉ. डोंगरे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ मार्च :** येथील भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) विभागामार्फत आयोजित विशेष वार्षिक शिबिर मौजे जमालपूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. 'शाश्र्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकास' या संकल्पनेवर आधारित हे सात दिवसीय नुकतेच संपन्न झाले.



या शिबिराच्या समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री. बालाजी घार, प्रमुख पाहुणे डॉ. शिवप्रसाद डोंगरे, मंचावर प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, डॉ. संगीता घार, मुख्याध्यापक श्री. नागनाथ कारंडे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव आलगुले, डॉ. प्रमोद चव्हाण, डॉ. रामेश्वर स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. शिवप्रसाद डोंगरे म्हणाले की, शाश्र्वत विकास करायचा असेल तर युवकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे युवकांच्या सहभागानेच शाश्र्वत विकास साध्य होईल, विद्यार्थ्यांनी सामाजिक प्रश्र्न सोडविण्यासाठी अष्टोप्रहर अविरत कार्यरत राहणे काळाची गरज बनत चालले आहे. कारण समाजामध्ये दररोज नित्य नवीन समस्या निर्माण होत आहेत असे मत व्यक्त केले.

यां समारोप समारंभात मार्गदर्शन करताना डॉ. संगीता घार म्हणाल्या की विद्यार्थ्यांनी स्वतः आरोग्य आणि शिस्तीचे पालन चांगल्या प्रकारे केल्यामुळेच समाजामध्ये हे विद्यार्थी एक आदर्श विद्यार्थी म्हणून गणले जातील असे मत व्यक्त केले.

या सात दिवसीय शिबिरामध्ये वनराई बंधारे बांधकाम, ओसाड भूमी विकास, परिसर स्वच्छता अभियान, महिला सशक्तिकरण, नशामुक्ती जनजागृती, आरोग्य तपासणी शिबिर, अंधश्रद्धा निर्मूलन, ई-कॉमर्स व डिजिटल मार्केटिंग मार्गदर्शन, आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण, बालविवाह प्रतिबंध जनजागृती आणि रस्ता सुरक्षा अभियान असे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थ्यांचे श्रमदान व जनजागृती उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. केशव आलगुले, सूत्रसंचालन प्रा. प्रज्ञा कांबळे, तर आभार डॉ. प्रमोद चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. राजाभाऊ पवार, डॉ. अविनाश पवार, डॉ. प्रा. शिवराज बाजुळगे,श्री. रामदास जाधव, रासेयो स्वयंसेवक शितल पवार, जयश्री जमादार, शितल गडेराव, लक्ष्मी नाळापुरे, धनुरे प्रेरणा, अमर खुणे, ऋषिकेश कांबळे, सौदागर बिराजदार,हर्ष बिराजदार यांनी परिश्रम घेतले.

## दयानंद महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन सोहळा संपन्न!

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ मार्च :** कवी कुसुमाग्रज जयंती अर्थात माय मराठी भाषा गौरव दिनानिमित्त दयानंद कला महाविद्यालय मराठी विभागाने ग्रंथ प्रदर्शन, व्याख्यान व काव्य संमेलनाचे आयोजन केले होते. या निमित्ताने कवयित्री समिधा कोळगणे यांना आमंत्रित करण्यात आले होते. नवोदित विद्यार्थी वर्गातील कवी कवयित्रींनी बहारदार कवितांचे सादरीकरण करून कार्यक्रमाची उंची गाठली. मातृभाषा मराठीचा गुणगौरव करणाऱ्या कवितांबरोबरच मानवी भाव आंदोलने टिपणाऱ्या कवितांचेही सादरीकरण झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडताना मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सुनीता सांगोले यांनी मराठी भाषा व्यवहार म्हणजे केवळ व्याकरण शुद्ध बोलणे नव्हे, तर विशिष्ट परिस्थितीत, विशिष्ट हेतूने आणि विशिष्ट व्यक्तींशी संवाद साधताना भाषेचा प्रभावी वापर करणे होय. जेव्हा आपण भाषा व्यवहारात आणतो, तेव्हा शब्दांच्या अर्थासोबतच संदर्भ, संकेत आणि सामाजिक शिष्टाचार महत्त्वाचे ठरतात. मराठी भाषा व साहित्याचे सामर्थ्य, उपयोग कथन करताना भाषेचा समर्पक वापर अभिव्यक्ती प्रभावी करतो असे मत प्रतिपादन केले. प्रमुख अतिथी म्हणून कवयित्री समिधा कोलगणे यांनी मराठी साहित्य, निर्मितीबाबत आपली भूमिका मांडली. कविता त्यांच्या जीवनप्रवासाच्या साक्षी आहेत असे सांगत कविता सादर केल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी साहित्य म्हणजे मनाचा आरसा असतो यावर विवेचन केले.

राठी विभागातील प्राध्यापक डॉ. सुभाष कदम, प्रा. राजू मोरे, प्रा. अंगद भुरे,प्रा. विद्या गिराम, डॉ. सुलक्षणा सरवदे, व पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थी यांच्या परिश्रमातून कार्यक्रम यशस्वी झाला. या कार्यक्रमात दयानंद कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते. काव्य संमेलनात ओमकार सुरवसे, रवी वाघमारे, योगिता गुम्मे, पायल जावळे, देवांश पाचंगे, मधुरा धानोरकर, यश शिंदे, सुजित कांबळे, अनिकेत बिराजदार, महेश कसबे, प्रियंका कांबळे, पायल माने, अंजली बनसोडे, भाग्यश्री ढोणे, निकिता कांबळे, ऋचा कुलकर्णी, पंकज स्वामी इत्यादी कवी-कवियत्रींनी आपल्या काव्यवाचनाद्वारे श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. माय मराठीचा काव्यात्मतेचा प्रत्यय, तिच्यातील मधूर गोडवा अभिरुची संपन्न मनात कायम राहील असा घडला.

## राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ मार्च :** येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात शनिवारी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी संस्थेचे संस्थापक सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते थोर शास्त्रज्ञ डॉ. सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, शैक्षणिक समन्वयक राजीव मुंढे, पर्यवेक्षक संजय गुरमे, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.यावेळी प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले, २८ फेब्रुवारी १९२८ रोजी नोबेल पारितोषिक विजेते भारतीय भौतिकशास्त्रज्ञ सर सी. व्ही. रमण यांनी रमन इफेक्टचा शोध लावला. या कामगिरीचा गौरव करण्यासाठी आणि वैज्ञानिक जागरूकता वाढवण्यासाठी, भारत सरकारने १९८६ मध्ये २८ फेब्रुवारी हा राष्ट्रीय विज्ञान दिवस म्हणून घोषित केला. त्यामुळे आपण विज्ञान दिवस साजरा करतो. विद्यार्थ्यांनी विज्ञानाची कास धरून भारताला प्रगतीपथावर न्यावे, असे आवाहन त्यांनी केले.विज्ञान दिनानिमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना यावेळी पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

# लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात माय मराठीचा जागर!

## ➤ मराठी भाषेला समृद्ध करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज– ज्येष्ठ ग्रामीण कादंबरीकार डॉ. शेषराव मोहिते

## ➤ मातृभाषेच्या सन्मानासाठी सर्वजण पुढाकार घेऊया– जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०१ मार्च :** ज्यांच्यावर आपल्या मातृभाषेचा खोल प्रभाव आहे, असे लोक यशस्वी होण्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे आपली मुले व नातवंडे यांना मातृभाषेतील शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ ग्रामीण कादंबरीकार डॉ. शेषराव मोहिते यांनी केले. तसेच दैनंदिन जीवनात मराठीचा वापर करून आपल्या मातृभाषेच्या सन्मानासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.









जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ ग्रामीण कथाकार प्रा. सुरेंद्र पाटील, ज्येष्ठ साहित्यिक तथा ग्रामीण कृषी शब्दांचे अभ्यासक प्रा. द. मा. माने, ज्येष्ठ साहित्यिक-कवयित्री तथा बालकथाकार श्रीमती वृषाली पाटील, ज्येष्ठ कथाकार जी. जी. कांबळे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपजिल्हाधिकारी गणेश पवार, उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी आदी उपस्थित होते.

मराठी भाषेत अद्वितीय साहित्यनिर्मिती झाली आहे. साहित्यिकांनी मराठी भाषा समृद्ध केली आहे आणि वैश्विक पातळीवरही तिचा गौरव वाढवला आहे. मात्र सद्य:स्थितीत साहित्यनिर्मिती विखुरलेल्या स्वरूपात होत असल्याचे डॉ. शेषराव मोहिते यांनी नमूद केले. तसेच ग्रामीण साहित्याची समृद्ध परंपरा यावेळी त्यांनी सांगितली.

प्रत्येक जिल्ह्याची ओळख त्याच्या सांस्कृतिक वैभवावर आणि साहित्य संपदेवरून होते. आपल्या आयुष्याच्या जडणघडणीत मराठी भाषेचा खूप मोठा वाटा आहे. मराठी भाषेची अस्मिता, आपली मायबोली प्रत्येकापर्यंत पोहोचवून आपण तिचा सन्मान करूया, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केले.

ज्येष्ठ ग्रामीण कथाकार प्रा. सुरेंद्र पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, मराठी भाषेचा लौकिक साहित्यिकांनी वाढविला आहे. आपण सर्वजण मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहाने साजरा करतो, परंतु मराठी भाषेला समृद्ध करायचे असेल, तर लग्नसमारंभ, सोहळे व इतर कार्यक्रमांत मराठी पुस्तके नातेवाईक, मित्रांना भेट देण्याचा संकल्प करावा. मराठी साहित्याचे गंभीरतेने वाचन करूया, मराठीत बोलूया, मराठी भाषेचे संवर्धन करूया आणि लातूरची मराठी भाषा व संस्कृती जपूया, असे त्यांनी आवाहन केले.

ज्येष्ठ साहित्यिक तथा ग्रामीण कृषी शब्दांचे अभ्यासक प्रा. द. मा. माने यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, आज कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस आहे. मराठी भाषा टिकली पाहिजे, तिचे संवर्धन झाले पाहिजे आणि मराठी शाळा वाढल्या पाहिजेत, असे त्यांनी सांगितले. कृषी विषयातील अनेक मराठी शब्द हरवले आहेत; त्यांना पुन्हा जवळ करावे. मराठीतच संवाद साधावा आणि मराठी भाषेचे संवर्धन करावे, असे त्यांनी सांगितले.

श्रीमती वृषाली पाटील यांनी फुंकर ही मराठी कविता सादर केली. ज्येष्ठ कथाकार जी. जी. कांबळे यांनी घर असावे घरासारखे, नकोत भिती असे सांगून मुलांमध्ये लहानपणापासूनच लेखनाची आवड निर्माण करावी, असे सांगितले. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त प्रभाकर कापसे यांचा पुस्तक भेट देऊन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**जिल्हाधिकारी कार्यालयात अभ्यागतांसाठी ग्रंथदालन**

जिल्हाधिकारी कार्यालयातील तिसऱ्या मजल्यावरील अभ्यागत कक्षात मराठी ग्रंथालय दालन तयार करण्यात आले असून, त्याचे उद्घाटन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, गणेश पवार, सायली ठाकूर, तहसीलदार संदीप कुलकर्णी तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमातून मराठी भाषेचे संवर्धन, वाचन संस्कृती रुजवणे आणि मायबोलीचा गौरव करण्याचा संदेश देण्यात आला. जिल्हा ग्रंथालय संघ लातूर व जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयांच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयातील मराठी ग्रंथालय दालनासाठी ५०० ग्रंथ भेट देण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# भाऊसाहेब वाघंबर पँथर चळवळीला समर्पित होते : केंद्रीय मंत्री, ना. आठवले

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. ०१ मार्च :** अहमदपूर येथील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, आठवले पक्षाच्या वतीने ना. रामदासजी आठवले, केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री भारत सरकार व महाराष्ट्राचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांचा नागरी सत्कार सो-हळा माजी राज्यमंत्री बाळासाहेब जाधव यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता. रिपाईचे लातूर जिल्ह्याअध्यक्ष बाबासाहेब कांबळे यांनी कार्यक्रमाची सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मंत्री श्री बाळासाहेब जाधव यांनी मा. ना.श्री रामदास आठवले यांच्या अहमदपूर मधील आठवणी विषद केल्या.

सत्काराला उत्तर देताना केंद्रीय मंत्री ना. रामदास आठवले म्हणाले रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची अहमदपूर च्या भव्य सभेत म्हणाले अजितदादा पवार हे राजकारणातील चमकते तारे होते त्यांना आपल्यातून काळाने हिरावून घेतले अशी खंत त्यांनी व्यक्त करत स्वर्गीय अजित दादा यांना आदरांजली अर्पण केली.

अहमदपूर परिसरात मी दलित पँथरची शाखा काढण्यासाठी गावोगावी फिरलो आहे त्यामुळे अहमदपूर हे गाव माझ्यासाठी नवीन नसून माझा या गावाशी खूप जुना संबंध आहे गावा गावामध्ये मी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार पँथरच्या माध्यमातून रुजविण्याचे काम करीत आलो आहे. त्या काळी येथील आमचे स्नेही आणि पँथर चळवळीला समर्पित असलेले भाऊसाहेब वाघंबर



यांची सोबत मिळाली.नामांतराच्या लढ्यासाठी मराठवाड्यातील व खेड्यापाड्यातील लोक हे मराठवाड्यात मोर्चासाठी आंदोलनासाठी व मुंबईमध्ये आंदोलनासाठी यायचे त्यांना रेल्वेने यायला खूप त्रास होत होता तरी पण ते या पँथरच्या लढ्याला साथ देण्यासाठी माझ्यासोबत येत होते. ते अरुण वाघंबर याचें वडील भाऊसाहेब वाघंबर माझ्या पाठीमागे उभा राहिलेला वाघ होता त्यांनी मला या पँथरच्या लढ्यामध्ये नामांतरच्या लढ्यामध्ये खूप मोठी साथ दिली म्हणून त्यांचा मला सार्थ अभिमान आहे असे ना. रामदास आठवले म्हणाले.

रिपब्लिकन पक्ष हा माझ्या एकट्या जातीचा नसून सर्व जाती धर्मांना घेऊन मी हा पक्ष चालवीत आहे. माझा पक्ष मराठा समाज व ओबीसी समाज हा सुद्धा माझ्या चळवळीत आहे.

देशात बाबासाहेबांचे संविधान हेच सर्वात मोठे आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित दादा पवार हा राजकारणातला चमकता तारा होता पण त्यांना काळाने हिरावून नेले अशी त्यांनी खंत सुद्धा व्यक्त केली. मुख्यमंत्र्यांनी अजितदादा पवार यांच्या अपघाताची चौकशी व्हावी या उद्देशाने देशाचे गृहमंत्री अमित शहा यांना पत्र पाठवले आहे. आम्हाला रिपब्लिकन पक्ष चालवायचा आहे आम्ही कोणाच्या वाटेला जात नाही आणि आमच्या वाट्याला कोणी आले तर आम्ही त्यांना सोडत नाही मी शरद पवार साहेबांच्या व सुधाकर नाईकांच्या मंत्रिमंडळात सुद्धा समाज कल्याण व दारूबंदी मंत्री होतो मला सत्तेमध्ये पाच वर्षे राहण्याची संधी मिळाली होती मी ज्यांच्या सोबत राहतो त्यांची सत्ता येते आणि मी मंत्री होतो हेच याचे सूत्र आहे. लोकसभेमध्ये माझा एकही खासदार नसताना तरीपण मी खासदार होतो मंत्री होतो कारण की मी ज्यांच्या सोबत जातो त्यांची सत्ता येते आणि मी मंत्री होतो आणि मी सर्वांना पुरून उरतो त्यामुळे मी मंत्री होतो.

माझ्या पक्षाला सुद्धा राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता काही दिवसातच मिळणार असून माझा पक्ष सुद्धा राष्ट्रीय पक्षाच्या पाच नंबरच्या यादीत आहे. प्रकाश आंबेडकर व मी एकत्र आलो तर समाजाची ताकद खूप वाढणार आहे त्यासाठी आम्ही सुद्धा प्रयत्न करीत आहोत. आपल्या दे-शाची सैनिक क्षमता महार बटालियन ही सुद्धा खूप मोठी आहे याचा आपल्याला सार्थ अभिमान आहे.

तत्पूर्वी रिपाई जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कांबळे , कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी राज्यमंत्री बाळासा-हेब जाधव यांनी आपल्या भावना सविस्तर व्यक्त केल्या. कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख पाहुणे माजी आमदार बब्रुवान खंदाडे, दिलीपराव देशमुख, शिवानंद हिंगणे, श्रीकांत बनसोडे,त्र्यंबक गुट्टे अशोक केंद्रे ,शिवाजीराव देशमुख, नगराध्यक्ष स्वप्निल व्हते, राज्यसचिव चंद्रकांत चिकटे मराठवाडा सरचिटणीस देविदास कांबळे, डॉक्टर सुधाकर गुळवे, मिलिंद महालिंगे, निवृत्ती कांबळे प्राध्यापक श्रीरंग खिल्लारे, नारायण कांबळे, धरमपाल गायकवाड, बालाजी आचार्य, वेंकट कीर्तीने, हरीश कांबळे,बालाजी कांबळे, रमेश कांबळे, प्रदीप कांबळे, सुनील वाहुळे, पंढरी कांबळे,लक्ष्मण चिकटे, नंदकुमार बोडके व सर्व रिपाईचे लातूर जिल्ह्यातील तालुका अध्यक्ष या कार्यक्रमाला उपस्थित होते अहमदपूर तालुका अध्यक्ष अरुण भाऊसाहेब वाघंबर यांनी काढलेले कॅलेंडरचे प्रकाशन रामदासजी आठवले यांचे हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाला ग्रामीण व शहरी भागातील भरपूर महिला आणि पुरुष, जिल्हा परिषद सदस्य, नगर परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, व सरपंच उपस्थित होते. आणि यावेळी साजन बेंद्रे आणि विशाल चव्हाण या जोडीने आपल्या भीम गीता-तून, गीत गायनातून अहमदपूरकरांना मंत्रमुग्ध केले हा कार्यक्रम ऐकण्यासाठी लोक प्रचंड प्रमाणात उपस्थित होते. त्यानंतर संध्याकाळी दहा वाजता हा कार्यक्रम समाप्त झाला.

## संक्षिप्त...

### जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मराठी भाषा गौरव दिन साजरा



**शिरूर अनंतपाळ :** आनंदवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मराठी भाषा गौरव दिन तसेच कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त 'गोविंद वयातील काव्य मैफिल' हा विशेष कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. दिनांक २७ फेब्रुवारी रोजी आयोजित या कार्यक्रमास गावातील नागरिक, महिला व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. पूजन समारंभ गावचे विद्यमान सरपंच भागवत वांगे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक बालाजी शिंदे, सहशिक्षक घाकटार सर, कवयित्री सरोजा गायकवाड तसेच बालकवी गोविंद श्रीमंगल उपस्थित होते.

याप्रसंगी बालकवी गोविंद श्रीमंगल यांनी मराठी भाषा गौरव दिनाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, मराठी भाषा गौरव दिन हा केवळ सण नसून आपल्या अस्तित्वाच्या मुळाशी जोडले जाण्याचा आणि मायबोलीचा वारसा जपण्याचा आत्मचिंतनाचा क्षण आहे. त्यांच्या बालकविता आणि विनोदी कवितांमुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य खुलले होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला. संपूर्ण वातावरण साहित्यप्रेम आणि मराठी भाषेच्या अभिमानाने भारावून गेले होते.या कार्यक्रमाबाबतची माहिती आनंदवाडी गावचे लोकप्रिय सरपंच भागवत वांगे यांच्याकडून प्राप्त झाली.

### शिरूर आनंदपाल तालुक्याला अवकाळी झोडपले आणि शेतकऱ्याचे मात्रे केले




**शिरूर अनंतपाळ :** येरोळ परिसरात मागील दोन दिवसांपूर्वी झालेल्या अवकाळी पावसासह वादळी वाऱ्यामुळे रब्बी हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. ज्वारी, गहू, हरभरा या पिकांसह आंबा, पपई, चिंच आदी फळबागांना जबर फटका बसला असून अनेक ठिकाणी पिके आडवी पडून भुईसपाट झाली आहेत. हा-ताशी आलेले रब्बी हंगामातील पीक नष्ट झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या पार्श्र्वभूमीवर रयत क्रांती शेतकरी संघटना यांच्या वतीने तहसीलदार किशोर यादव यांना निवेदन देण्यात आले. अवकाळी पावसामुळे झालेल्या पिक व फळबागांच्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शासनाकडून शेतकऱ्यांना त्वरित नुकसानभरपाई जा-हीर करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष शिवाजीराव पेटे, तालुका अध्यक्ष गुडेराव चौसष्टे, प्रदेश उपाध्यक्ष बाल-ाजी महाराज येरोळकर, नवनाथ वनकुद्रे, किशन पिचारे, तुकाराम कोकरे, विश्र्वेश्र्वर बरदाळे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मराठवाडा अध्यक्ष शिवाजीराव पेटे म्हणाले की, शेतकरी आधीच कर्जबाजारी आहे. त्यात अवकाळी पावसामुळे रब्बी हंगामातील हातचे पीक पूर्णतः नष्ट झाले आहे. त्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला आहे. प्रशासनाने कोणतीही दिरंगाई न करता तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी; अन्यथा संघटनेच्या वतीने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

### बोरोळ महसूल मंडळात 'महाराष्ट्र समाधान शिबिर' आयोजन

**देवणी :** महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार नागरिकांच्या तक्रारी व प्रलंबित कामांचा तत्काळ निपटारा करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'महाराष्ट्र समाधान शिबिर' उपक्रमांतर्गत बोरोळ महसूल मंडळातील दवनहिप्परगा (ता. देवणी) येथे शनिवार, दिनांक ७ मार्च २०२६ रोजी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात महसूल विभागासह भूमी अभिलेख, पोलीस, ग्रामविकास, कृषी, आरोग्य विविध शासकीय विभागांचे अधिकारी एकाच छताखली उपस्थित राहून राज्य सरकार व केंद्र सरकार चे विविध कल्याणकारी योजनेचे अर्ज स्वीकारतील नागरिकांच्या विविध समस्या, अर्ज व तक्रारींचे तत्काळ निराकरण करण्यात येणार आहे. जमिनीचे उतारे, फेरफार, नाव नोंदणी, जात, रहिवासी व उत्पन्न दाखले तसेच इतर शासकीय सेवा याबाबत मार्गदर्शन व कार्यवाही करण्यात येणार आहे. सदर शिबिरास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या अडचणी मांडाव्यात, असे आवाहन उपविभागीय अधिकारी, निलंगा शरद झाडके तसेच देवणीचे तहसीलदार सोमनाथ वाडकर यांनी केले आहे.

### योगेश्वरीदेवी विद्यालयाचे यश

**देवणी :** येथील श्री योगेश्र्वरीदेवी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आठवी वर्गासाठी एन.एम.एम.एस.या परीक्षेला एकूण १९ विद्यार्थ्यांपैकी वैष्णवी अंकुश सूर्यवंशी व हिमांशू मारुती कलवले हे दोघे उत्तीर्ण झाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थापक अध्यक्ष यशवंतराव पाटील, सचिव अभिजीत पाटील, आदित्य पाटील, प्राचार्य राजकुमार हरकंचे, प्राध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## गजानन भोपणीकर यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**

**देवणी, दि. ०१ मार्च :** बोरोळ पंचायत समिती गणा-तुन .गजानन भोपणीकर यांची बहुमताने विजय झाल्याबद्दल माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी त्यांच्या उदगीर येथील निवासस्थानी सत्कार केला. पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी बोरोळ पंचायत समिती गणाचा विकास करण्यासाठी मी कटिबद्ध रा-हीन हा ठाम विश्र्वास व्यक्त केला.यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस मनोज कन्नाडे,देवणी नगरपंचायतीचे माजी बांधकाम सभापती मा.प्रा.डॉ.अनिल इंगोले, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस प्रताप कोयले, बोरोळ शालेय समितीचे अध्यक्ष सत्यदेव गरड, संतोष पंढरपुरे आदींची उपस्थित होते.

## श्रीराम विद्यालयाचे एन.एम.एम.एस परीक्षेत घवघवीत यश; १३ विद्यार्थी उत्तीर्ण



**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. ०१ मार्च :** श्रीराम माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय च्या विद्यार्थ्यांनी याही वर्षी घवघवीत यश संपादन करत विद्यालयाची यशाची परंपरा कायम राख-ली. शासनाच्या वतीने शिष्यवृतीधारक विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी १२००० रु प्रमाणे ५ वर्ष शिष्यवृत्ती मिळते.

यावर्षीच्या एन.एम.एम.एस. परीक्षेत २९ विद्यार्थी परी-क्षेत बसले होते त्यापैकी १३ विद्यार्थी उतीर्ण झाले.ते विद्यार्थी पुढील प्रमाणे अमृता करमुडे, अश्लेषा शेवाळे, राधिका सोमवंशी, जागृती डावळे, भक्ती बिलापटे, मंजुषा दाडगे, श्रा-वणी मिटकरी, सृष्टी शिंदे, श्रद्धा देशमुख, श्रुती खरोटमोल, श्रेयस माने, बालाजी मुळे , सोहम अकनगीरे या सर्व विद्यार्थ्यांचा पालका समवेत श्रीराम विद्यालयात सत्कार संपन्न झाला.

या विद्यार्थ्यास प्रशांत कोष्टी, निलेश उगीले, अमृतेश्वर स्वामी यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष देविदासराव कुटवाड, सचिव ॲड. पंडितराव उगी-ले, प्राचार्य सिद्धेश्वर मामडगे, प्राथमिकचे मुख्याध्यापक सतीश मोरे प्रा. भरत धायगुडे यांनी अभिनंदन केले.

## श्रीराम विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन विविध उपक्रमांनी साजरा




**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. ०१ मार्च :** ज्येष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस आज दिनांक २७ फेब्रुवारी रोजी श्रीराम प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्रीराम माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सिद्धेश्वर मामडगे उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून इंदिरा माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे पाचेगावकर सर श्रीराम प्राथमिक विद्यामंदिरचे मुख्याध्यापक सतीश मोरे. पर्यवेक्षक अनिल कुटवाड, प्रा जुबेर खाँ पठाण, सांस्कृतिक विभाग प्रमुख अमृतेश्वर स्वामी संगीत विभाग प्रमुख महादेव बन यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख अमृतेश्वर स्वामी यांनी केले.

विविध कविता ओव्या सादर करून मराठी भाषा प्राचीन भाषा असून तिला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे आपल्यासाठी अभिमानास्पद आहे असे मत व्यक्त केले. तर प्राचार्य सिद्धेश्वर मामडगे अध्यक्ष म्हणून बोल-ताना मराठी भाषेचे विविध पैलू सांगून मराठी आपली माय बोली असून मराठी भाषेचा अभिमान सर्वांनी बाळगला पाहिजे असे मत व्यक्त केले . महादेव बन व कादंबरी कासलबादे यांनी माय मराठी आमची हे सुंदर गीत सादर केले. सातवीच्या विद्यार्थ्यांनी अनामिका ही कविता सादर केली तर भक्तीगीत भावगीतावर पाऊल खेळत विद्यार्थ्यांनी मराठी भाषेची थोरवी गायली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्पना खंदाडे यांनी केले तर आभार प्राध्यापक लहूकांत शेवाळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनिता वेल्हाळे,महानदा माने,साधना मरपल्ले यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांमध्ये उत्साह दिसून येत होता.

## पित्याचे स्मरणार्थ वृद्धाश्रमास दिली बांधकाम देणगी

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर , दि. ०१ मार्च :** येथील राष्ट्रसंत डॉक्टर शिवलिंग शिवाचार्य महाराजांचे भक्तीस्थळ येथे हजारो भक्त संजीवन समाधीचे दर्शन घेत गुरुराज माऊली च्या गजरात भजन कीर्तन व नामाची कीर्तनामध्ये भक्त रममान झाले असताना जळकोट येथील अंगणवाडी अधिकारी अहमदपूरचे सचिन काडवादे यांनी राष्ट्रसंत डॉक्टर शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या जन्मोत्सव औचित्य साधून पिता स्वर्गीय सांबाप्पा रेवणप्पा काडवादे यांचे स्मरणार्थ अहमदपूर येथील सुखमणी वृद्धाश्रम येथे होत असलेल्या नवीन इमारत मधील एका खोली बांधकामा साठी चा खर्चाची रक्कम सुखमनी वृद्धाश्रमाचे अध्यक्ष आशिष एगाले व संचालक मंगेश कदम यांच्या कडे सुपूर्द केली.

या वेळी आई शांताबाई कादडवादे, पत्नी कांचन



व मुलगी सिद्धी सह वैभवी काडवादे व दिशा धिरेंद्र ढोले हे परिवारातील सदस्य उपस्थित होते

## संघर्षाला शरण न जाता शिखर सर करण्याची जिद्द जोपासा : ॲड. विठ्ठल आदित्य

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ०१ मार्च :** परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी संघर्षाला शरण न जाता जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमांच्या बळावरच यशाची शिखरे सर करता येतात. समाजाने न्यूनगंड झटकून आत्मविश्वासाने पुढे जात आदर्श निर्माण करावा, असे प्रतिपादन ॲड. विठ्ठल आदित्य यांनी केले.

निलंगा येथील शासकीय विश्रामगृहावर सकल धनगर समाजाच्या वतीने त्यांच्या भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. देशाच्या सर्वोच्च न्यायालयात कामकाज करण्यासाठी आवश्यक असलेली 'एअ-ोआर' ही अत्यंत प्रतिष्ठेची परीक्षा उत्तीर्ण होत त्यांनी निलंगा तसेच संपूर्ण धनगर समाजाचे नाव अभिमानाने उंचावले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचा समाजाच्या वतीने गौरव करण्यात आला.

यावेळी या सत्काराला उत्तर देताना ॲड. आदित्य यांनी आपल्या संघर्षमय प्रवासाची आठवण करून देताना स्पष्ट शब्दांत सांगितले की, यश हे कुणालाही सहज मिळत नाही; त्यामागे त्याग, परिश्रम आणि सातत्यपूर्ण अभ्यासाची जोड असते. समाजातील तरुणांनी शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देऊन न्यायव्यवस्था, प्रशासन, स्पर्धा परी-क्षा आणि विविध व्यावसायिक क्षेत्रांत आपला ठसा उमटवावा. आपण मागे राहण्यासाठी नाही, तर नेतृत्व करण्यासाठी जन्माला आलो आहोत.

त्यांच्या या प्रेरणादायी शब्दांनी उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. समाजातील एकजूट, शिक्षणाची कास आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या बळावर कोणतीही अडचण मोठी नसते, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रकाश सराटे यांनी केले. तर ज्येष्ठ संपादक तथा ज्येष्ठ समाजसेवक झटिंगअण्णा म्हेत्रे यांनी आभार मानले.



यावेळी प्रा. गजेंद्र तरंगे, ॲड. गजानन मंठाळे, शिवदास गुंजिटे, भगीरथ वरवटे, मल्हारी पेठकर, गंगाराम सूर्यवंशी, भरत म्हेत्रे, बळवंत सरवडे, बालाजी लव्ह-वे, सचिन दोडके, कमलमर म्हेत्रे, डॉ. बापू काळे, संजय भोसले, दीपक कात्रे, गोपीनाथ भोकरे, रोहिदास म्हेत्रे, मोहन कुदळे, संतोष घोडके, राजेंद्र हजारे, डॉ. गिरीधर सूर्यवंशी, डॉ. धनगे, मोहन सोनटक्के, लक्ष्मण म्हेत्रे, बब्रुवान सोनटक्के आदी मान्यवर व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा सत्कार सोहळा केवळ गौरवाचा कार्यक्रम न राहता, तो संपूर्ण धनगर समाजासाठी प्रेरणा, अभिमान आणि आत्मविश्वासाचा नवा अध्याय ठरला. संघर्ष हा आपल्या यशाचा पाया आहे; शिक्षण आणि एकजुटीच्या बळावर आपण भविष्य घडवू शकतो, हा संदेश या सोहळ्यातून ठळकपणे अधोरेखित झाला.

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्रीपतराव भोसले विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त भाषण स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ मार्च -**

शहरातील श्रीपतराव भोसले विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त इयत्ता ६ वी 'जे' तुकडीच्या वतीने भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. नोबेल पुरस्कार विजेते शास्त्रज्ञ सी.व्ही. रमण यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी लावलेल्या 'रमण इफेक्ट'च्या शोधाच्या स्मृतिदिनी भारतात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो.

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत व्हावा या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत एकूण २५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेत आरोही झोंबाडे हिने प्रथम क्रमांक, राजनंदिनी उंबरे हिने द्वितीय क्रमांक, तर समीक्षा सूर्यकांत भोसले हिने तृतीय क्रमांक पटकावला. इयत्ता ५ वी-६ वीचे पर्यवेक्षक बालाजी गोरे व कलाध्यापक शेषनाथ वाघ यांच्या हस्ते विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. परीक्षक म्हणून एम.पी. पवार व एस.एम. राऊत यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विज्ञान शिक्षक संजय वाघमारे यांनी केले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाध्यक्ष सुधीर पाटील, सरचिटणीस प्रेमा पाटील, सीईओ आदित्य पाटील, एओ साहेबराव देशमुख, मुख्याध्यापक नंदकुमार नन्नवरे व उपमुख्याध्यापक प्रमोद कदम यांनी अभिनंदन केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...



### पांगरदरवाडीतील आठ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**तुळजापूर, दि.१ मार्च -**

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षा नुकतीच पार पडली. या परीक्षेत तुळजापूर तालुक्यातील पांगरदरवाडी येथील तब्बल आठ विद्यार्थी पात्र ठरले असून त्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये वैधवी गायकवाड, प्रणिती मते, सरस्वती साळुंके, संचिता मते, वैभवी कदम, राजनंदिनी मोरे, कल्याणी क्षीरसागर आणि सोहम कदम यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना शाळेतील शिक्षिका भावना चौधरी तसेच सहदेव माळी व विशाल जाधव यांनी मार्गदर्शन केले. शाळेचे मुख्याध्यापक व्यंकट कोळी व शालेय समितीचेही मोलाचे सहकार्य लाभले.



### ज्ञानदीप बालसंस्कार केंद्रात मराठी भाषा गौरव दिन साजरा

**कळंब, दि.१ मार्च -**

थोर साहित्यिक कुसुमाग्रज अर्थात विष्णू वामन शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्त ज्ञानदीप बालसंस्कार केंद्रामध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मराठी भाषेच्या संवर्धन व जतनाचा संदेश देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात मराठी भाषेच्या महत्त्वावर आधारित विचार मांडून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी मराठी कविता, गोष्टी व भाषण सादर करून उपस्थितांची मने जिंकली. मराठी भाषा ही आपल्या संस्कृतीची ओळख असून तिचा अभिमान बाळगणे आवश्यक आहे, असे मार्गदर्शन जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेच्या भामर व पल्लवी यांनी विशेष परिश्रम घेतले.



### लिट्ल फ्लॉवर्स शाळेत मराठी भाषा गौरव दिन उत्साहात

**तुळजापूर, दि.१ मार्च -**

दि.२७ फेब्रुवारी हा दिवस जगभर मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने तुळजापूर येथील लिट्ल फ्लॉवर्स मराठी प्राथमिक शाळेत मराठी भाषा गौरव दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी थोर कवी कुसुमाग्रज अर्थात विष्णू वामन शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन शाळेचे मुख्याध्यापक संजय पवार व अविनाश गव्हाणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी मराठी भाषा गौरव गीत सादर करत मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित केले व आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख शिवाजी कारंडे व सुनीता शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.



### इटकळ येथे मराठी भाषा गौरव दिन उत्साहात; ग्रंथदिंडीने वेधले लक्ष

**इटकळ, दि.१ मार्च -**

इटकळ येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत शुक्रवार, दि.२७ फेब्रुवारी रोजी 'मराठी भाषा गौरव दिन' विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन कवयित्री, साहित्यिका व शिक्षिका कविता पुदाले यांच्या संकल्पनेतून करण्यात आले. यावेळी कविता पुदाले यांनी कुसुमाग्रजांची प्रतिमा शाळेस भेट दिली. यानंतर विद्यार्थ्यांनी मराठमोळ्या पारंपरिक वेशभूषेत गावातून ग्रंथदिंडी काढली. टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि वारकरी पावलांच्या तालावर विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक तानाजी जाधव, सतिश ढोणे, सुनिता माने, सविता पवार, जया भोसले, सरिका इंगळे व भाग्यश्री पाटील यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन कविता पुदाले यांनी केलेफ समारोप तानाजी गायकवाड यांनी केला तर आभारप्रदर्शन सतिश ढोणे यांनी केले.

# धाराशिवमध्ये मार्चच्या सुरुवातीलाच उन्हाचा कडका!

### उन्हाळ्याची चाहूल : रस्त्यावर उसाचा रस पिण्यासाठी गर्दी...




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ मार्च -**

जिल्ह्यात उन्हाळ्याची चाहूल लागताच तापमानात लक्षणीय वाढ नोंदवली जात आहे.धाराशिवमध्ये मार्चच्या सुरुवातीपासूनच उन्हाचा कडका जाणवू लागला आहे.

दुपारच्या वेळी कडक उन्हामुळे नागरिकांनी सावली आणि थंडगार पेयांकडे ध्यान देणे सुरू केले आहे. रस्त्यांवर ठिकठिकाणी उसाचा रस व शीतपेय विकणाऱ्या गाड्यांभोवती मोठी गर्दी दिसून येत आहे.

धाराशिव जिल्ह्यात उन्हाळ्याचा प्रभाव जास्त झाल्यामुळे तापमान लक्षणीयरीत्या वाढले आहे.

सध्या स्थानिक हवामान अहवालानुसार दुपारी तापमान ४0ओउ जवळपास असून रस्त्यावर नागरिक उष्णतेपासून वाचण्यासाठी थंडगार पेय आणि उसाच्या रसाकडे धाव घेत आहेत.

धाराशिव शहरातील विविध मार्केट आणि रस्त्यांवर उसाचा रस विकणाऱ्या गाड्या मोठ्या प्रमाणात पाहायला मिळत आहेत.

ताज्या उसाचा रस काढून त्यात लिंबू, आले किंवा मिठ मिसळून दिला जातो. गरम उन्हात हे पेय शरीराला तत्काळ ऊर्जा देत थंडावा निर्माण करते.

उसाच्या रसाबरोबरच लस्सी, ताक, बर्फाचे गोळे, फळांचे ज्यूस आणि इतर शीतपेये विकणाऱ्या गाड्यांवरही नागरिकांची रांग लागलेली दिसते.

विशेषतः कामगार, विद्यार्थी आणि दुपारी बाहेर असलेले नागरिक या थंडगार पेयांचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेत आहेत.

असा कडक उन्हाळा दरवर्षी अनुभवायला मिळतो, त्यामुळे थोडा थंडावा मिळवण्यासाठी लोक पेयांकडे धाव घेतात, अशी माहिती एका गाडीवाल्याने दिली.

### आरोग्याची काळजी घेणे गरजेचे

उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच तापमानात झालेली वाढ शरीरावर परिणाम करू शकते. विशेष करून दुपारी १२ ते ४ या वेळेत शक्यतो घराबाहेर न पडणे, भरपूर पाणी पिणे, हलका आणि पचायला सोपा आहार घेणे, टोपी, छत्री किंवा रुमाल वापरणे, जिल्ह्यातील नागरिकांनी उन्हाळ्याच्या काळात स्वतःचे आणि कुटुंबियांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी या सल्ल्याचे पालन करणे गरजेचे आहे.

### परंड्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' अभियानास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१ मार्च -**

परंडा तालुक्यातील आसू, जवळा नि., आनाळा, शेळगाव, सोनारी, परंडा व पाचपिंपळा महसूल मंडळातील नागरिकांसाठी महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्र.१ राबविण्यात येणार आहे. शासन निर्णय क्र. मराअ-२०२६/प्र.क्र.९/समन्वय-१, मंत्रालय मुंबई (दि. १८ फेब्रुवारी २०२६) अन्वये या अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.

महसूल विभाग हा जनतेच्या दैनंदिन जिव्हाळ्याच्या प्रश्नांशी निगडित असल्याने ग्रामीण भागातील शेतकरी, विद्यार्थी, महिला व सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न तत्काळ निकाली काढण्यासाठी मंडळ स्तरावर शिबिरे घेण्यात येणार आहेत. हे शिबीर दि.७ मार्च ते १५ मे या कालावधीत मंडळनिहाय वेळापत्रकानुसार आयोजित केले जाणार आहे. शिबिरामध्ये देण्यात येणाऱ्या प्रमुख सेवा विषयी माहिती देण्यात येणार आहे.

## ऊस वाहतूक ट्रॅक्टरना रिफ्लेक्टर नसल्याने अपघातांचा धोका वाढला

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१ मार्च -**

जिल्ह्यातील १४ साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरू असून रस्त्यांवर ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर-ट्रॉलींची वर्दळ वाढली आहे. मात्र, अनेक ट्रॅक्टर-ट्रॉलींना आवश्यक रिफ्लेक्टर व रेडियम पट्ट्या नसल्याने रात्रीच्या वेळी अपघातांचा धोका वाढला आहे. याकडे प्रशासन कधी गांभीर्याने लक्ष देणार, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

रात्रीच्या अंधारात किंवा पहाटेच्या धुक्यात रस्त्याच्या कडेला उभी असलेली अथवा संथ गतीने चालणारी ऊस वाहतूक करणारी वाहने इतर चालकांना दिसत नाहीत. विशेषतः मागील बाजूस रिफ्लेक्टर नसल्याने मागून येणाऱ्या दुचाकी किंवा चारचाकी चालकांना समोर वाहन असल्याचा अंदाज येत नाही. त्यामुळे भीषण अपघात घडत असून काही ठिकाणी जीवितहानीही झाली आहे.

जिल्ह्यातील भूम-धाराशिव, ढोकी-कळंब तसेच कळंब-शिराढोण या प्रमुख मार्गांवर ऊसाने भरलेले ट्रॅक्टर उलटण्याच्या घटना घडल्या आहेत. ढोकी-कळंब हा रस्ता वळणावळणाचा असल्याने रात्रीच्या वेळी रिफ्लेक्टरअभावी अपघाताचा धोका अधिक वाढतो.



नियमांनुसार ट्रॉलीच्या पाठीमागे किमान ६ इंच रुंदीची लाल रेडियम पट्टी तसेच दोन लाल रिफ्लेक्टर असणे बंधनकारक आहे.

मात्र प्रत्यक्षात अनेक वाहनांमध्ये ही सुरक्षा साधने नसल्याचे दिसून येत आहे.

प्रशासनाने या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने उपाययोजना न केल्यास प्रवाशांच्या जीवितास मोठा धोका निर्माण होऊ शकतो, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

## जि.प. शाळेचे एनएमएमएसमध्ये यश; ५८ पैकी ४० विद्यार्थी पात्र



**तभा वृत्तसेवा**
**खासमवाडी, दि.१ मार्च -**

यशाला शॉर्टकट नसतो; कठोर मेहनतीला यशाचे फळ नक्की मिळते, हे कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी सिद्ध करून दाखवले आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेतील ५८ विद्यार्थ्यांपैकी तब्बल ४० विद्यार्थी पात्र ठरले असून शाळा कळंब तालुक्यात अव्वल ठरली आहे.

गेल्या दहा वर्षांपासून सातत्यपूर्ण गुणवत्तेमुळे शाळेचा लौकिक वाढत आहे.

या यशाबद्दल विद्यार्थ्यांचा छोटेखानी सत्कार आयोजित करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. यावेळी विद्यार्थिनींनी 'तरुण भारत'शी संवाद साधताना मराठी शाळांमधील अभ्यासपद्धती व परिश्रमांविषयी माहिती दिली.

कार्यक्रमास राम शेळके, निलेश शेळके, शिवाजी बोबडे, गोपाल शेळके, सुशीलकुमार पाटील, मुख्याध्यापक पवार, सुरवसे, काळे, रसाळ आदी शिक्षक उपस्थित होते. गतवर्षी याच शाळेतील दोन विद्यार्थिनींनी ISRO, बेंगळुरू येथे जाऊन कळंब तालुक्याचे प्रतिनिधित्व केले होते, ही शाळेसाठी अभिमानाची बाब आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सरपंच अमोल पाटील, उपसरपंच दयानंद पाटील, नवनियुक्त जिल्हा परिषद सदस्य विश्वास कोकणे आदींनी अभिनंदन केले.

## विरोधकांनी विकासाच्या मुद्द्यावर बोलावे : धरणे

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१ मार्च -**

नळदुर्ग नगरपालिकेच्या कामकाजाबाबत विरोधकांकडून जाणीवपूर्वक जनतेमध्ये गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी केला आहे. विरोधकांनी राजकारण न करता विकासाच्या मुद्द्यावर बोलावे, असे त्यांनी स्पष्ट केले.



दि.२६ फेब्रुवारी रोजी नगरपालिकेत सादर करण्यात आलेल्या २०२६-२७ च्या अंदाजपत्रकाबाबत विरोधकांनी कोणताही अभ्यास न करता केवळ दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला, असा आरोप त्यांनी केला. विशेष अर्थसांकल्पीय सभा ही कायद्यानुसारच पार पडल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र नगरपरीषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम १०१(२अ) नुसार नगराध्यक्षांनी १५ जानेवारी २०२६ पूर्वी स्थायी समितीची सभा बोलावणे अपेक्षित होते. मात्र त्यावेळी स्थायी समितीचे गठन झाले नव्हते.

त्यामुळे अधिनियमातील कलम १०१ (३) नुसार २०२६-२७ चा अर्थसंकल्प मंजुरीसाठी सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आला. दि.२६ फेब्रुवारी रोजी झालेल्या विशेष अर्थसांकल्पीय सभेत हा अर्थसंकल्प बहुमताने मंजूर करण्यात आला, असेही त्यांनी नमूद केले. तसेच आर्थिक अंदाजपत्रक १५ डिसेंबरपूर्वी स्थायी समितीसमोर सादर होणे अपेक्षित असते.

मात्र समिती अस्तित्वात नसल्यामुळे ३१ जानेवारीपर्यंत अंदाजपत्रक सादर न झाल्यास नगराध्यक्षांना विशेष अधिकारांचा वापर करण्याची तरतूद आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

विरोधकांनी सतत विरोधासाठी विरोध न करता शहराच्या विकासासाठी सकारात्मक भूमिका घ्यावी व जनतेमध्ये गैरसमज पसरवू नयेत, असे आवाहन नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी केले आहे.

## बाळेश्वर विद्यालयात टॉपर विद्यार्थिनींचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१ मार्च -**

बारूळ (ता. तुळजापूर) गावातील बाळेश्वर विद्यालयात एनएमएमएस परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवलेल्या विद्यार्थिनींचा व त्यांच्या पालकांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला.



या स्पर्धात्मक परीक्षेत विद्यालयातील विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले. त्यामध्ये प्रणिती मुदगुडे, समृद्धी सोनवणे, प्रगती कडबाने आदी टॉपर विद्यार्थिनींचा शाळेच्या वतीने गौरव करण्यात आला.

यावेळी मुख्याध्यापक मंगेश अणदूरकर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, या विद्यार्थिनींनी अवघड समजल्या जाणाऱ्या परीक्षेत यश संपादन करून शाळेची मान उंचावली आहे. अशा गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीशी शाळा खंबीरपणे उभी राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास गिरिजा सोनवणे, कडबाने ताई, मुदगुडे, कोमल लोखंडे, सर्व सहकारी शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

### धाराशिवमध्ये वाहतूक नियमभंगावर १३७ कारवाया

**धाराशिव, दि.१ मार्च -**

धाराशिव शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी दि.२८ फेब्रुवारी रोजी शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर विशेष तपासणी मोहीम राबवली. मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर एकूण १३७ कारवाया करण्यात आल्या.

या कारवायांद्वारे १,२०,२५० रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

## पाटबंधारे वसाहतीची दुरावस्था; अतिक्रमणाचा धोका?

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१ मार्च -**

नळदुर्ग येथील पाटबंधारे विभागाच्या कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात आलेल्या कर्मचारी वसाहतीची मोठी दुरावस्था झाली असून तात्काळ दुरुस्ती न झाल्यास संपूर्ण वसाहत नाम शेष होऊन जागा अतिक्रमण धारकांच्या घशात जाण्याची भीती व्यक्त होत आहे.



बोरी धरण उभारणीनंतर पाटबंधारे विभागाने व्यासनगर शेजारी कर्मचाऱ्यांसाठी सुसज्ज वसाहत उभारली होती. या वसाहतीमध्ये एकूण १३ ब्लॉक असून पूर्वी येथे कर्मचाऱ्यांची व त्यांच्या कुटुंबीयांची वस्ती होती. मात्र सध्या एक-दोन ब्लॉक वगळता उर्वरित सर्व ब्लॉकची मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे. विभागातील अनेक कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या जागी नवीन भरती न झाल्याने वसाहत ओस पडली. परिणामी, देखभालीअभावी इमारतींची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. पूर्वी संरक्षणासाठी असलेले तारेचे कंपाऊंड अनेक ठिकाणी तोडण्यात आले असून काही भागात अतिक्रमण सुरू झाल्याची माहिती आहे. हीच परिस्थिती कायम राहिल्यास संपूर्ण वसाहतीवर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. निवासस्थानांची पडझड व झुडपांची वाढ यामुळे येथे मोठमोठे साप निघत असल्याची तक्रार आहे. सध्या वसाहतीतील एका ब्लॉकमध्ये पाटबंधारे विभागाचे कार्यालय व एका सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचा निवास असल्याने ते दोनच ब्लॉक सुस्थितीत आहेत.

जर विभागाला ही वसाहत आवश्यक नसेल, तर ती अन्य शासकीय कामासाठी वर्ग करण्याची मागणी होत आहे.

## परंड्यात वेडे महाराजांच्या २२६ व्या पुण्यतिथीनिमित्त भक्तीमय सोहळ्यांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१ मार्च -**

येथील सदगुरू यज्ञेश्वर शिवाचार्य (वेडे महाराज) यांच्या २२६ व्या पुण्यतिथीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सदगुरू राचलिंग शिवाचार्य परंडकर महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडणार असून उज्जैयीनी सधर्म पीठ (कर्नाटक) येथील जगद्गुरूंची उपस्थिती लाभणार आहे.

परंपरेनुसार भोत्रा रोड येथील वेडे महाराज मठात बुधवार, दि. ४ मार्च ते शनिवार, दि. ७ मार्च २०२६ या कालावधीत अखंड शिवनाम सप्ताह, परमरहस्य ग्रंथ पारायण, संगीतमय शिवपाठ, कीर्तन-भजन, धर्मसभा व महाप्रसाद आदी कार्यक्रम होणार आहेत.

दि.७ मार्च रोजी पुण्यतिथीनिमित्त सकाळी ८ ते ११ या वेळेत सिद्धलिंग राजदेशीकेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांचा भव्य दिव्य रथोत्सव छत्रपती शिवाजी चौक (कोर्ट) ते वेडे महाराज मठ, भोत्रा



रोड या मार्गावरून काढण्यात येणार आहे. त्यानंतर धर्मसभा आयोजित करण्यात आली आहे. सकाळी गुरुगादीस रुद्राभिषेक, बिल्वार्चन, महापूजा व महाप्रसाद होणार आहे.

या सोहळ्यास वेदांताचार्य मुक्तेश्वर शिवाचार्य महाराज (वेळापूर), सिद्धलिंग राजगुरू शिवाचार्य महाराज (शिंगणापूर), डॉ. निळकंठ शिवाचार्य महाराज (धारेश्वर), शिवानंद शिवाचार्य महाराज (वाळवा), वेदांताचार्य दिगंबर शिवाचार्य महाराज (वसमत), प्रभुदेव शिवाचार्य महाराज (माढा), वीरूपाक्ष शिवाचार्य महाराज (मानूर), महादय्या रविशंकर शिवाचार्य महाराज (रायपाटण) आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## पिंपळगाव डोळा जि.प. शाळेचे एनएमएमएस यश

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१ मार्च -**

कळंब तालुक्यातील पिंपळगाव डोळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने राष्ट्रीय आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (एनएमएमएस) परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. उत्कर्ष उमेश जगताप हिने १०१ गुण मिळवत शिष्यवृत्ती पटकावली आहे. तिच्या या यशामुळे शाळेचे व गावाचे नाव उज्ज्वल झाले आहे.




तसेच, इयत्ता चौथीतील विद्यार्थी सत्यम चंद्रकांत गुजर याने सैनिक स्कूल सातारा प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत १५७ गुण मिळवून सैनिक स्कूलमधील प्रवेश निश्चित केला आहे. या दुहेरी यशामुळे शाळेत आनंदाचे वातावरण आहे. विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षक रामढवे अभय कुमार, दैवशाला कोरे, नवनाथ तुंदारे, विशाल गंभीरे व भावले सुरेखा यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल कालिदास दत्त, धहिरे व सर्व सदस्य, मुख्याध्यापक नवनाथ तुंदारे, शिक्षकवृंद तसेच गावातील नागरिकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...




### मंगरुळ जि.प. प्रशालेचा एनएमएमएस परीक्षेत दैदिप्यमान यश

**मंगरूळ, दि.१ मार्च -**

येथील जिल्हा परिषद प्रशाला, मंगरुळच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील एनएमएमएस परीक्षा २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करून शाळेचा व गावाचा नावलौकिक वाढविला आहे. इयत्ता आठवीतील साक्षी डोंगरे, शाफिया तांबोळी, आलिया मुलाणी, सिद्धी हजारे, जानकी जांभळे, रुकया पठाण, वसुधा हजारे, अपूर्वा बनकर व शरयू पाचपुंडे या नऊ विद्यार्थ्यांनी ही स्पर्धात्मक परीक्षा उत्तीर्ण होऊन शाळेचा शैक्षणिक झेंडा उंचावला आहे. या दैदिप्यमान यशामुळे संपूर्ण गावात आनंद व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी मुख्याध्यापक गणेश तनपुरे, सर्व शिक्षकवृंद व मंगरुळ ग्रामस्थांच्या वतीने चित्तरंजन सरडे, आप्पासाहेब जेटिथोर, आदमशा फकीर, मनोज डोंगरे तसेच उपस्थित माता-भगिनींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.



### बेलवाडी जि.प. शाळेत मराठी राज्यभाषा दिन साजरा

**लोहारा, दि.१ मार्च -**

लोहारा तालुक्यातील बेलवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मराठी राज्यभाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज (विष्णू वामन शिरवाडकर) यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. मुख्याध्यापक राजेंद्र माळवदकर तसेच सहशिक्षिका सोनाली जगताप, तानाजी पाटील, राजकुमार क्षीरसागर आणि विकास घोडके यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी विकास घोडके व सोनाली जगताप यांनी कुसुमाग्रजांचे साहित्यकार्य आणि मराठी भाषेची समृद्ध परंपरा याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास लक्ष्मण जाधव यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.



### जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत 'बाल आनंद मेळावा' संपन्न

**लोहारा, दि.१ मार्च -**

विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच व्यवहारिक ज्ञान मिळावे या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत 'बाल आनंद मेळावा' मोठ्या उत्साहात पार पडला. या उपक्रमाला विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मेळाव्यात तब्बल १५२ स्टॉल्स उभारण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेतून हरभरा, खरबूज, भेळ, पाणीपुरी यांसारखे खाद्यपदार्थ तसेच शेतमाल, हस्तकला वस्तू आणि शालेय साहित्य विक्रीस ठेवले. स्टॉलसाठी साहित्य खरेदी, खर्चाचा अंदाज, किंमत ठरवणे, ग्राहकांशी संवाद आणि नफा-तोट्याचा हिशोब विद्यार्थ्यांनी स्वतः करत प्रत्यक्ष व्यवहाराचा अनुभव घेतला. शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विद्यार्थी-पालक सहभागी झाले होते.



### तुळजापूरमध्ये हरिनाम संकीर्तन उत्साहात

**तुळजापूर, दि.१ मार्च -**

आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ व हरे कृष्ण भक्त यांच्या वतीने रविवार दि. १ मार्च रोजी शहरात हरिनाम संकीर्तन काढण्यात आले. सकाळी ७.१५ वाजता भावसार यात्री निवास येथून संकीर्तनास प्रारंभ झाला. टाळ-मृदुंगाच्या गजरात, हरे कृष्ण हरे रामच्या अखंड नामस्मरणात भक्तांनी शहरातील विविध मार्गांवरून प्रबोधनात्मक फेरी काढली. अयोध्या नगरातील श्री नारायण मरळ यांच्या निवासस्थानी संकीर्तनाची सांगता करण्यात आली.

### विमलबाई अमृतराव यांचे निधन

**तुळजापूर, दि.१ मार्च -**



शहरातील खटकाळ गल्लीतील रहिवाशी विमलबाई हारिश्चंद्र अमृतराव (कदम) (वय ७०) यांचे शनिवार (दि.२८) दुपारी ऱ्हदयविकाराचा झटक्याने निधन झाले. त्यांचा पार्थिवावर रविवार मोतीझरा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा पश्चात पती, एक मुलगा, ४ विवाहित मुली, सुन, नातवंडे, जावई असा परिवार आहे. तुळजाभवानी मातेचे पुजारी शिवाजी अमृतराव यांच्या त्या मातोश्री होत्या.

# मराठी शाळा बंद होण्यामागे विद्यार्थी घट नव्हे; शिक्षकांची कमतरता जबाबदार

▶▶ संचमान्यतेच्या धोरणावर आ. कैलास पाटील यांचा सरकारला सवाल...




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ मार्च -**

राज्यातील मराठी शाळा बंद पडण्यामागे विद्यार्थ्यांची संख्या घटणे हे कारण नसून शिक्षकांची अपुरी संख्या हेच मूळ कारण असल्याचा गंभीर मुद्दा आमदार कैलास पाटील यांनी विधिमंडळात उपस्थित केला. संचमान्यतेच्या सध्याच्या निकषांमुळे अनेक शाळांना आवश्यक तेवढी शिक्षक पदे मंजूर होत नसल्याने शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

सभागृहात बोलताना पाटील म्हणाले की, शासनाकडून शिक्षक मंजुरीसाठी विद्यार्थीसंख्या हा प्रमुख निकष ठेवला जातो. मात्र ग्रामीण भागात विद्यार्थीसंख्या कमी असली तरी ती शाळा त्या गावासाठी एकमेव शैक्षणिक आधार असते.

शिक्षकसंख्या अपुरी असल्याने एका शिक्षकावर दोन-तीन वर्गांचा भार टाकला जातो. अशा परिस्थितीत दर्जेदार अध्यापन होणे कठीण होते आणि विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया कमकुवत राहतो.



यामुळे पालकांचा शाळेवरील विश्वास कमी होतो. पुढे विद्यार्थीसंख्या घटल्याचे कारण देत शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला जातो. त्यामुळे विद्यार्थी कमी हे कारण प्रत्यक्षात व्यवस्थेतील त्रुटी झाकण्यासाठी पुढे केले जाते, असा आरोप त्यांनी केला. राज्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त आहेत. काही शाळा एकाच शिक्षकावर चालत असल्याची उदाहरणे आहेत. बहुवर्गीय अध्यापनामुळे विद्यार्थ्यांना वैयक्तिक लक्ष मिळत नाही, अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होत नाही आणि शिक्षणाचा दर्जा घसरतो.विशेषतः आदिवासी व डोंगराळ भागात ही समस्या अधिक तीव्र असल्याचे त्यांनी नमूद केले. अशा भागात खाजगी शाळा किंवा अन्य पर्याय उपलब्ध नसतात. त्यामुळे सरकारी मराठी शाळाच विद्यार्थ्यांसाठी एकमेव आधार ठरते. मराठी ही केवळ भाषा नसून राज्याच्या सांस्कृतिक अस्मितेची ओळख आहे. प्राथमिक स्तरावर मातृभाषेत शिक्षण मिळणे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

मराठी शाळा बंद पडत गेल्यास मातृभाषेतील शिक्षणावर गंभीर परिणाम होऊ शकतो, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

### संचमान्यतेच्या धोरणाचा पुनर्विचार करण्याची मागणी

संचमान्यता ठरवताना केवळ विद्यार्थीसंख्या हा निकष न ठेवता भौगोलिक परिस्थिती, दुर्गम भागातील गरज, सामाजिक पार्श्वभूमी यांचा विचार करावा, अशी मागणी पाटील यांनी केली. रिक्त शिक्षक पदे तातडीने भरावीत आणि आवश्यक तेवढी पदे मंजूर करावीत; अन्यथा मराठी शाळा बंद पडण्याची प्रक्रिया वेगाने सुरू राहील, असा इशाराही त्यांनी दिला.

### सरकारची भूमिका काय?

विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित संचमान्यतेच्या सध्याच्या निकषांचा पुनर्विचार केला जाणार का? मराठी शिक्षण वाचवण्यासाठी ठोस निर्णय घेतला जाणार का? या प्रश्नावर आता शिक्षण क्षेत्रात आणि राजकीय वर्तुळात व्यापक चर्चा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मराठी शाळांच्या अस्तित्वाचा हा प्रश्न केवळ प्रशासकीय नसून सांस्कृतिक व सामाजिक दृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे.

## प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व हेच आपले आदर्श : डॉ. महाजन

▶▶ विज्ञान-भाषा दिनानिमित्त उमरग्यात भव्य विज्ञान प्रदर्शन... मान्यवरांची उपस्थिती...



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१ मार्च -**

विद्यार्थीदशेत समोर प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व असेल तर विद्यार्थी निश्चितच प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करतो. जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर अशक्य वाटणाऱ्या गोष्टीही शक्य होतात. अनेक अपयशातूनही दैदिप्यमान यश मिळू शकते, हे महान शास्त्रज्ञांच्या जीवनातून दिसून येते. विद्यार्थ्यांनी न्यूनगंड दूर करून आत्मविश्वास वाढवला पाहिजे, असे प्रतिपादन संस्थेचे कार्यवाह डॉ. कपिल महाजन यांनी केले.

श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर व महात्मा बसवेश्वर माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने २८ फेब्रुवारी रोजी जागतिक भाषा दिन व राष्ट्रीय विज्ञान दिन निमित्त भव्य विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. महाजन बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन आप्पा दंडगे होते.यावेळी कोषाध्यक्ष प्रमोद कुलकर्णी, संचालक राजा देशट्टी, प्रवीण अणदूरकर, ता. पाटील, मुख्याध्यापक नेताजी गायकवाड व मुख्याध्यापिका सविता लोहार उपस्थित होते. विज्ञान विभाग प्रमुख सनी सगर व रूपाली वेदपाठक यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ड्रेनेज ओव्हरफ्लो मॉनिटरिंग सिस्टीम, फ्युचर ट्रान्सपोर्ट सिस्टीम, अर्बन फूड कंट्रोल सिस्टीम, चांद्रयान व रोबोट, एआय होलोग्राम, मायक्रोस्कोप, विमानावर आधारित डिटेक्टर कॅबिनेट टेक्नॉलॉजी, मनोरंजन पार्क आदी विविध संकल्पनांवर आधारित प्रयोग सादर केले.

तसेच मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून अक्षरांचे अवयव, मुळाक्षरे, शब्दपट्ट्या, वाक्यपट्ट्या, शब्दपेटी आदी शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शनही भरविण्यात आले.

कार्यक्रमाची प्रस्तावना बेबी सरोजा पवार यांनी केली, सूत्रसंचालन समीर देशपांडे यांनी केले, तर आभार रूपाली वेदपाठक यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पुनम चेडे यांना सी. व्ही. रमण विज्ञान शिक्षक पुरस्कार जाहीर

धाराशिव : प्रतिनिधी

विज्ञानाचा प्रचार-प्रसार करत विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणाऱ्या धाराशिव जिल्ह्यातील उत्कृष्ट शिक्षकांसाठी दिला जाणारा सन २०२५-२६ चा प्रतिष्ठेचा सी.व्ही रमण पुरस्कार वाशी येथील जे.आय.आर.टी. तंत्र प्रशाला, वाशीच्या सहशिक्षिका पुनम चेडे यांना जाहीर झाला आहे.



जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळातर्फे शालेय उपक्रमांतील उल्लेखनीय कामगिरी या निकषांवर शिक्षकांची निवड केली जाते. या सर्व बाबींमध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल चेडे यांची निवड करण्यात आली.

## ग्रीनफील्ड महामार्गासाठी जाहीर मोबदला तुटपुंजा; शिरसावच्या शेतकऱ्यांचे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ मार्च -**

सुरत-चेन्नई ग्रीनफील्ड महामार्ग प्रकल्पासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू असताना जाहीर करण्यात आलेला मोबदला अत्यल्प असल्याच्या निषेधार्थ परंडा तालुक्यातील शिरसाव येथील शेतकऱ्यांनी तीव्र आंदोलन छेडले आहे. प्रति गुंठा केवळ ७ ते १० हजार रुपये दर जाहीर करण्यात आल्याने शेतकरी संतप्त झाले असून, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग साठी देण्यात आलेल्या दराप्रमाणेच मोबदला द्यावा, अशी त्यांची मागणी आहे.

शेतकऱ्यांचा आरोप आहे की बागायती जमिनी जिरायती म्हणून नोंदविण्यात आल्या आहेत. तसेच फळधारक झाडांना रोपे म्हणून दाखवून त्यांची किंमत कमी करण्यात आली आहे. महसूल विभागाच्या या कारभारामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर संतप्त शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात ठिय्या देत धरणे आंदोलन केले.

आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे पाठविण्यात आले आहे. योग्य मोबदला न दिल्यास महामार्गाचे काम होऊ देणार नाही, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे.

आंदोलनात तानाजी चोबे, विकास चोबे, ॲड. गोविंद कोठुळे, सोमनाथ कापसे यांच्यासह शेकडो शेतकरी सहभागी झाले होते.

## बोंबले हनुमान चौक-जिजाऊ चौक रस्ता तातडीने पूर्ण करा : डॉ. प्रतापसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ मार्च -**

शहरातील बोंबले हनुमान चौक ते जिजाऊ चौक (बार्शी नाका) हा प्रमुख व दैनंदिन वर्दळीचा मार्ग तातडीने पूर्ण करण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांनी केली आहे. या मागणीसाठी दिनकर मुंडे यांनी सुरू केलेल्या जन अमरण उपोषणास पक्षाच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला.

बोंबले हनुमान चौक ते जिजाऊ चौक हा मार्ग शहरातील वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा असून दररोज मोठ्या प्रमाणावर वाहनांची ये-जा होत असते. परिसरात शाळा, महाविद्यालये, व्यापारी संकुले तसेच नव्याने विकसित होत असलेल्या वसाहती असल्याने नागरिकांची सतत वर्दळ असते. मात्र रस्त्याची अपूर्ण व निकृष्ट अवस्था नागरिकांसाठी त्रासदायक ठरत असून अपघाताचा धोका वाढल्याची तक्रार आहे.

नागरिकांची सुरक्षितता, विद्यार्थ्यांची सोय आणि शहराच्या नियोजनबद्ध विकासासाठी या रस्त्याचे दर्जेदार व तात्काळ काम होणे आवश्यक असल्याचे आंदोलनस्थळी नमूद करण्यात आले.

संबंधित प्रशासनाने त्वरित मंजुरी देऊन काम लवकर पूर्ण करावे, अशी एकमुखी मागणी करण्यात आली.

## 'एनसीएमसी' स्मार्ट कार्डसाठी ज्येष्ठांची हेळसांड

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१ मार्च -**



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) कडून १ मार्चपासून सवलतीसाठी स्वतंत्र स्मार्ट कार्ड योजना नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड लागू करण्यात येणार आहे. पात्र व खऱ्या लाभार्थ्यांनाच सवलतीचा लाभ मिळावा यासाठी ही डिजिटल प्रणाली राबविण्यात येत असून, यापुढे सवलतीचा प्रवास केवळ स्मार्ट कार्डधारकांनाच मिळणार आहे.

यासाठी कळंब बसस्थानक येथे कार्ड काढण्याची व्यवस्था करण्यात आली असली, तरी तालुक्यातील ज्येष्ठ नागरिक महिला व पुरुष मोठ्या संख्येने गर्दी करत असल्याचे चित्र आहे.

बसस्थानकातील खिडकीबाहेर ज्येष्ठांना ताटकळत बसावे लागत असून, काहींना उन्हात उभे राहण्याची वेळ येत आहे. १ मार्चपासून अंमलबजावणी सुरू होणार असल्याने एकाच वेळी मोठी गर्दी होत आहे. त्यामुळे ज्येष्ठांना जास्त वेळ थांबावे लागू नये, यासाठी अतिरिक्त काऊंटर व स्वतंत्र सोय करण्याची मागणी होत आहे.

सवलतींचा गैरवापर रोखण्यासाठी आणि व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. शासन व परिवहन मंडळाकडून ज्येष्ठांसाठी विविध सवलती जाहीर केल्या जातात; मात्र प्रत्यक्ष लाभ घेताना ज्येष्ठांना त्रास सहन करावा लागतो, ही दुर्दैवी बाब आहे.

कार्ड काढण्याची प्रक्रिया पूर्ण व सुरळीत झाल्यानंतरच अंमलबजावणी करावी, अशी प्रतिक्रिया महादेव महाराज अडसूळ यांनी दिली आहे.

दरम्यान, वाढती गर्दी लक्षात घेता बसस्थानक प्रशासनाने सावली, पिण्याच्या पाण्याची सोय व अतिरिक्त कर्मचारी उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी ज्येष्ठ नागरिकांकडून होत आहे.

## अनुवाद म्हणजे दोन संस्कृतींमधील वैचारिक पूल : डॉ. उमा कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ मार्च -**

अनुवादित साहित्य हे केवळ एका भाषेतील मजकूर दुसऱ्या भाषेत रूपांतरित करणे नसून, तो दोन संस्कृतींमधील एक वैचारिक पूल आहे. एखादे पुस्तक अनुवादित झाले की त्या प्रदेशातील चालीरीती, इतिहास आणि मानवी संवेदना दुसऱ्या भाषेतील वाचकांपर्यंत पोहोचतात. त्यामुळे मानवी संवादाची कक्षा रुंदावते. जागतिकीकरणाच्या युगात अनुवादाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे, असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. उमा कुलकर्णी यांनी व्यक्त केले.



येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय व विश्व मराठी साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानाच्या आर्थिक सहकार्याने 'मराठी साहित्यकृतींचे भाषांतर' या विषयावर आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर प्रसिद्ध साहित्यिक दिपाली दातार, साहित्यिक राजेंद्र अत्रे, कमलताई नलावडे, प्रा.डॉ. भगवान गव्हाडे, डॉ. अंकुशराव चव्हाण, डॉ. राजकुमार यल्लावाड, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. प्रशांत चौधरी तसेच मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ. सहदेव रसाळ उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. उमा कुलकर्णी यांनी कन्नड साहित्यातील एस.एल. भैरप्पा आणि गिरीश कर्नाड यांच्या साहित्याचे मराठीत झालेले अनुवाद व त्यांची वैशिष्ट्ये याविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. प्रशांत चौधरी यांनी करताना परिषदेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. यावेळी दिपाली दातार यांनी डॉ. उमा कुलकर्णी यांची प्रकट मुलाखत घेत विविध साहित्यविषयक मुद्द्यांवर चर्चा केली.

परिषदेत प्रा.डॉ. भगवान गव्हाडे, डॉ. अंकुशराव चव्हाण आणि डॉ. राजकुमार यल्लावाड यांनी साधन व्यक्ती म्हणून विविध विषयांवर आपली मते मांडली. या कार्यशाळेस प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी, लेखक व साहित्यिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. कृष्णा तेरकर, प्रा. अशोक गोरे व प्रा.डॉ. विनोदकुमार वायचळ यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ. सहदेव रसाळ यांनी केले.

परिषद यशस्वी करण्यासाठी प्राचार्य प्रा.डॉ. प्रशांत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.डॉ. सहदेव रसाळ, प्रा.डॉ. कृष्णा तेरकर, प्रा.डॉ. मारुती गोरे, प्रा. प्रमोद पाटील तसेच प्राध्यापकांनी परिश्रम घेतले.

### लॉजवर नेऊन तरुणीवर लैंगिक अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ मार्च -**

परंडा पोलीस ठाणे हद्दीत एका २४ वर्षीय महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.१५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजेपासून ते दि.२३ जानेवारी रोजी सायं. ४.३० वाजेपर्यंतच्या कालावधीत एका गावातील तरुणाने संबंधित महिलेला लॉजवर नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. तसेच शिवीगाळ करून जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. पीडितेने दिलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.